# कर्तबगार स्त्रिया

प्रा. श्रीपाद महादेव माटे, एम्. ए.




मूल्य १।। रुपया

कॉंटिनेंटल बुक सर्व्हिस, पुणें २.

प्रकाशक :
**गो. रा. पाटणकर,**
कॉंटिनेंटल बुक सर्व्हिस,
६२६ शनवार, पुणें २.

• • •

सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन

प्रथमावृत्ती १५ सप्टेंबर १९५७

• • •

मुद्रक :
**सी. एस्. लाटकर,**
प्रशान्त प्रिंटिंग प्रेस,
२५२/१ अ, नारायण पेठ, पुणें २.

# अ नु क्र म णि का


१. हिच्या सांवलीलाही ते सलाम करीत ! १

दीपाबाई ★ ★

२. हिनें नवऱ्याला शत्रूच्या तावडींतून सोडविले ! १४

मादाम चँग-कै-शेक ★ ★

३. ह्या अंधळ्याच्या बायकोनें स्त्रीजात डोळस बनविली ! २५

मिसेस् फॉसेट् ★ ★

४. हिनेंच पहिल्यानें गरिबांच्या झोपड्या नष्ट केल्या ! ३६

बॅरनेस बर्डेट कूटस् ★ ★

५. हिनें गरिबांना अन् श्रीमंतांना एकत्र आणलें ! ४७

जेन अदाम्स् ★ ★

६. हिनेंच आपल्या हालांनीं क्रांतीचें बीज रुजविलें ! ५८

कॅथरीन ब्रेशकोवस्की ★ ★

७. हिनें गुन्हेगार मुला–मुलींना माणसांत आणलें ! ७०

मेरी कार्पेंटर ★ ★

८. हिला देवाचें राज्य स्थापावयाचें होतें ! ८०

फ्रॅन्सिस विलर्ड ★ ★

९. हिनें स्त्रीजातीचें मुख रेडियमइतकें उजळ केलें ! ८८

मादाम क्यूरी ★ ★

१०. हिनेंच अमेरिकेंत पहिल्यानें स्त्रियांचा कैवार घेतला ! ९४

सुसान बी. अंथनी ★ ★

११. ही भुकेली तरुणी भुकेल्यांची पोशिंदी बनली ! १०५

इव्हा पेरॉन ★ ★

# प्रास्ताविक

अकरा कर्तबगार स्त्रियांचीं चरित्रें पुढील थोड्याशा पानांत दिलीं आहेत. त्यापैकीं प्रत्येक स्त्रीनें मानवी जीवनाच्या विकासांत एका एका टप्प्याची भर घातली आहे. मानवी जीवन असावें तितकें न्यायाचें नाहीं व सुखाचें नाहीं; आणि म्हणून हा न्याय व हें सुख ह्या जीवनाला मिळवून देण्यासाठीं आपण झगडलें पाहिजे आणि देह कष्टविला पाहिजे, हें बहुतेक साऱ्याच स्त्रियांच्या कर्तबगारीचें क्षेत्र बनलें होतें, असें दिसेल; आणि एका स्त्रीनें तर भौतिक शास्त्रांच्या शोधांत येवढें उड्डाण केलें, कीं त्या शोधाच्या तेजानें जगाचे डोळे दिपूनच गेले. मानवी जीवनाला न्याय व सुख मिळवून देतांना या स्त्रियांना नातेवाइकांशीं, सरकारशीं आणि एकंदर पुरुष जातीशीं मोठ्या तडफेनें झगडावें लागलें. ज्या ज्या देशाला व समाजाला हा न्याय व हें सुख हवे असेल, त्या त्या देशांतील व समाजांतील तरुण स्त्रियांनीं या लहानशा पुस्तकांतील स्त्रियांचा आदर्श आपल्या डोळ्यापुढें ठेवणें अत्यंत इष्ट आहे; आणि जर पुरुषाची जात आतां खरोखरच स्त्रियांची पक्षपाती बनली असेल, तर तिनेंही या कामीं झगडलें पाहिजे. प्रत्येक चरित्रांतील प्रयत्नाचें दर्शन इतकें स्पष्ट आहे, कीं प्रस्तावनेंत त्या संबंधानें जास्त कांहीं लिहिण्याची आवश्यकता नाहीं.

**श्रीपाद महादेव माटे.**

## हिच्या सांवलीलाही ते सलाम करीत

# दीपाबाई : १ :

'फ्लोरेन्स नाइटिंगेल' या थोर स्त्रीचा जन्म इ. स. १८२० सालीं इटली देशांत फ्लोरेन्स येथें झाला. नाइटिंगेल हें घराणें इंग्लंडचें; परंतु मंडळी घरची सुखवस्तु असल्यामुळें तिकडील पद्धतीप्रमाणें फ्लोरेन्सचे आईबाप निरनिराळ्या देशांत प्रवाससुखाचा अनुभव घेत असतां, फ्लोरेन्सच्या जन्माच्या वेळीं त्यांचा मुक्काम फ्लोरेन्स गांवीं होता. या गांवीं तिचा जन्म झाला, म्हणून आईबापांनीं गंमतीनें तिचें नांव 'फ्लोरेन्स' असेंच ठेवलें. वास्तविक पाहतां, फ्लोरेन्स हें नांव बायकांना ठेवीत नाहींत; पुरुषांना ठेवतात. परंतु या एका गंमतीच्या जोडीला दुसरी गंमत म्हणून वडिलांनीं मुलीचेंहि नांव फ्लोरेन्स असें ठेवलें. फ्लोरेन्सला एक वर्षानें मोठी वडील बहीण होती. तीहि अशीच प्रवासांत झालेली होती; व तिचें नांव 'पार्थिनोप्' असें होतें. या दोघींना 'पॉप' आणि 'फ्लो' अशीं लाडकीं नांवें मिळालेलीं होतीं. परदेशांत जन्मलेल्या या दोन सुंदर मुलींना बरोबर घेऊन आईबाप इंग्लंड देशांत परत आले.

नाइटिंगेल मंडळी नुसती सुखवस्तुच नव्हती. समाजांत आणि राजकीय उलाढालींत सुद्धां त्यांच्या शब्दाला विशेष प्रकारचा मान असे. इंग्लंडमधल्या मोटमोठ्या खानदानीच्या घराण्यांशीं त्यांचे शरीर-संबंध झालेले असून खुद्द राजघराण्याला आपलींशीं वाटण्यासारखीं जीं कांहीं कुळें होतीं, त्यांतहि त्यांचा अंतर्भाव होत असे. डर्बी-शायरमध्यें 'लीहर्स्ट' या नांवाचा त्यांचा एक सुंदर वाडा होता. तेथें उन्हाळ्यांच्या दिवसांत ही मंडळी राहत असत; आणि हिंवाळा आला, म्हणजे 'एम्ले' नांवाचा दुसरा एक राजवाडा दक्षिणेकडे असे, तेथें जाऊन राहत असत. त्या दिवसांत आगगाड्या निघालेल्या नव्हत्या. या गांवाहून त्या गांवाला जावयाचें, म्हणजे भाड्याच्या धमन्या असत. पण जे घरचे श्रीमंत, ते आपली स्वतःची धमनी ठेवीत. नाइटिंगेलच्या घरीं चौचाकी गाडी असून तिला चार घोडे जुंपीत असत. सडका बनत बनत बनलेल्या असल्यामुळें, प्रवासहि आतांच्या-

सारखा फारसा सुखकारक होत नसे. तथापि घरची गाडी आणि चार घोडे, हा इतमाम फार थोड्यांपाशीं असे.

आपण एवढे जहागिरदार, तर आपल्या मुली गांवांतल्या सामान्य लोकांचीं मुलें ज्या शाळेंत जातात, तेथें कशा धाडाव्या, असें नाइटिंगेल यांना वाटे. म्हणून शिक्षणाची व्यवस्था त्यांनीं घरींच केलेली होती. इतिहास, भूगोल, गाणें आणि इतर कांहीं विषय, हा शिक्षणाचा क्रम असे. शिक्षणाची ही अशी घरच्या घरींच व्यवस्था असल्यामुळें प्रवासामध्येंहि मुलींच्या शिक्षणांत कसलाहि खंड पडत नसे. हाताशीं मुबलक पैसा, आणि प्रवासाची अनिवार हौस यामुळें मुलेंमाणसें घेऊन नाइटिंगेल हे नेहमीं देशोदेशीं हिंडत राहत. या हिंडण्याचा शिक्षणाच्या दृष्टीनेंहि एक निराळाच उपयोग झाला. ज्या देशांत जावें, तेथील भाषा शिकावी, असें होऊं लागलें. मातृभाषेच्या जोडीला फ्रेंच, इटालियन, जर्मन अशा अनेक भाषा या बहिणीबहिणींना येऊं लागल्या. त्यांतल्या त्यांत धाकटी मुलगी 'फ्लोरेन्स' ही विशेष चलाख होती. म्हणून बापानें तिला लॅटिन आणि ग्रीक याहि भाषा शिकविल्या. ज्या गांवीं जावें, तेथला इतिहास वाचावा, पाहण्यासारखीं स्थळें पहावीं, लोकांच्या चालीरीती समजावून घ्याव्या, असा प्रकार वर्षानुवर्ष चाललेला असे. अशा प्रकारें आपल्या मुलींचें शिक्षण मोठ्या योग्य तऱ्हेनें चाललेलें आहे, असें पाहून बापाला मोठें समाधान वाटे; आणि तोहि नाना प्रकारच्या विषयांवर त्यांच्याशीं चर्चा करी; पण हें सर्व चालू असतां या चाणाक्ष गृहस्थाला एक बारीकशी गोष्ट उमगली होती.

'फ्लोरेन्स' ही अभ्यास चांगला करते, आणि ज्ञानार्जनाचीहि तिला हौस फार आहे, हें जरी खरें असलें, तरी तिची स्वाभाविक प्रवृत्ति आणि आवड ही कोणीकडे आहे, हेंहि त्याच्या ध्यानांत आलें होतें. ती अगदीं लहान असतांना इतर मुलींच्यासारखी, अर्थात् बाहुल्या घेऊनच खेळत असे; पण या खेळण्यांत इतर मुलींना न सुचलेला खेळ हिला सुचे. बाहुलीला कांहीं तरी लागलें, किंवा तिला ताप आला आहे आणि ती कण्हत आहे, अशी कांहीं कल्पना 'फ्लो' करीत असे. मग चिंध्यांचें अंथरूण करून त्याच्यावर बाहुलीला निजवावें, तिला औषध द्यावें, थोपटावें, असे सगळे प्रकार ही लहानगी मुलगी करीत असे. हळू हळू मोठी झाल्यावरसुद्धां घरांत कोणी आजारी पडलें, सैंपाकी, चपराशी, हुजरे, यांच्या घरीं कोणास कांहीं होत असलें, किंवा घरांतलीं गाई-घोडीं शिंकत-खोकत असलीं, किंवा कुत्रीं

केकाटत असलीं, तर हिचें विशेष लक्ष त्यांजकडे जाई. बाकीचीं इतकीं माणसें या सगळ्या चौकशा करावयास असतांना या लहान पोरीनें त्यांत मन घालावें, या गोष्टीचें आईबापांना मोठें नवल वाटे; पण याच नवलांतून पुढें मोठें जगप्रसिद्ध नवल उत्पन्न झालें.

फ्लोरेन्स सतरा वर्षांची झाली, तेव्हां सरासरी मानानें तिचें शिक्षण संपलें, असें म्हणावयास हरकत नाहीं. मुली वयांत आल्यानंतर त्यांनीं करावयाच्या म्हणून कांहीं गोष्टी असतातच. त्यांतहि ही थोर घराण्यांतील आणि खानदानीच्या सरदारी थाटांतील मुलगी. अर्थात् तेव्हांच्या चालीप्रमाणें तिचा वर्तनक्रम चालू झाला. ' छोट्या बाईसाहेब ' म्हणून तिला नोकरचाकर संबोधूं लागले. त्यांनीं आज्ञा केली असतां ती मानली पाहिजे, व त्यांच्या मर्जीचा कल पाहून वागलें पाहिजे, हें सेवकांच्या ध्यानांत येऊन चुकलें. आपल्या गांवांतील लोकांच्या अडीअडचणी काय आहेत, कोणी अनाश्रित माणूस कोठें आजारी होऊन पडलेलें आहे कीं काय, लोकांना बायबल शिकण्याची व्यवस्था आहे कीं नाहीं, अशांसारखीं सार्वजनिक स्वरूपाचीं कामेंहि सरदार लोकांच्या वयांत आलेल्या मुलींना करावीं लागत. फ्लोरेन्स हिचा स्वाभाविक कलच तसा असल्यामुळें, तिनें हीं कामें फार हौसेनें चालू केलीं. अनाश्रितांना आश्रय देणें, दुःखितांचें दुःख नाहींसें करणें आणि ' ज्यासि आपंगिता नाहीं त्यासि हृदयीं धरणें ' हा तिचा मनोधर्म होता. आणि म्हणून हीं तिचीं कामेंहि चांगलीं होऊं लागलीं. तथापि तिच्या मनाची हुरहूर आणि अस्वस्थता वाढतच चालली. तिला वाटे कीं, आपण करतों हा सगळा पोरखेळ आहे. दुःख पर्वताएवढें आहे, पण आपले दुःखनिवारणाचे यत्न जवापाडे आहेत. हें तिला जास्त जास्त पटूं लागलें व बोंचूं लागलें; आणि जीवितांतील सुखोपभोगांची व ऐषआरामांची तिला लाज वाटूं लागली.

सुखी घराण्यांतील मुलींची दिनचर्या म्हणजे ताटावरून पाटावर आणि पाटावरून ताटावर अशी असावयाची. सकाळच्या प्रहरीं नोकर-चाकर आपापल्या उद्योगास लागले कीं नाहीं, हें पाहावयाचें; मग टेबलांवर, फुलपात्रांत, किंवा खिडक्यांवर पुष्पगुच्छ किंवा फुलमाळा लावावयाच्या; मग कांहीं वेळ हातीं रंग घेऊन थोडी रंगवल्ली म्हणजे रांगोळी काढावयाची; कांहीं वेळानें मग कशिदा काढावयास बसावयाचें; किंवा धाकट्या भावाला गळपट्टा विणून द्यावयाचा; जेवणारी पाहुणेमंडळी कोण आली न आली, हें पाहून त्यांना ' या बसा ' करावयाचें;

संध्याकाळीं नट्टूनथटून नृत्यमंदिरांत नाचायला जावयाचें; आणि वर-खालीं, मागें-पुढें, आजूबाजूस कटाक्ष फेंकतां फेंकतां एखादा अनुरूप उमदा मनुष्य हस्तगत होतो का पाहावयाचें, असाच कार्यक्रम सरसकट मुलींचा असावयाचा. वहिवाटीप्रमाणें फ्लोरेन्सला हें सर्व करावें लागे. पण तिच्या आईबापांच्या व मैत्रिणींच्या हें ध्यानांत येऊन चुकलें होतें कीं, या पोरीचें मन या कामांत नाहीं. आई म्हणे कीं, "या बाईचें एकदां लगिन झालें, म्हणजे मी सुटलें!" बरें, लग्न होण्यास हरकत कांहींच नव्हती. ती आतां अगदीं पणांत आलेली होती. नाकाडोळ्यांनीं मोठी देखणी असून बुद्धीचें तेजहि तिच्या तोंडावर झळकत असे. ती अंगानें सडपातळ, उंचेली, आणि नाजूक असून घारे डोळे आणि भुरे सडक केस यांनीं तिच्या सौंदर्यांत भर पडली होती. डोळ्यांत विचारीपणाची झांक असली, तरी अत्यंत मधुर अशी हास्योन्मुखताहि तेथें दिसून येई. अशा मुलीला मागणी घालणारे न भेटले तरच आश्चर्य! पण खरी गोष्ट अशी होती कीं, तिला पाहतांच जरी सर्वांच्या मनांत तिच्या लग्नाविषयींचा विचार येई, तरी तिच्या स्वतःच्या मनांत मात्र तो विचार कधींच आला नाहीं.

होतां होतां आईनें एकदां लग्नाची गोष्ट प्रत्यक्षच काढली. ती आतां चांगली पंचवीस सव्वीस वर्षांची झाली होती. आईचा प्रश्न ऐकून फ्लोरेन्सनें विनयानें उत्तर केलें कीं, 'मला लग्न करावयाचें नाहीं; मला नर्स म्हणजे शुश्रूषिका व्हावयाचें आहे.' हें तिचें उत्तर ऐकून आई थक्कच झाली. नाइटिंगेल यांची मुलगी; आणि म्हणे ती 'सुईण होणार!' हें ऐकून तिला पराकाष्ठेचा अपमान व दुःख झालें. त्या वेळीं नर्सचा धंदा अत्यंत हीन समजत असत. हा पतकरणाऱ्या स्त्रिया अडाणी, मूढ, अभद्र बोलणाऱ्या, घाणेरड्या, वर्तनानें बेताल, दारुड्या आणि 'समाजांतील पडझड' म्हणून ज्यांना नांव देतां येईल, अशा असत. यांना वेतनहि सामान्य गडीमाणसांपेक्षां जास्त मिळत नसे; आणि समाजांत तर त्यांना कसलीहि प्रतिष्ठा नसे. आपली सोन्यासारखी पोर असल्या वाईट बायांच्या संगतींत जाणार, आणि त्यांचा धंदा करणार, हें ऐकून बापालाहि चैन पडेनासें झालें. वास्तविक पाहतां, खुद्द त्या धंद्यांत वाईट असें कांहींच नव्हतें; दुःखपरिहाराचें खिस्ती धर्मांतलें अत्यंत उदात्त तत्त्व त्याच्या बुडाशीं असल्यामुळें तो धंदा मान्यच ठरावयास हवा होता; पण प्रत्यक्ष स्थिति मात्र निराळी होती. खुद्द इंग्लंडमध्यें तरी त्याला कसलाहि संभावितपणा किंवा पवित्रपणा प्राप्त झाला नव्हता. आईबापांनीं

व नातेवाइकांनीं पुष्कळ सांगून पाहिलें; पण फ्लोरेन्स मुळींच बधेना. ती म्हणे मनुष्यमात्रावर उपकार करावयास या धंद्यांत उत्कृष्ट संधि मिळते; आणि म्हणून चांगल्या माणसांनीं त्यांत प्रवेश केला, तर त्याचें स्वाभाविक वैभव त्याला प्राप्त होईल.

आपलीं नित्याचीं कामें नीट रीतीनें करावीं, व उरलेला वेळ गरिबांचीं घरें धुंडाळण्यांत घालवावा, असें फ्लोरेन्स करूं लागली. काबाडकष्ट करणारे लोक, रोजंदारीनें खपणारे लोक, यांना आजारीपण आलें, तर त्यांची उस्तवास्त कोण करतो? त्यांनीं तसेंच विव्हळत पडावें, व औषधावांचून व अन्नपाण्यावांचून तडफडावें, अशी स्थिति असे. पण फ्लोरेन्स ही कोणाच्याहि भल्याबुऱ्या मताची पर्वा न करतां अशा लोकवस्तींत जाऊन आजाऱ्यांची शुश्रूषा करूं लागली. तिचें हें वेड जावें, म्हणून वडिलांनीं तिला प्रवासासाठीं परदेशीं धाडलें. पॅरिस, रोम अशांसारखीं शहरें व स्वित्झर्लंडमधील मनोरम देखावे पाहिल्यानें तिच्या वृत्तींत बदल पडेल, असें त्यांना वाटलें होतें. पण त्या त्यांच्या इलाजाचा परिणाम अगदींच विपरीत झाला. ती ज्या गांवीं जाई, तेथें जीं मोठमोठीं इस्पितळें असतील त्यांत जावें, व रुग्ण-शुश्रूषा करावयाच्या कोणत्या पद्धती तेथें चालू आहेत हें पहावें, असा क्रम तिनें आरंभिला. रोममध्यें तर कॅथॉलिक भगिनीमंडळानें चालविलेलें हें शुश्रूषेचें काम पाहून तिला फार आश्चर्य वाटलें. जर्मनीमध्यें ऱ्हाइन नदीच्या कांठीं कायझर्सवर्थ येथेंहि अशाच तऱ्हेचें मोठें नमुनेदार काम चालू असलेलें तिनें पाहिलें. पॅरिसमध्येंहि 'धर्म-भगिनी' म्हणून तिनें या कामाचा थोडासा अनुभव घेतला. आपल्या इंग्लंड देशांत मात्र अशा प्रकारची कांहीं संस्था नसावी, याची तिला चुटपूट लागून राहिली; व परत येतांच ती त्याच उद्योगास लागली.

याच सुमारास सिडने हर्बर्ट या तरुण आणि उदारमनस्क माणसाची व तिची मैत्री झाली. हा गृहस्थ मोठा रुबाबदार आणि पाहतांच लोकांच्या मनांत भरावा असा होता. या उभयतांची मैत्री जमत आहे, असें दिसतांच लोकांनीं निरनिराळीं अनुमानें काढावयास आरंभ केला. पण सिडने हर्बर्ट याचें लग्न आधींच झालेलें होतें; आणि शिवाय फ्लोरेन्स हिच्या मनांत लग्नाचा विचार सहसा येतहि नसे. वास्तविक स्थिति अशी होती कीं, फ्लोरेन्स हिचें मन जसें भूतदयान्वित असे, तसें हर्बर्ट याचेंहि असे. दोघांच्याहि मनाचा प्रमुख धर्म एकच होता; आणि म्हणून त्यांची मैत्री जमली. हर्बर्ट यानें फ्लोरेन्सनें मनांत धरलेला हेतु पसंत केला; इतकेंच नव्हे, तर तो सफल व्हावा, म्हणून तिला परोपरीचें साह्य केलें. त्याचें

उदार मन, थोर विचार, आणि सुरस भाषण यांचा फ्लोरेन्सच्या बापाच्या मनावरहि मोठाच परिणाम झाला होता. त्यानें नाइटिंगेल यांना सांगितलें कीं, 'या नर्सच्या कामांत वाईट असें कांहीं नाहीं. इंग्लंडमध्यें जरी त्याचें रूप हीन असलें, तरी खास युरोपांत या धंद्याचा महिमा मोठा आहे; इतका कीं, त्याची गणना धर्मकृत्यांत होते.' हळू हळू नाइटिंगेल यांचेंहि मन बदलूं लागलें; व फ्लोरेन्सला घरांतून फारसा विरोध राहिला नाहीं.

शुश्रूषिका म्हणजे नर्सेस तयार करावयाची संस्थाच आपण काढली पाहिजे, असें तिच्या मनानें घेतलेलें असल्यामुळें त्या संस्थेंत ज्या स्त्रिया येतील, त्यांना शिक्षण देण्याची आपली स्वतःची तयारी पाहिजे, हें ओळखून तिनें जर्मनी, फ्रान्स, इत्यादि देशांतील संस्थांत स्वतः शिक्षण घेतलें. जर्मनींतल्या संस्थेंत तर शिक्षण अगदीं कडकडीत असे. जी गरिबांची सेवा करावयास जाणार, तिनें स्वतः आपली राहणी गरिबीचीच ठेवावयास हवी, व हरतऱ्हेचे कष्ट करण्याची संवय लावून घ्यावयास हवी, हें धोरण ठेवून संस्थाचालकांनीं तेथील दिनचर्या अगदीं तापशाला साजेल अशीच ठेवलेली होती. सुप्रभातीं उठावें, सडासंमार्जन करावें, युक्त व परिमित आहार करावा, अध्यापिकांनीं दिलेली संथा नीट समजावून घ्यावी, जेथें कोठें रुग्णपरिचर्या करावयाची असेल तेथें ती सद्भावनेनें व आनंदी वृत्तीनें करावी, असें तेथील शिक्षण असे. तसेंच, शुश्रूषा किंवा परिचर्या हें जें हळूहळू शास्त्र बनत चाललें होतें, तेंहि अभ्यासावें अशी सक्ती असे. या शिक्षणाचा फ्लोरेन्सला फार उपयोग झाला. तिचें स्वतःचें मन मुळांत मोठें प्रतिभाशाली असून त्या विषयाच्या अविरत चिंतनानें शुश्रूषेविषयीं तिला नाना प्रकारच्या कल्पना सुचत. त्यांतच या शिक्षणाची भर पडल्यामुळें संस्था चालविण्यास तिला पूर्ण योग्यता प्राप्त झाली. लंडनला परत येऊन काय करतां येणें शक्य आहे, हें पाहून अधिक अभ्यासासाठीं ती पुन्हा पॅरिस शहराला गेली. याप्रमाणें स्वाभाविक प्रवृत्ति, धर्मबुद्धि, आणि शिक्षण यांचा उत्तम संयोग जमून फ्लोरेन्स ही आपल्या जीवितांतील प्रमुख कामाला सर्वथा पात्र झाली.

१८५३ या वर्षी लंडनमधील "रुग्ण-स्त्री-शुश्रूषा-मंदिर" या संस्थेचें काम तिनें आपल्या हातीं घेतलें. तेथें तिनें नाना प्रकारचे प्रयोग सुरू केले. आजाऱ्याची जागा, त्याचें अंथरूण-पांघरूण व त्याचें शरीर हीं अगदीं स्वच्छ ठेवावयास हवीं, असा दंडक तिनें घातला. वास्तविक, आपल्या आतांच्या कल्पनेप्रमाणें पाहतां, यांत नवीन

असें कांहींच नव्हतें! पण तेव्हां ही गोष्टहि, आणि इंग्लंडांतहि, नवीनच होती. स्वच्छता ठेवावयाची, तर हवा खेळती ठेवावयास हवी. मात्र तेव्हां पद्धत अशी असे कीं, दारें दपटून आंत रोग्याला ठेवावें! खोलीला खिडक्या असल्या, तर त्या बंदच ठेवावयास हव्या असें तत्त्व होतें! येथपासून फ्लोरेन्सला वादावादी करावी लागली. शेवटीं खिडक्या उघड्या ठेवाव्या असें ठरलें! यावरून कल्पना येईल कीं, केवढ्या क्षुद्र सुधारणेसाठींसुद्धां तिला झगडावें लागलें. पण तिच्या या नवीन उपायांचा व धोरणाचा उत्तम उपयोग होत आहे, असें ताबडतोब दिसूं लागलें. तिची कर्तबगारी पाहून किंग्ज कॉलेज हॉस्पिटलवर तिची नेमणूक करण्यांत आली. क्लोरोफॉर्मचा उपयोग नुकताच सुरू झाला होता; आणि रोग्याची विशेष प्रकारची बडदास्त ठेवावी, ही कल्पनाहि रूढ होऊं लागली होती. त्यामुळें रोग्यांना सुख लागूं लागलें होतें. या इस्पितळाचें काम तिच्या हातून मार्गास लागत आहे, तोंच एक अकल्पित प्रकार घडून आला.

इ. स. १८५४ सालीं क्रिमियन युद्ध सुरू झालें. काळ्या समुद्राच्या उत्तर किनाऱ्याकर क्रिमिया नांवाचें द्वीपकल्प आहे. तेथें इंग्रज व रशियन्स यांचें युद्ध जुंपलें. युद्धांत जखमी झालेल्यांना किंवा तळावर आजारी पडलेल्यांना जहाजांत घालून त्या समुद्राच्या दक्षिण किनाऱ्यावर आणीत; व बास्फोरस सामुद्रधुनीच्या पूर्व किनाऱ्यावर जें स्कुटारी म्हणून शहर आहे, तेथें त्यांना औषधपाणी करीत. हें शहर तुर्कांचें होतें. त्यांनीं इस्पितळांसाठीं मोठमोठे वाडे खालीं करून दिले होते. पण हीं घरें जुनीं व घाणेरडीं असत, व्यथितांच्या मानानें डॉक्टर अगदीं थोडे पडत. शुश्रूषिका किंवा परिचारिका अशा कोणी नव्हत्याच. इतकेंच काय, पण जखमा बांधावयास पुरेशा पट्ट्यासुद्धां मिळत नसत. या गैरव्यवस्थेचा दोष सेनापतीकडेच जातो. पण एकंदरींत सगळी व्यवस्था जितक्यास तितकीच असल्यामुळें कोणी कोणास बोल लावावा, असें होतें. या हयगयीचा परिणाम असा झाला कीं, प्रत्यक्ष लढाईत रशियनांच्या तलवारीनें जितके शिपाई मरत, त्यांपेक्षां शुश्रूषा नसल्यामुळें जास्त ज़खमी व आजारी हे मरत.

वर्तमानपत्रांनीं जेव्हां ही बातमी इंग्लंडांत फोडली, तेव्हां एकच हाहाःकार झाला; व आमच्या शिपायांना आपण असेच मरूं देणार का, असें सरकारास जो तो विचारूं लागला. फ्लोरेन्सचा मित्र सिडने हर्बर्ट हा या वेळीं युद्धमंत्री झालेला होता. त्यानें फ्लोरेन्स हिला ताबडतोब लिहिलें कीं, आतां राष्ट्राला तुमच्यासारख्या

हुशार व उदार सेविकेची आवश्यकता आहे. तिनें लागलीच होकार दिला. सरकारी हुकूमहि तिच्या हातांत लगोलग आला; आणि आपल्या पसंतीच्या अडतीस परिचारिका घेऊन फ्लोरेन्स ही स्कुटारीस जाण्याच्या तयारीस लागली!

फ्लोरेन्स नाइटिंगेल ही उच्चकुलीन सुस्वरूप कुमारी आपला मोठेपणाचा अभिमान सोडून, शिपायांच्या आडदांडपणाची भीति न बाळगतां, केवळ व्यथितांच्या शुश्रूषेसाठीं द्वीपांतरास जावयास निघाली आहे, ही वार्ता देशांत पसरतांच चारहि दिशांत तिची वाहवा होऊं लागली. उदार धनिकांनींहि योग्य ती सर्व मदत तिला केली. पण ख्रिस्ती धर्माच्या अमुक एका पंथाची ती आहे, आणि त्याच पंथाचीं सगळीं माणसें तिनें आपल्या तुकडींत गोळा केलीं आहेत, असा आरोप तिच्यावर बऱ्याच जणांनीं केला. लष्करी अधिकारी तर म्हणूं लागले कीं, हें पुरुषमाणसांचें काम आहे, यांत असल्या बायकामाणसांनीं विनाकारण कां पडावें? शेवटीं व्हिक्टोरिया राणीपर्यंत हे आरोप आणि ह्या कुरबुरी जाऊन पोंचल्या. तिला या कुत्सित लोकांचा अतिशय राग आला; आणि त्या सर्वांना झिडकारून लावून तिनें फ्लोरेन्स हिला प्रोत्साहनपर आशीर्वाद दिला आणि ह्या तिच्या उदार कृत्यांत तिला यश चिंतिलें. व्हिक्टोरियाच्या या साह्यामुळें फ्लोरेन्स हिचा मार्ग पुष्कळच सुकर झाला; व विशेष निर्भयपणानें ती आपल्या कामास लागली.

जखमी व आजारी यांना उपयोगी पडणाऱ्या सामानाचे गठ्ठे आपल्याच बरोबर न्यावे, असें तिनें ठरविलें. माहितगार लोक म्हणाले, 'कांहीं जरूरी नांहीं. स्कुटारी येथें सर्व कांहीं आहे.' पण त्यांच्या सांगण्याकडे दुर्लक्ष करून तिनें हे गठ्ठे आपल्याबरोबरच नेले; आणि स्कुटारीस पोहोंचल्यावर तिला दिसून आलें कीं, सामान आणलें हें फार बरें झालें. तेथील इस्पितळें पाहिल्यावर तिला अतिशय वाईट वाटलें. घराच्या खालूनच मोऱ्या गेलेल्या होत्या; आणि इस्पितळांतील सगळीं हवा त्या घाणीनें भरून गेलेली असे. भुईला इतके पोपडे आलेले, आणि भिंतीला भोकसे पडलेले होते, कीं उंदराघुशींच्या फौजाच्या फौजा रात्रंदिवस तेथें हिंडत असत. आजाऱ्यांच्या खाटा अशा खेटून घातल्या होत्या कीं, मधून सरकावयास वाटसुद्धां राहिली नव्हती. खिडक्याबिडक्यांविषयीं तर बोलावयास नको. शुश्रूषेचें सामान कांहींच नव्हतें. बशा, तसराळीं, रुमाल, साबण, चमचे, पळ्या यांतलें कांहींहि नव्हतें. रोग्याला इकडून तिकडे न्यावयाचें, म्हणजे दोघां–चौघांनीं त्याला उचलून दामटून न्यावयाचें इतकेंच; सरकगाड्या नव्हत्या, मोडलेलीं हाडें बांधावयास

कामट्या व पट्ट्या यांचें तर नांवहि नव्हतें. फार काय सांगावें, इतक्या आजारी लोकांना जेवूं घालावयाचें, तर स्वैपाकीणबाईंना पुरेसें सरपण तरी दिलें पाहिजे, इकडेसुद्धां कोणी लक्ष देत नसे. ही सगळी परिस्थिति पाहून फ्लोरेन्सला वाईट वाटलें. तरी ती नाउमेद झाली नाहीं. तेथील अधिकारीवर्गाच्या पसंतीची किंवा गैरपसंतीची पर्वा न ठेवतां आपल्या मैत्रिणींना बरोबर घेऊन ती झपाट्यानें कामास लागली. जमिनी खरवडून काढण्यापासून रोग्यांना आंघोळी घालणें, त्यांचे कपडे बदलणें, त्यांच्या तोंड धुण्याची व्यवस्था करणें, मलमपट्या बदलणें, खिडक्या-दारें मोकळीं राहिलीं आहेत कीं नाहींत तें पाहणें, भटारखान्यावरचे उद्धट आचारी दुखणाइतांना अर्धकच्च्याच भाकऱ्या देत आहेत कीं काय हें पाहणें, येथपर्यंतचीं सर्व कामें या बायांनीं आपल्या हातीं घेतलीं. तेथल्या त्या वतनदार अधिकाऱ्यांना फ्लोरेन्स तेथें आली, हेंच आवडलें नाहीं. शस्त्रवैद्य इ. तर म्हणूं लागले कीं, ही आमच्या कामांत विनाकारण ढवळाढवळ करते. सरकारी सामानसुमानावरचा अधिकारी गर्जून तक्रार करूं लागला कीं, ही बाई सरकारच्या सामानाची नासधूस करते. यामुळें तिच्या कामांत थोडा व्यत्यय येऊं लागला. पण तिचा वशिला थेट युद्धमंत्र्यापर्यंत होता, हें आपण मागें पाहिलेलेंच आहे. आणि खुद्द राणीसाहेबांनींहि तिला शाबासकी दिलेली होती. म्हणून तत्रस्थ अधिकाऱ्यांना जुमानण्याचें आपणांस फारसें कारण नाहीं, असें ती समजे. शिवाय ' लंडन टाइम्स 'चा बातमीदार, कीं ज्यानें इकडील हकीगतीचा भडका इंग्लंडांत उडविला होता, त्यानें वर्गणीच्या रूपानें जमा केलेला खूप पैसा फ्लोरेन्स हिला सहज मिळूं लागला. तसेंच, बरेंच सामानसुमान तिनें आपल्याबरोबर आणलेलें होतेंच. या साधनांच्या बळावर तिनें त्या जखमी लोकांची आणि दुखणाइतांची अशी उत्तम निगा राखली, कीं त्यांना खरोखरच सुख उत्पन्न होऊन ते तिला दुवा देऊं लागले.

एकदां असें झालें कीं, इस्पितळांसाठीं सरकारांतून तिनें सदरे मागविले. थोड्याच दिवसांत सत्तावीस हजार सदऱ्यांचे गठ्ठे स्कुटारीस येऊन पडले. अधिकारी लोक हे गठ्ठे आज फोडतील, उद्यां फोडतील, असें फ्लोरेन्सला वाटत होतें. पण त्या निगरगट्ट अधिकाऱ्यांनीं शुद्ध चालढकल चालविली. शेवटीं संतापून जाऊन बाईनें सगळा अधिकार आपल्या हातीं घेतला; व सदऱ्यांचे गठ्ठे फडाफड फोडून तिनें ते दुखणाइतांना वांटून टाकले. इस्पितळाचे अधिकारी बऱ्या होत चाललेल्या शिपायांनासुद्धां रोग्याचेंच अन्न देत असत. त्यामुळें त्यांना लवकर शक्ति येत नसे.

तिनें आपल्या पैशांतून निराळे पौष्टिक पदार्थ तयार करून ते त्यांना देण्याचा परिपाठ पाडला. मुदपाकखाना, धुवणखाना, स्नानगृहें, इत्यादींवर सक्त नजर ठेवून तिनें जिकडे तिकडे लखलखाट करून टाकला. यामुळें 'इस्पितळ म्हणजे नरकपुरी' हा शिपायांचा समज साफ बदलला; आणि आश्चर्य हें कीं, हयगय, उपासमार, साधनांचा अभाव, इत्यादींमुळें, ती येण्याच्या आधीं शेंकडा पंचेचाळीस रोगी मरत असत, ते तिचें काम सुरू झाल्यावर शेंकडा तीनच मरूं लागले ! हें पाहतांच डॉक्टर लोक, अधिकारी, सेनापति या सर्वांचे डोळे खाडकन् उघडले; आणि आपण स्वतः माणसें नसून हैवान आहों, आणि आपण जिला केवळ हिडिसफिडिस करीत होतों, ती उगीच कोणी साधी स्त्री नसून मनुष्यमात्राच्या कल्याणासाठीं स्वर्गांतून आलेली देवांगनाच आहे, असें त्यांस वाटूं लागलें !

तेथील अंमलदारांना जरी तिचें महत्त्व अशा रीतीनें पटूं लागलें, तरी हातांतील सत्ता सोडावयास ते यत्किंचितहि कबूल होईनात. पण आपल्या कामाची उपयुक्तता ज्यांना पटावयाची, त्यांस पटून चुकलेली आहे, याची जाणीव फ्लोरेन्सला असल्यामुळें या अधिकाऱ्यांचा विरोध ती केवळ धुडकावून लावूं लागली. शिंवाय, येथील एकंदर हकीगतीचीं सविस्तर पत्रें तिनें वेळोवेळीं सिडने हर्बर्ट याला लिहिण्याचा प्रघात ठेवला. यांत काय हवें, किती हवें, इत्यादि पाढा ती वाचीत असे; व तिच्या मागणीप्रमाणें सामानसुमानहि भराभर येत असे. अर्थात् तिच्या रुबाबापुढें अधिकारी लोक अगदीं मालवल्यासारखे झाले. कपडे करणें, रोजची देखरेख ठेवणें, सामानसुमान पुरविणें, हवें असेल तें खरेदी करणें, इत्यादि सगळीं खातीं तिनें अगदीं बांधून टाकलीं; आणि त्यांच्या कामाला अशी कांहीं शिस्त लावून दिली कीं, तिच्या त्या पद्धति अजून चालू राहिल्या आहेत. खाणेंपिणें, वस्त्रप्रावरण आणि स्वच्छता, इत्यादींची योजना अंमलांत आलेली आहे, हें पाहून आजारी किंवा जखमी शिपायांच्या मनाला कांहीं विरंगुळा प्राप्त व्हावा, म्हणून तिनें बारीक बारीक वाचनालयें सुरू केलीं. स्वाभाविकपणेंच घाणेरड्या चकाट्या पिटण्याऐवजीं चांगला मजकूर वाचावयास किंवा ऐकावयास सांपडत आहे, असें दिसतांच त्या लोकांना फारच आनंद झाला. बापडे लष्करी अधिकारी मात्र जोरानें तक्रार करूं लागले कीं, ही बाई या शिपायांना बिघडविणार ! शिपायांचा आणि वाचनाचा काय संबंध !

ती एवढ्यावरच थांबली नाहीं. ' आपला पगार तुम्ही दारूंत खर्च करूं नका ' असें ती शिपायांना सांगू लागली. त्यांचे शिल्लक पैसे बँकेंत ठेवण्याची तिनें व्यवस्था केली, किंवा त्यांचीं जीं बायकामुलें ओढगस्त स्थितींत होतीं, त्यांच्याकडे ती पाठवूं लागली. या तिच्या कामगिरीमुळें सगळे रुग्ण लोक तिला देवता समजून भजूं लागले. दिवसाच्या कांठीं वीस वीस तास ती काम करीत असे. रात्रीच्या वेळीं सर्व निजानीज झाल्यावरसुद्धां हातांत कंदील धरून ही दुःखितांची परामर्शी स्त्री, चार चार मैल पसरलेल्या खाटांच्या रांगांतून, कोणास ताप आला आहे, कोण कण्हत आहे, कोणास काय हवें, हें पाहत हिंडत असे. हातांत दिवा घेऊन ती येऊं लागली, म्हणजे या **दीपाबाईस** पाहून शिपायांना अतिशय हर्ष होई; आणि तिची सांवली जरी त्यांच्या अंथरुणावर पडली, तरी त्या सांवलीला हात लावून ते सलाम करीत; आणि म्हणत, " या माउलीनें आमच्या दुखण्यांतून आम्हांला वांचविलें; नाहीं तर आम्ही आमच्या जिवाला आणि बायकामुलांना केव्हांच मुकलों असतों. खरोखर ही येथें येण्याच्या आधीं या इस्पितळांत शिव्याशाप आणि अचकटविचकट बोलणें यांशिवाय दुसरें कांहींच ऐकूं येत नसे. पण आतां आम्ही लोक प्रार्थना करतों आणि परमेश्वराचे गुणानुवाद गातों. " अशा रात्रीच्या वेळीं सुद्धां एखाद्या शिपायाला आपल्या घरीं पत्र लिहावेंसें वाटलें, तर ती त्याचें पत्रहि लिहून देत असे !

एकदां असें झालें कीं, आपलें काम केवळ इस्पितळापुरतें ठेवावें, हें तिला बरें वाटेना. प्रत्यक्ष रणांगणावर काय चालतें, हें पाहण्याची इच्छा तिला झाली. म्हणून खुद्द क्रिमिया द्वीपकल्पांतच ती गेली. स्कुटारी गांवीं शिपाई लोकांच्या व्यवस्थेची हयगय दिसून आली होती; तशीच तेथेंहि दिसून आली. तिच्या देहस्वभावाप्रमाणें तिनें येथेंहि अतोनात कष्ट केले. त्या द्वीपकल्पांत जेवढीं म्हणून लहान लहान इस्पितळें होतीं, तेवढीं सगळीं तपासून पाहण्याचा तिनें निश्चय केला. जेथें गाडींतून जातां येईल, तेथें गाडींतून जावें, गाडीवाट नाहीं तेथें घोड्यावरून जावें, आणि जेथें घोडेहि जाण्यासारखे नसत, तेथें पायींच जावें, असा क्रम तिनें ठेवला. मुलूख खडकाळ आणि वैराण असल्यामुळें तिला शरीरकष्ट अतिशय झाले. त्यांतच केव्हां बर्फ पडावें किंवा बर्फासारखे गार वारे सुटावे; पण कसलीहि दरद न बाळगतां एकटीनें प्रवास करावा, व शिपायांचे हाल कसे कमी होतील, याची विवंचना मात्र सोडूं नये, असें काम अव्याहत चाललेलें होतें. तीन वेळां ती

प्रत्यक्ष रणांगणावरून जाऊन आली. शेवटीं तिनें सरकारांत लिहून धाडलें कीं, दारूगोळा आणि कवाईत यांची शिपायांना जितकी आवश्यकता आहे, तितकीच ताज्या अन्नाचीसुद्धां आहे; आणि अधिकाऱ्यांच्या खणपटीस बसून तिनें तीहि सुधारणा घडवून आणली. पण अशा प्रकारें दुखणाइतांची आणि जखमी झालेल्यांची निगा राखतां राखतां तिला स्वतःलाच दुखणें येऊं लागलें. ताप येतां येतां तो इतका येऊं लागला कीं, ही आतां जगत नाहीं, असें लोकांना वाटूं लागलें. तिनें चालविलेल्या अखंड सेवेची वार्ता 'टाइम्स्' व इतर पत्रें यांच्या द्वारां सगळ्या इंग्लंडांत दुमदुमून राहिलेली होती; व त्यामुळें इंग्लंडची ही संरक्षक देवता आहे, असें लोकांना वाटूं लागलें होतें. म्हणून तिला जिवावरचें दुखणें आलें आहे, हें वर्तमान इंग्लंडमध्यें येऊन थडकलें, तेव्हां सर्व देश तिच्यासाठीं हळहळूं लागला. सुदैवानें तिच्या दुखण्याला उतार पडला; व हळूहळू तिला बरें वाटूं लागलें. पण दुखण्यानें तिच्या डोक्याचे केस गळाले; आणि तिची प्रकृति जी एकदां ढासळली, ती पहिल्यासारखी पुन्हां कधींच झाली नाहीं. तिचें बरें आहे असें ऐकून लोकांनीं सुखाचा उच्छ्वास टाकला; आणि राष्ट्रावरचें संकट टळलें, म्हणून त्यांनीं देवळांदेवळांतून परमेश्वराचें नामसंकीर्तन केलें. खुद्द व्हिक्टोरिया राणीनें तिच्या समाचारासाठीं पत्रें लिहिलें; आणि 'बाई, तुम्ही परत आलांत, म्हणजे तुम्हांला भेटावयास मला किती आनंद होईल म्हणून सांगूं!' असे उद्गार काढले.

थोडें बरें वाटतांच तिनें आतां इंग्लंडाला परत जावें, म्हणून अधिकाऱ्यांनीं आग्रह धरला. परंतु तिनें स्वच्छ सांगितलें कीं, क्रिमियांत एक तरी शिपाई आहे, तोंपर्यंत मी येथून हालणार नाहीं; माझें कांहीं बरेंवाईट झालें तरी चालेल. पण सुदैवानें लवकरच युद्ध आटोपलें आणि मांडलेल्या कामाच्या पसाऱ्याची चार महिन्यांत आवरासावर करून फ्लोरेन्स ही घरीं परत जाण्यास निघाली. ती परत येणार, हें ऐकून सर्व राष्ट्राला कृतज्ञतेचें भरतें आलें! तिला कांहीं अहेर करावा, म्हणून लोकांनीं वर्गणी केली; ती आठ लक्ष रुपये भरली! किनाऱ्यावर उतरतांच आणि तिच्या घरच्या मार्गावर तिचा जाहीर सत्कार करावा, म्हणून लोकांनीं व्यवस्था केल्या; पण ह्या विनयशील स्त्रीनें आडवाटेनेंच घराकडे कूच केलें.

राष्ट्रानें बक्षिस दिलेलें आठ लक्ष रुपये खर्ची घालून नर्सेसना शिक्षण देण्याची उत्कृष्ट शाळा तिनें घातली. नंतर १८५८ सालीं 'ब्रिटिश सैन्याचें आरोग्य' या विषयासंबंधानें तिनें एक आठशें पानांचा अहवाल प्रसिद्ध केला. यांत तिनें

नमूद केलेल्या सूचनांचा विचार करण्यासाठीं सरकारनें एक कमिशन नेमलें; अशा रीतीनें एका सामान्य स्त्रीनें हातीं घेतलेल्या या प्रश्नाला सरकारी राज्यकारभारांत एका मोठ्या खात्याचें महत्त्व प्राप्त झालें. ही इस्पितळ-सुधारणेची चळवळ व नाइटिंगेलचें नांव हीं सर्व युरोपभर पसरलीं; आणि नाइटिंगेल ही युरोपांतील स्त्रीजातीचा अलंकार होऊन बसली.

तिची प्रकृति क्रिमियांतच रोडावली होती. तरी खुट्टुरुटू करीत ही स्त्री वयाच्या नव्वदाव्या वर्षापर्यंत जगली ! सगळें राष्ट्र तर तिला भजत होतेंच; पण खुद्द व्हिक्टोरिया राणीसुद्धां तिची मैत्रीणच झालेली होती. १८०७ सालीं आजपर्यंत कोणाहि स्त्रीला न मिळालेला, 'ऑर्डर ऑफ मेरिट'चा मान एडवर्ड बादशहानें तिला दिला; व लागलीच पुढल्या वर्षी 'फ्रीडम ऑफ द सिटी ऑफ लंडन' हा मान देऊनहि त्यानें तिचा गौरव केला. अशा रीतीनें आपलें सर्व आयुष्य मानव्याच्या सुखासाठीं वेंचून आणि त्याच्या कृतज्ञतेचा आनंदानें स्वीकार करून ही **'दीपाबाई' फ्लोरेन्स नाइटिंगेल** १९१० सालीं मरण पावली.

• • •

## हिनें नवऱ्याला शत्रूच्या तावडींतून सोडविलें !

# मादाम चँग-कै-शेक : २ :

अमेरिकेंतील मॅसॅच्युसेटस् संस्थानांतील बोस्टन शहरीं, एका चिनी व्यापाऱ्यानें रेशमी कापडाचें एक मोठें दुकान थाटलें. आपल्याला अमेरिका जितकी दूर वाटते, तितकी चिनी लोकांना वाटत नाहीं. आपल्या देशाचा किनारा सोडून, प्रशान्त सागर–पॅसिफिक ओशन्-ओलांडला, कीं त्यांच्या पायांना अमेरिकेचीच भूमि लागते. अर्थात् कांहीं चिनी धाडशी व्यापारी अमेरिकेंत जाऊन वखारी घालून बसले होते. त्यांतच सूंग शेटजींची गणना होत असे.

रेशमाची पैदास चीन देशांत फार प्राचीन काळापासून होत आली आहे. चीन देशांतील रेशमी कापड महाभारतकालींसुद्धां आपल्या ओळखीचें झालेलें होतें. आधुनिक कालांत, अमेरिकेची ओळख झाल्याबरोबर रेशमी तागे हाताशीं घेऊन, अमेरिकन शहरांतील बाजारांत जाऊन बसावें, ही इच्छा साहसी चिनी व्यापाऱ्यांना व्हावी, हें स्वाभाविक होतें.

सूंग शेटजींबरोबर त्यांचा एक छोटासा पुतण्याहि गेला होता. या पुतण्याला वाटे कीं, आपण शाळा–कॉलेजांत जाऊन शिकावें; परंतु, चुलत्याची इच्छा अशी कीं, यानें दुकानांत बसावें; आणि एका दामाचे दोन दाम कसे करतां येतील, ही विद्या आपल्याकडून शिकावी. चुलत्यानें जों जों आग्रह करावा, तों तों पुतण्या दुकानदारीचा जास्त जास्तच तिरस्कार करूं लागला. चुलता आपला हट्ट सोडीना; आणि पुतण्याचें लक्ष तर दुकानाकडे लागेना !

शेवटीं पुतण्यानें एक निराळीच वाट धरली. एके दिवशीं हा बारा वर्षांचा पोरगा कोणाला नकळत दुकानांतून बाहेर पडला; आणि तडक बोस्टन शहराच्या बंदराला गेला. चुलत्याच्या कचाट्यांतून सुटण्याचा एकच मार्ग त्याला सुचला. एखाद्या जहाजांत बसून लांब कोठेंतरी पळून जावें, आणि तेथें शाळा-कॉलेजांत जाऊन सुशिक्षितांत मोडूं लागावें, अशी ओढ त्याला लागली होती. बंदरांत जाऊन

हा मुलगा एका जहाजांत दडून राहिला. त्याला माहीत होतें कीं, जहाज बंदरांतून लवकरच बाहेर पडणार आहे.

जहाज नेमकें कोणत्या गांवाला जाणार आहे, हें त्या छोकऱ्याला माहीत नव्हतें. पण चुलत्याच्या दुकानांतून निसटत आहों, एवढ्यावरच तो संतुष्ट होता. या चिनी मुलाकडे जोन्सचें लक्ष गेलें; आणि बिगरपरवाना प्रवास करणाऱ्या या मुलाला त्यानें आपल्या खोलींतील कांहीं सटरफटर कामावर लावून घेतलें.

जोन्स हा एका जहाजाचा तांडेल होता हें खरें; पण त्याचें मन ख्रिस्ती धर्माच्या प्रसाराकडे लागलेलें असे. त्याला वाटलें कीं, हें एक बरें कोंकरूं आपल्या हातीं लागलें आहे; याला ख्रिस्ती धर्माच्या कथा सांगाव्या; आणि एके दिवशीं बाप्तिस्मा देऊन टाकावा. मग रोज रात्रीं, तो या पोराला बायबल वाचून दाखवूं लागला. होतां होतां, उत्तर कॅरोलिना परगण्यांतील विलविंग्टन् बंदराच्या धक्क्याला जोन्सचें जहाज येऊन लागलें. गांवांत येऊन, जोन्सनें हा बारा वर्षांचा चिनी मुलगा एका ख्रिस्ती उपाध्यायाच्या हवालीं केला. हेतु हा कीं, या उपाध्यायानें त्याला ख्रिस्ती धर्माची दीक्षा द्यावी.

जोन्सच्या इच्छेप्रमाणें सर्व कांहीं घडून आलें. पोरानें आग्रह धरला कीं, घराण्याचें सूंग हें नांव जरी शिल्लक ठेवावयाचें असलें, तरी चार्ली जोन्स हें आपल्या उपकारकर्त्याचें नांवच आपल्याला देण्यांत यावें. उपाध्यायानें त्याच्या इच्छेला मान दिला; आणि त्याचें नांव चार्ली जोन्स सूंग असें ठेवलें.

परंतु या मुलाला ख्रिस्ती बनविल्यानेंच आपलें काम संपलें, असें त्या उपाध्यायाला वाटेना. त्याला वाटूं लागलें कीं, या मुलाला धर्माचें अधिक अधिक शिक्षण द्यावें. ख्रिस्ती धर्मप्रसारासाठीं त्याला चीन देशांत परत धाडावें; आणि त्याच्या द्वारां चीन देशांत जिकडे तिकडे आपल्या धर्माचा प्रसार करवावा. परंतु, हें धर्मशिक्षणाचें काम त्या उपाध्यायाच्यानें तेथेंच होण्यासारखें नव्हतें. म्हणून सूंग याला बरोबर घेऊन, हा उपाध्याय डरहॅम येथें आला. तेथें जनरल कार या नांवाचा एक बडा कारखानदार होता. मिळत असलेल्या पैशाचा उपयोग चांगल्या कामांत सढळ हातानें करावा, अशी या गृहस्थाला हौस असे. उपाध्यायानें सूंग याला जनरल कारच्या हवालीं केलें; आणि सांगितलें कीं, 'मेथॉडिस्ट पंथाच्या ट्रिनिटी कॉलेजांत याला तुम्ही घाला; आणि याचा सर्व खर्चवेंच तुम्ही चालवा.

जनरल कार यानें हें काम खुषीनें हातीं घेतलें. पण या चिनी मुलाच्या मनाची घडण कांहीं निराळीच झालेली होती. घरच्या थाटावरून सूंगच्या ध्यानांत आलें कीं, जनरल कार ही मोठी श्रीमंत आसामी असली पाहिजे. त्याला हेंहि दिसून आलें कीं, उपाध्येबुवांची छाप जनरल कारवर मोठीच आहे. आणि म्हणून तो आपलें शिक्षण चांगल्या प्रकारें करील. पण या श्रीमंत घरीं फुकट खात बसावें, आणि त्याच्या पैशावर कॉलेजचा खर्च चालवावा, ही गोष्ट त्याला पसंत पडेना. जनरल कार नको नको म्हणत असतांना, पुस्तकें विकण्याचा एक स्वतंत्र धंदा त्यानें चालू केला; आणि त्यांतून तो आपला शिक्षणाचा खर्च भागवूं लागला. पुस्तकांचा बोजा पाठीवर घ्यावा, आणि दारोदार हिंडून गिऱ्हाईक गांठावें, असें सुद्धां त्यानें केलें. सुताचे टांगते झोंपाळेहि त्याला विणतां येत असत. हे विकूनहि, तो आपल्या आद्यांत भर घालूं लागला.

असें दिसतें कीं, शिक्षणाचें काम यथातथाच झालें. पण चिनी प्रकृतीला मानवणारा व्यापार मात्र त्यानें चांगला चालू केला. शेवटीं, स्वदेशांत जावें, आणि मोठा व्यापार-धंदा सुरू करावा, असें त्याच्या मनानें घेतलें. आणि हा खिस्ती झालेला तरणा मुलगा थोडासा प्रौढ होऊन स्वदेशाला परत आला.

एवढ्या काळांत त्याला अमेरिकन बाजारपेठांची माहिती चांगली झालेली होती. म्हणून अमेरिकेंतील व्यापाऱ्यांशीं बोलणेंचालणें करून त्यानें शांघाय येथें अमेरिकन यंत्रसामुग्रीचें एक मोठें दुकान काढलें; आणि थोड्याच दिवसांत तो चांगला गबर बनला.

पुढें याच्या मुलींनीं मोटमोठ्या लोकांशीं लग्नें केलीं. पण केवळ श्रीमंत बापाच्या मुली म्हणून त्यांना हीं स्थळें मिळालीं असें नव्हे. सूंग यानें त्यांना उत्तम शिक्षण दिलेलें होतें. चीन देश मागासलेला, आणि सूंग स्वतः खिस्ती झालेला; म्हणून त्यानें आपल्या तीनहि मुलींना शिक्षणासाठीं अमेरिकेंत पाठवून दिलें.

मे—लींग हिचें शिक्षण जॉर्जिया संस्थानांतील वेस्लेयन् कॉलेजांत झालें. परंतु, तिला पदवी मिळाली, ती मॅसॅच्युसेटस् संस्थानांतील वेलस्ले कॉलेजांतून. पदवी मिळाली, तेव्हां मे-लींग हिचें वय अवघें एकोणीस वर्षांचें होतें. बाप खिस्ती; तेव्हां मुलीहि अर्थातच खिस्ती झाल्या; आणि अमेरिकेंत आधुनिक विद्येचा झालेला प्रकर्ष सूंग यानें पाहिलेला असल्यामुळें, फार लहानपणींच त्यानें या पोरींना

अमेरिकेंत पाठवून दिलें होतें. स्वाभाविकपणेंच, चिनी भाषा, चिनी संस्कृति यांचा गंधहि या मुलींच्या ठिकाणीं नव्हता.

मेलिंग सुंदर इंग्रजी बोले; बायबलांतील संदर्भ तिच्या भाषणांत येत; आणि धर्मांतील तत्त्वांचें मर्महि ती समजावून सांगे. मुख्यतः ख्रिस्ती धर्मांतील भूतदयेचें तत्त्व तिला फारच पटलेलें होतें. जें कोणी रंजले–गांजले असतील, त्यांना आपलें म्हणावें, अशी तिच्या मनाची ठेवणच बनून गेली होती. चिनी संस्कृति आणि चिनी जीवन यांची पुरेशी माहिती तिला झालेली नव्हती. म्हणून स्वदेशीं परत जातांना ती एकदां म्हणाली, 'मी चीन देशांतील खरी; पण नाक-डोळे सोडून दिले, तर माझ्या ठिकाणीं चिनीपणाचें कोणचें लक्षण राहिलें आहे ?' मेलिंगचें हें म्हणणें अगदीं बरोबर होतें.

सूंगच्या ठिकाणीं कितीही प्रखर देशभिमान असला, तरी जीवनांत आधुनिकता आणल्याशिवाय, देशाची प्रगति कधींही व्हावयाची नाहीं, हें त्याला कळून चुकलेलें होतें. आणि म्हणूनच त्यानें आपल्या मुलींना येवढ्या लहान वयांत परद्वीपांत शिक्षणासाठीं धाडलेलें होतें. मेलिंगच्या ठिकाणीं सुद्धां स्वदेशाचा मोठा ओढा होताच; पण आधुनिक कल्पनांचा प्रसार स्वदेशांत झपाट्यानें केल्याशिवाय तेथील लोकांचें खरें ऊर्जित साधवयाचें नाहीं, ही तिची पक्की खात्री झाली होती.

चीन देशांत आल्यावर तर 'हें चित्र पहा आणि तें चित्र पहा' हाच प्रश्न तिच्या मनापुढें सारखा येऊं लागला. अमेरिकेंतील स्वच्छतेचें स्मरण झालें, म्हणजे स्वदेशांत पसरलेल्या घाणीची तिला लाज वाटे. अमेरिकेंतील आरोग्य तिनें पाहिलेलेंच होतें. त्या मानानें पाहतां, आपले चिनी बांधव केवळ रोगग्रस्त आहेत, असेंच तिला वाटूं लागलें. अमेरिकेंतील सर्वच माणसें भर पोटीं काम करतात, कोणाला अन्नाची ददात नाहीं, हें तिनें पाहिलेलें होतें. येथें स्वदेशांत बघावें, तर जिकडे तिकडे बेकारी आणि उपासमार माजलेली तिला दिसूं लागली. जर स्वदेशाची सेवा करावयाची, तर घाण, रोगराई, आणि उपासमार यांचा नायनाट कसा होईल हें पाहावयाचें, असें या पोरीनें ठरविलें.

दरम्यान चीन देशांत एक मोठी चमत्कारिक घटना घडून आली होती. सन्यत्सेन यानें मांचू घराणें उलथून पाडलें होतें, व लोकशाही प्रथापित केली होती, हें खरें; तरी, राजशाहीच्या अभिमानी लोकांचा बीमोड अजून झालेला नव्हता; आणि लोकशाहीचा अभिमान पुरेसा प्रखर बनला नव्हता. राजकुलाच्या अभिमानी

लोकांनीं जमवाजमव करून बंड केलें; आणि सन्यत्सेन याला कांहीं काळपर्यंत जपान देशांत पळून जावें लागलें. आपत्तींत मेलिंगचा बाप सन्यत्सेनबरोबर जपानांत गेला होता.

सूंग याचा पेशा व्यापाऱ्याचा होता खरा; पण देशांत सुरू झालेली लोकशाहीची झटापट नित्य पाहिल्यावर आपणही सन्यत्सेनला मदत करावी, असें त्याच्या मनानें घेतलें होतें; आणि म्हणून छापखान्याचा एक स्वतंत्र धंदा काढून क्रांतिकारक वाङ्मयाचा जोराचा फैलाव त्यानें सुरू केला होता.

तीनही मुली उत्तम प्रकारचें शिक्षण घेऊन अमेरिकेंतून परत आल्या; तेव्हां स्वदेशाची मागासलेली स्थिति तर त्यांच्या मनाला सारखी बोंचूं लागलीच; आणि घाण, अज्ञान, आणि उपासमार या आपत्ती घालवल्या पाहिजेत, असें तर त्यांना वाटूं लागलेंच; पण राजकारणाची उडालेली चमत्कारिक धमाल पाहून त्या अगदीं चकित होऊन गेल्या. आपला बाप एका बलाढ्य नेत्याच्या ध्येयवादांत सामील झाला आहे, आणि त्याला साहाय्य करण्यासाठीं आपलें सर्वस्व त्यानें पणाला लावलें आहे, हें पाहून त्यांना अतिशय आनंद झाला. या उपवर मुलींनीं राजकारणांत प्रवेश करून तीन मोठ्या पुरुषांशीं लग्नें करून टाकलीं.

चुंगलिंग हिनें डॉ. सन्यत्सेन याच्याशीं लग्न केलें. सन्यत्सेन हा कोण हें आतां आपल्याला माहित झालेलें आहे. तिची धाकटी बहीण ईलिंग हिनें डॉ. कुंग याच्याशीं लग्न केलें. कुंग हा मोठा हुशार माणूस असून चीन देशाचा अर्थमंत्री झालेला होता. चिनी इतिहासांत आणि धर्मसंस्थेंत गाजलेला जो कॉन्फ्यूशियस् त्याच्या वंशांत हा जन्माला आलेला होता. तिसरी मुलगी मेलिंग हिनें चँग-कै-शेक याच्याशीं लग्न केलें. या चँग-कै-शेकचें नांव सध्या जरी थोडें मागें उरलेलें असलें, तरी चाळीस कोट लोकांच्या नशिबाचा विधाता ही पदवी त्यानें एकदां प्राप्त करून घेतली होती.

मेलिंग हिनें चँग-कै-शेकशीं लग्न केलें, असें आतांच सांगितलें; पण हा योग जमून येणें दोघांनाही फार अवघड गेलें. मेलिंग ही अर्थातच ख्रिस्ती होती; आणि अमेरिकेंत राहिल्यानें समता, स्वातंत्र्य, आणि बंधुभाव हा घोष तिनें हजारदां ऐकलेला होता. इतकेंच नव्हे तर, हा घोष व्यवहारांत यावा, म्हणून कडोविकडीचा सामना करावा लागतो, हेंहि तिनें अमेरिकेंत पाहिलेलें होतें.

चँग-कै-शेक हा सन्यत्सेनचा उजवा हात होता; आणि पुढें तर जपानी साम्राज्यवाद्यांना स्वदेशांतून पिटाळून देण्याच्या कामीं यानें जिवाचें रान करून घेतलें होतें. सन्यत्सेन आणि त्याचें सरकार चीन देशाच्या दक्षिणेकडे येऊन बसलें होतें. शांघाय येथें डॉ. सन्यत्सेन आला असतांना त्याच्याबरोबर चँग-कै-शेकही आला होता. सूंगच्या घरींच या तिघांची गांठ पडली.

चँग-कै-शेक व मेलिंग यांची दृष्टादृष्ट झाली; आणि पुढें कांहीं वर्षांनीं घडलेल्या त्यांच्या विवाहाचें प्रीतिबीज याच वेळीं त्यांच्या मनांत रुजलें. चँग-कै-शेक याचें लग्न त्याच्या आईनें लहानपणींच करून दिलें होतें. पण या बायकोशीं त्यानें काडीमोड करून टाकली; आणि कांहीं वर्षेंपर्यंत तो सडाच राहिला. लोक एक-मेकांत असेंही कुजबुजत कीं, कॅन्टन शहरीं दोन बायांना यानें आपल्या नादी लावलें; पण त्यांच्याशीं यानें लग्न मात्र केलें नाहीं. पण ही बाब सोडली, तर देशसेवा, समरचातुर्य, पुढाऱ्यावरची निष्ठा आणि साहसवृत्ति या त्याच्या गुणांचा जयघोष सर्व चीनभर चालू होता.

मेलिंगच्या आईला ही गोष्ट बिलकुल पसंत पडेना कीं, आपल्या मुलीनें असल्या काडीमोड केलेल्या आणि खिस्ती नसलेल्या माणसाशीं लग्न करावें. बरें, मेलिंग ही आईचें मत बाजूला सारून लग्नाला सिद्ध होईल असें म्हणावें, तर तेंहि होईना. पांच वर्षेंपर्यंत चँग हा मेलिंगच्या आईच्या विनवण्या करीत होता कीं, ' कसेंही करा आणि लग्नाला परवानगी द्या. ' पण ती म्हातारी परवानगी तर देईचना, उलट चँगशी दोन शब्द बोलण्याचें सुद्धां ती नाकारूं लागली. एकदां ही बाई जपानला गेली असतांना, चँग तिकडे गेला; आणि त्यानें तिची आर्जवें केलीं. तिला वाटे कीं, कदाचित् याची पहिली बायको अजूनही याच्याकडे येईल, शिवाय हा खिस्ती धर्माचा द्वेष करतो. चँगनें नाना प्रकारचे पुरावे देऊन तिला पटवलें कीं, काडीमोड खरोखरच झालेली आहे; आणि तुमचें म्हणणेंच असेल, तर तुमची बायबलची पोथी मी थोडी थोडी वाचीत जाईन. शेवटीं वृद्धेला करुणा आली; आणि १९२६ त सेनापति चँग-कै-शेक आणि मेलिंग यांचें लग्न झालें.

नवऱ्याच्या हातीं साऱ्या चीन देशाचें भवितव्य आहे, ही गोष्ट मेलिंगला पुरी-पुरी पटलेली होती. तिच्या स्वतःच्याहि प्रवृत्तींत साहसवृत्तीचे अणुरेणू मुळा-पासूनच जोराजोरानें खेळत असत. हीं दोन साहसीं माणसें एकत्र झालीं. कसल्याही प्रसंगांत आपल्या संगतींत धिमेपणानें उभी ठाकणारी स्त्री आपल्याला

मिळालेली आहे, म्हणून तो दुप्पट जोरानें कामास लागला. पण येवढ्यानेंच झालें नाहीं. अमेरिकेंत मिळालेल्या शिक्षणानें आणि ख्रिस्ती धर्माच्या आचारानें मेलिंग हिच्या मनाला जो एक स्वतंत्रतेचा बोध झालेला होता, तो आतां चँगच्या कानीं पडला. रोज सकाळीं ती नवऱ्याबरोबर फिरावयास जाई आणि त्याला खिस्ती पुराणांतील गोष्टी सांगे. होतां होतां खिस्ती धर्मतत्त्व पटलें म्हणून म्हणा, किंवा बायकोचा शब्द मोडवेना म्हणून म्हणा, चँग-कै-शेक दोन वर्षांनीं खिस्ती बनला. अशा रीतीनें मेलिंग आणि चँग यांचा पूर्ण मिलाफ होऊन गेला.

नवऱ्याबरोबर प्रत्यक्ष रणांगणावर जाणें आणि सर्व देशभर सैन्याची नाचानाच करणें हें मेलिंग हिला अर्थातच अशक्य होतें. परंतु, जो नवा चीन देश चँगच्या मनांत जन्मास घालावयाचा होता, त्याचें स्वरूप सिद्ध करण्यासाठीं, इतर अनेक चळवळींची आवश्यकता होती. ही आवश्यकता ओळखून मेलिंग कामाला लागली; आणि मग एकाद्या झपाटलेल्या माणसाप्रमाणें, तिनें आपल्या अंगातल्या सर्व शक्ती प्रकट केल्या. जे क्रान्तिकारक रणांगणावर पतन पावले होते, त्यांच्या मुलांच्यासाठीं तिनें शाळा काढल्या. ती म्हणे कीं, 'हींच मुलें पुढें देशासाठीं अधिक त्वेषानें लढतील. कारण आपला बाप कशासाठीं मेला, याचें स्मरण त्यांना होईलच होईल.' या शाळांत तिनें शिक्षणाची एक नवीनच प्रथा पाडली. कांहीं हस्तव्यवसाय करावा, शारीरिक श्रम करावे, आणि या व्यवसायाचा आणि श्रमांच्या द्वारां ज्ञान संपादन करावें, असा शिक्षणाचा क्रम तिनें चालू केला. नेहमींच्या शाळांतून, 'असें करावें; तसें करूं नये,' असें सांगण्यांत येतें. पण असें कां करावें, आणि तसें कां करूं नये,' हें मात्र कधीं सांगत नसत. मेलिंग हिनें शिक्षणाची तऱ्हा अशी ठेवली कीं, कां किंवा कशासाठीं असे प्रतिप्रश्न विचारण्याची बुद्धि विद्यार्थ्यांना व्हावी; आणि जमल्यास, त्यांची त्यांना उत्तरें द्यावीं.

बाहेर शिक्षणाचा असा उपक्रम चालू असतांना, घरांत तिनें चँग-कै-शेकला पाश्चिमात्य लोकांचे ध्येयवाद आणि त्यांचें राजकीय तत्वज्ञान यांचें शिक्षण दिलें. थॉमस जेफरसन् याचें राजकीय तत्वज्ञान आणि अब्राहम लिंकन याचा समाज विचारांतील गूढवाद तिनें आपल्या नवऱ्याच्या मनावर चांगला बिंबवला. परंतु रणांगणाची हवा तिने मुळींच पाहिली नाहीं, असें मात्र नव्हें. नवऱ्याची साहस-वृत्ति आणि त्याचा कामाचा धडाका पाहिल्यावर, यांच्या हालविपत्तींत आपण सह-भागी झालें पाहिजे, अशी बुद्धि तिला होई; आणि मग, तो जेथें कोठें जाई, तेथें

तेथें तीहि त्याच्याबरोबर जाऊं लागली. माळावर घातलेल्या झोपड्या, आगगाडीचीं स्टेशनें शेतकऱ्यांचें गोठे, यांचा सुद्धां आश्रय चँग-कै-शेकला कित्येकदां करावा लागे. मेलिंग ही अशा सर्व ठिकाणीं, त्याच्याबरोबर असे. सर्व देशभर अशी धावाधाव करतांना, आपल्या लक्षावधि देशबांधवांची अवस्था कशी केविलवाणी झाली आहे, दूरदूरच्या आणि मागासलेल्या टापूंत अज्ञान, घाण, आणि नैतिक ऱ्हास यांचा बुजबुजाट कसा झाला आहे, हें दोघांनीं प्रत्यक्ष पाहिलें. आणि मग, नवऱ्याच्या सैनिकी मोहिमेबरोबरच स्वच्छता, नीतिमत्ता आणि ज्ञान यांची एक स्वतंत्र मोहीम या बाईनें चालू केली. कित्येक शतकेंपर्यंत चिनी लोक अपसमजुती आणि मिथ्या ज्ञान यांत पिचत पडलेले होते. यांतून या सर्वांना सोडविण्यासाठीं तिनें ख्रिस्ती मिशनऱ्यांचीही मदत घेतली.

चँग-कै-शेक विमानांतून दूरच्या प्रदेशाची पाहणी करण्यासाठी निघाला, म्हणजे हीहि त्याच्याबरोबर जाई; आणि त्याची सैनिकी पाहणी एकीकडे चालू असतां, ही लोकांच्या करुणास्पद स्थितीची पाहणी करीत असे. लांबलांबचे किल्लेकोट, दरोडेखोरांच्या गढ्या आणि सहस्रावधि वर्षें नागर संस्कृतीचें मुखावलोकनही ज्यांनीं केलें नाहीं, अशा मागासलेल्या लोकांचीं खेडीं हीं तिनें डोळ्यांनीं पाहिलीं. चीन देशाचे मोठ-मोठाले अधिकारी म्हणूं लागले, " हा नसता धंदा या बाईला कोणी सांगितला आहे ? आणि हा वेडा पीरहि तिच्या नादानें, जेथें कोणीं कधीं गेलें नाहीं, तेथें जात राहतो ! एकादे दिवशीं हे रानटी लोक या जोडप्याचें चंदन उडवतील. "

परंतु चँग व मेलिंग या दोघांनाही असें वाटे कीं, विश्वासानें विश्वास वाढत जाईल; एवढालीं माणसें आपल्या दाराशीं आपण होऊन येत आहेत, तीं आपल्या बऱ्याकरतांच येत आहेत, हा विचार अडाणी जनतेला सुद्धां सुचेल, अशी त्यांची दृढ श्रद्धा होती. एका एका ठिकाणीं गेल्यावर, मेलिंग ही तेथील प्रमुख स्त्रियांना एकत्र बोलावून आणी; आणि त्यांना सांगे कीं, " तुम्ही घरांत बसून राहूं नका; बाहेर काय चाललें आहे, तें नीट डोळे उघडून पहा. जग बदलत आहे. तुम्हीं जागच्या हलल्या नाहींत, तर तुमचे संसार कुचंबतील; तुमचीं पोरें अडाणी राहतील; एकादा सवाई सोट त्यांच्या श्रमाचें फळ हिसाकावून नेईल. "

पति-पत्नींचा हा कामाचा आवेश खरोखर पाहण्यासारखा होता. चीन देशांतील फुटीर वृत्ति चँगनें जवळ जवळ नाहींशी केली; आणि मेलिंग हिनें अज्ञानी

लोकांच्या खोपट्यांत आणि रकट्यांत खऱ्या ज्ञानाचें अस्वास्थ्य उत्पन्न केलें; पण यांतूनच एकदां एक मोठे चमत्कारिक संकट उद्भवलें.

चॅंगचें हे वर्तन पसंत नसलेल्या आणि कदाचित त्याच्या प्रभावानें दिपून गेलेल्या कांहीं सैनिकी अधिकाऱ्यांनीं त्याला अचानक उचलून नेलें. चॅंग-कै-शेक एकाएकी नाहींसा झाला; आणि सर्व देशभर हलकल्लोळ झाला. तो कोठें आहे, आणि त्याला कोणी धरून नेले आहे, याचीही वार्ताच लोकांना लागेना. होतां होतां हे बदमाश लष्करी अधिकारी कोण, याचा पत्ता लागला. पुढें असेंही कळलें कीं, हे लोक मोठे फौजबंद सरदार असून दोन लक्ष सैनिकांचा गराडा त्यांच्या शिबिराच्या भोंवतीं पडलेला आहे. या शिबिरांत त्यांनीं चॅंगला डांबून ठेवलें होतें. ते त्याला म्हणत कीं, ‘ तूं पुढारीपण सोडून दे; आणि चीन देशाची सूत्रें आमच्या हातीं दे. ’ चॅंगनें त्यांना खडसावून सांगितलें कीं, ‘ जीव गेला तरी बेहत्तर; पण ही गोष्ट कदापि होणार नाहीं. तुम्हीं चारटे लोक आहां. ’ या त्याच्या खडसावणीला त्यांनीं येवढेंच उत्तर दिलें कीं, त्यांनीं त्याला जखडून बंदिखान्यांत घातलें. पण पहारेकऱ्यांचें थोडेसें दुर्लक्ष झालें आहे, असें पाहून चॅंग त्यांच्या कोंडाळ्यांतून निसटला; एका उंच तटावर चढला; खालीं उडी घालतांना खंदकांत पडला; पण तसाच खुरडत खुरडत तो एका दूरच्या डोंगराकडे गेला. चॅंग पळाला; हें ऐकतांच त्याच्या पळाच्या दिशेनें भराभर गोळ्या सुटूं लागल्या; आणि बॉम्ब-गोळेही पडूं लागले. जातां जातां कांटेरीं झुडपांत लपलेल्या गुहेंत तो जाऊन बसला. त्याला उभेही राहतां येईना. शेवटीं त्या अधिकऱ्यांचे शिपाई तेथें येऊन ठेपलें. तेव्हां आपल्या सर्व सत्ताधिकाराचा रोष एकत्र करून तो त्यांना म्हणाला, ‘ छाती असेल तर मला गोळीं घाला; नाहीं तर माझी पदवी मरून मला सलाम करा ! ’ त्याला त्यांनीं धरून नेलें.

चॅंगच्या बंदिवासाची ही वार्ता सर्व देशभर पसरली; आणि त्याच्या स्वतःच्या फौजा त्याला सोडविण्यासाठीं सज्ज होऊन राहिल्या. याच ठिकाणीं मेलिंग हिच्या अंगचें लोकविलक्षण धैर्य आणि तिचा आत्मविश्वास हीं सर्व जगाच्या प्रत्ययाला आलीं.

चीन देशांत आतां यादवी माजणार, आणि दोन्हीं बाजूंच्या लाखों सैनिकांचा चुराडा होऊन खुद्द चॅंगचें जीवितही संशयांत सांपडणार, हें मेलिंग हिनें ओळखलें; आणि तिनें, चॅंगच्या सैन्यावरील अधिकाऱ्यांना निरोप धाडला कीं, ‘ चॅंग

कै-शेक यांना सोडविण्यासाठीं तुम्हीं चाल करून जाणार आहां. पण मी सांगतें कीं, हा तुमचा बेत तुम्ही रद्द करा. चँग यांना मी स्वतःच सोडवून आणतें.' हा निरोप पोहोंचतांच वाटचाल करूं लागलेलीं चँगचीं सैन्यें थबकून उभीं राहिलीं. ही बाई नवऱ्याला सोडवून आणणार म्हणजे काय करणार, याकडे सगळें राष्ट्र उत्सुकतेनें पाहूं लागलें.

चँग याला आपल्या बायकोचा स्वभाव पुरा माहीत झालेला होता. तिला चैन पडावयाचें नाहीं; आणि आपल्याला सोडविण्यासाठीं कांहींतरी अघटित कामाला ती हात घालील, असें त्याला वाटूं लागलें. इतक्यांत, तिचा बेतही त्याच्या कानीं आला. त्यानें निरोप धाडला कीं, 'तूं असलें कांहीं करूं नकोस; तूं आलीस तर हे लोक तुला ठार मारतील.' परंतु, नवऱ्याचा निरोप आणि स्वकीयांची हरकत हीं या बाईनें बाजूला सारलीं. तिनें एक विमान घेतलें; आणि बरोबर एक हुजऱ्याही घेतला. तिनें त्याला सांगितलें कीं, 'शत्रूच्या शिबिरांत जाऊन पोहोंचल्यावर जर तेथले शिपाई माझ्या अंगाला हात लावून हिसकाहिसक करूं लागले, तर तूं मला गोळी घाल.'

येतां येतां विमान शत्रूच्या तळावर येऊन उतरलें; आणि हातीं भरलेलें पिस्तुल घेतलेल्या या हुजऱ्याला बरोबर घेऊन मेलिंग ही चँगच्या कैदखान्याकडे निघाली. दोन्ही बाजूला उभे असलेले सैनिक विस्मित होऊन तिच्याकडे पाहूं लागले. लाखों संगिनींनीं गजबजलेल्या शत्रूच्या तळांत ही बाई निर्भयपणें प्रवेश करते, आणि नवऱ्याला सोडवीन म्हणते, याचें या शिपायांना मोठेंच नवल वाटलें. जातां जातां ती नवऱ्याच्या खोलीपाशीं पोहोंचली. तिचें धाडस पाहून चकित झालेल्या शत्रूंनीं तिला कसलीही हरकत केली नाहीं. चँगनें अन्नत्याग केलेला होता. ती त्याला म्हणाली, 'तुम्ही असें करूं नका. तुम्ही अन्न खा. कारण, अन्नमय प्राण आहे.' इतकें बोलून, त्याच्या चित्ताला शांति यावी, म्हणून धर्मग्रंथांतील कांहीं वचनें तिनें वाचून दाखवलीं.

दोन दिवस ती तेथें राहिली; आणि शत्रूंशीं तिनें सारखी रदबदली केली. 'माझ्यासाठीं नव्हे, पण चीन देशासाठीं तुम्हीं यांना सोडून द्या; सोडलें नाहींत तर यांच्या लक्षावधि फोजा तुमच्यावर चालून येतील; आणि सर्व देशभर यादवीचा डोंबाळा माजेल.' शत्रूंना तिची ही रदबदली पटली; आणि १९३६ च्या नाताळांत त्यांनीं चँगला बायकोच्या हवालीं केलें. नवऱ्याला घेऊन, ही धीट आणि पराक्रमी

स्त्री वाजत-गाजतच आपल्या घरीं परत आली ! तिचा हा पराक्रम ऐकून, सर्व देशाच्या अंगावर शहारे उभे राहिले; आणि जिकडे तिकडे तिच्या नांवाचा जय-घोष होऊन घरोघर ध्वजातोरणें उभीं राहिलीं.

येथून पुढें चीन देशावर एक नवीनच संकट कोसळलें. पाश्चात्य लोकांशीं स्पर्धा करावयाची, तर सवर्णीय चीन लोकांशीं मैत्री जोडावी, व त्यांनीं आणि आपण एक होऊन, युरोपियन लोकांना पूर्व आशियांतून पिटाळून द्यावें, हें न करतां, जपानी लोक साम्राज्यवादी बनले; आणि त्यांनीं चीन देशावरच स्वारी केली. चँगनें आपला मोहरा आतां जपानी लोकांच्या विरुद्ध वळवला; आणि मग मेलिंग हिची हालचाल एखाद्या सेनापतीप्रमाणें चालू झाली.

विमानांतून उड्डाणें करावीं, फौजांच्या हालचालींच्या योजना सिद्ध करण्यासाठीं शिबिरा-शिबिरांतून हिंडत रहावें, असलें काम मेलिंग ही नवऱ्याच्या बरोबरीनें करूं लागली. जपान्यांची स्वारी मारून काढण्याच्या कामीं चँग-कै-शेक याला बरे-चसें यश मिळालें; या यशांतील निम्मा वाटा प्रपंचांतील त्याच्या वांटेकरणीकडे जातो, हें सर्वांनीं मान्य केलें आहे.

दुसरें महायुद्ध सुरूं झालें; जपानी राष्ट्र जर्मनांच्या बाजूला गेलें; आणि चीनी राष्ट्र अँग्लो–अमेरिकनांच्या बाजूला गेलें. मग स्टॅलिन, रुझवेल्ट, चर्चिल अशा लोकांच्या भेटी घेण्यासाठीं मदाम चँग-कै-शेक हिला सर्व जगाच्या फेऱ्या कराव्या लागल्या. ती एकदां हिंदुस्थानांतही येऊन गेली.

पण पुढें चँग व चिनी कम्युनिस्ट यांचें वैर जुंपलें, आणि दोस्तांची मदत पुरेशी न मिळाल्यामुळें चँगची पिछेहाट होऊं लागली. आज चँग हा फोर्मोसा बेटावर तीन-चार लक्ष फौज घेऊन बसलेला आहे. त्याची वेडी आशा अशी आहे कीं, चीन देशावर पुन्हां आपल्याला स्वारी करतां येईल. मदाम चँग-कै-शेक असल्या कानकोंड्या स्थितींत नवऱ्याला कसला सल्ला देत असते, हें कळावयास कांहींच मार्ग नाहीं; पण चिनी राष्ट्र जरी तिला आतां विसरलेलें असलें, तरी चीन देशाचा आणि स्त्रीजातीचा इतिहास तिला कधींही विसरणार नाहीं !

• • •

ह्या अंधळ्याच्या बायकोनें स्त्रीजात डोळस बनविली !

## मिसेस् फॉसेट : ३ :

इंग्लंडांतील स्त्रियांचें बंधविमोचन व्हावयास हवें, ही ध्वजा मोठेपणीं हातीं घेतलेल्या या स्त्रीचा जन्म १८४७ सालीं इंग्लंडच्या सफोक परगाण्यांतील अंडेबर्ग येथें झाला. हें खेडेंगांव म्हणजे ज्याच्याकडे कुणी ढुंकूनहि पाहूं नये, असेंच होतें. कुग्राम, दरिद्री, आणि सर्वथा मागासलेलें असलें हें खेडें इंग्लंडांतील एका पराक्रमी स्त्रीला जन्म देणार आहे, असें भाकित जर आधीं कुणीं केलें असतें, तर लोकांनीं त्याला वेड्यांतच काढलें असतें. पण एक गोष्ट ध्यानांत हवी कीं, सगळा गांव जरी निजलेला असला, तरी न्यून् गॅरेट म्हणजे मिसेस् फॉसेट् यांचे वडील हे मात्र नेहमीं जागे राहिलेले असत. प्रत्येक महिन्याच्या पहिल्या आणि तिसऱ्या सोमवारला ते लंडनच्या धान्यबाजाराला जात आणि चांगल्या प्रकारचा उदीम करीत. भोंवतालचे लोक म्हणत कीं, ‘ शेठजींना आळस म्हणून कधीं नाहींच. दर पंधरा दिवसांनीं यांची लंडनला खेप असायचीच. ’ त्यांच्या व्यापाराटापारांत कितपत माया त्यांना जमा करतां आली, हें आपल्याला माहीत नाहीं; पण एक गोष्ट मात्र खरी कीं, लंडनच्या खेपा सारख्या केल्यानें गॅरेट शेठजींना नागर जीवनाची आणि स्त्रीशिक्षणाची थोडीशी कल्पना आलेली होती. गांवचे लोक घोरत पडलेले असले, तरी यांनीं मात्र आपल्या कुटुंबांत, घरगुती पद्धतीनेंच कां होईना, पण शिक्षणाचा फैलाव चांगला केलेला होता.

मिसेस फॉसेट् यांचें माहेरचें नांव मिलिसंट असें होतें. मिलिसंटच्या वडील बहिणींचें शिक्षण हा गांवांत एक मोठा वादाचा मुद्दा बनून राहिला होता. परंतु न्यूसन् हे स्त्रीशिक्षणाचे पक्षपाती बनलेले असल्यानें, विरोधाला न जुमानतां वडील मुलगी एलिझाबेथ हिचें दुय्यम शिक्षण पुरें करून तिला वैद्यकाचें शिक्षण देण्याचें त्यांनीं ठरविलें. १८६५ च्या सुमारास सुद्धां मुलींना वैद्यकाचें शिक्षण देणें म्हणजे इंग्लंडांतील वैद्यकाचीं महाविद्यालयें पापच मानीत. कोणच्याहि कॉलेजांत अर्ज

करावा, तर मुख्याधिकाऱ्यांनीं कळवावें कीं, ' बायकांना आमच्या कॉलेजांत प्रवेश नाहीं.' परंतु, न्यूसन आणि एलिझाबेथ यांनीं एक खटलाच लढवायचें ठरवलें.

वैद्यकाच्या कायद्यांत असें म्हटलें होतें कीं, ' अभ्यासाची सिद्धता झालेल्या सर्व माणसांना वैद्यकाच्या परीक्षेला बसण्याचा हक्क असावा.' न्यूसन् गॅरेटनीं अर्ज केला कीं, " ' सर्व माणसांनीं ' या शब्दांत स्त्रियांचाही समावेश झालाच पाहिजे; कारण स्त्रिया माणसेंच आहेत!" हें प्रकरण पुष्कळच गाजलें; आणि शेवटीं पंचांनीं आपला निकाल एलिझाबेथच्या बाजूनें दिला. एलिझाबेथ डॉक्टरीण झाली; आणि व्यवसाय करूं लागली. या लढ्याचा परिणाम मिलिसंट हिच्या मनावर फारच झाला.

तिचें शिक्षण चालूच होतें; पण इंग्लंडांतही इतक्या अलिकडच्या काळांत सुद्धां स्त्रीशिक्षणाची व्यवस्था असावी तशी नव्हती; म्हणून न्यूसन् यांनीं घरच्या घरींच सर्व तऱ्हेचें शिक्षण मिलिसंट हिला दिलें. आणि मग सुशिक्षित स्त्रीच्या मनांत, स्त्रियांच्या हक्काचे जे प्रश्न उद्भवणें अगदी अटळ होते, ते या मिलिसंटच्या मनांत उद्भवूं लागले. इतक्यांत तिच्या जीविताला निराळेंच वळण लागण्याचा योग आला.

मिलिसंट ही अजून पुरी वीस वर्षांचीही झाली नव्हती. तेव्हां हेन्री फॉसेट या तरुण गृहस्थाची व तिची ओळख झाली. हा गृहस्थ केंब्रिज येथें अर्थशास्त्राचा प्राध्यापक होता. हा सहा फूट तीन इंच उंच असून अंगानें चांगला धिप्पाड आणि पिळदार होता. त्याच्याकडे पाहतांच कोणाच्याही मनांत थोडासा आदर उत्पन्न झाल्याखेरीज रहात नसें. पण दुर्दैवानें त्याच्या ठिकाणीं एक वैगुण्य उत्पन्न झालें होतें. तो सुमारें पंचवीस एक वर्षाचा असतांना, बंदूक उडवण्याच्या कामीं कांहीं अपघात होऊन त्याचे दोन्ही डोळे गेलेले होते. पण डोळे गेले असूनही या माणसाची चर्या आणि त्याचा रुबाब हीं लक्षांत भरण्यासारखी राहिलीं होतीं.

डोळे जातांच एकादा मनुष्य गळाठला असता, आणि दीनवाण बनून त्यानें जगाशीं संबंधही सोडला असता; पण हा फॉसेट् मोठा धीराचा माणूस होता. अंधळा होण्याच्या आधीं ज्या गोष्टी त्याला करतां येत असत. त्यांतील बऱ्याचशा त्यानें पुढें चालू ठेवल्या. पायांनीं सपासप चालणें, आणि बर्फावर स्केटिंग करणें याची त्याला फार हौस असे. अंधळा होऊनही या दोन्ही गोष्टी तो अगदीं डोळस माणसासारख्या करूं लागला. ज्या सडका त्याच्या ओळखीच्या होत्या, त्यांवर तर तो खुशाल सहलीला जाऊं लागला. पण जर कोणी मित्रानें एकाद्या नव्या सडकेचें

अगदीं बारीक सारीक वर्णन त्याच्यापुढें केलें, तर तो तें वर्णन नीट ध्यानांत ठेवून या नव्या सडकेवर सुद्धां फिरायला जाई. घोड्यावर बसण्यांत तो मुळचा फार पटाईत होता. अंधत्व आल्यावरही त्यानें घोड्यावरची रपेट कधींच सोडली नाहीं. मासे पकडण्याचा त्याचा मूळचा छंद त्यानें पुढें तसाच चालू ठेवला. केंब्रिज येथें तो अर्थशास्त्राचा प्राध्यापक होता; आणि इंग्लंडच्या लोकसभेचाही तो एक प्रतिनिधि होता. अशा माणसाची आणि गॅरेट यांच्या मुलीची सहजासहजीं गांठ पडली.

मिलिसंट गॅरेट् हिच्याकडे या अंधाचें लक्ष विशेष गेलें होतें. मिलिसंट ही फार देखणी मुलगी होती. तिचे मनोधर्म कांहीं निराळेच होते. फॉसेट्चें शरीर-वैभव तिला अतिशय आकर्षक वाटलें, आणि असा उमदा माणूस जर दुर्दैवानें एकाद्या आपत्तींत सांपडलेला असला, तर त्याला साहाय्य करून आपण त्याचें जीवित सुखाचें करावें, असें या मुलीला वाटूं लागलें.

१८६७ मध्यें प्रो. हेन्री फॉसेट् आणि मिलिसंट् गॅरेट् यांचा विवाह झाला. फॉसेट्च्या संगतींत तिला अर्थशास्त्राचें ज्ञान हळू हळू होऊं लागलें; आणि मग पुढें तर या विषयांत तिनें इतकी प्रगति केली, कीं या विषयावरचीं तिचीं पुस्तकें लोक प्रमाण मानूं लागले.

मिलिसंटनें जेव्हां पुढें स्त्रियांची बाजू घेऊन देशांतील पुरुषांशीं खडा सामना सुरू केला, तेव्हां 'पुरुषांचा द्वेष करणारी,' 'पुरुष जातीची वैरी असलेली,' अशीं तिचीं वर्णनें वृत्तपत्रांत होऊं लागलीं. ती जर खरोखरच पुरुष जातीची वैरी असती, किंवा पुरुषांचा द्वेष तिच्या मनांत बाणलेला असता, तर तिनें असल्या अंध पुरुषाशीं कधींही लग्न लावलें नसतें. उलट एका अंध पुरुषाला प्रपंचबद्ध करून त्याचा संसार तिनें आपल्या नेकीनें सुखाचा केलेला असावा, यांत तिची पुरुषजातीवरील प्रीति मात्र दिसून येते.

वडील बहिणीच्या शिक्षणक्रमांत पुरुषांनीं आणि प्रत्यक्ष सरकारनें अडथळे आणलेले होते, याचें स्मरण तिला होतेंच होतें. नवऱ्याबरोबर अर्थशास्त्राची चर्चा करतां करतां तिला हें कळून चुकलें कीं, स्त्रीला मतदानाचा हक्क प्राप्त झाल्याशिवाय तिच्या अंगांतील बुद्धिस्फुरणाचा पोष व्हायचा नाहीं; आणि तो झाला नाहीं, तर मानवी जीवनांत तिचें स्थान अगदीं खालच्या पायरीचें राहील. देशांत जर

लोकशाही आहे, जर ती लोकमतावर आधारलेली आहे; आणि स्त्रिया जर 'लोक' शब्दांत अंतर्भूत होतात, तर त्यांना मतदानाचा हक्क प्राप्त झाला पाहिजे, असा आग्रह तिच्या बुद्धीला उत्पन्न झाला.

पीटर टेलर आणि जॉन स्टुअर्ट मिल हे स्त्रियांचे कैवारी म्हणून प्रसिद्ध होते. त्यांनीं भरविलेल्या एका सभेंत फॉसेट्बाईंचें पहिलें भाषण झालें. 'स्त्रीला मतदानाचा हक्क असावा,' हा भाषणाचा विषय होता. बाईनें भाषणाचा थाट असा सुंदर ठेवला, कीं सभेला जमलेले लोक अगदीं खूष होऊन गेले. त्यांची चर्या, त्यांचे हावभाव आणि लोकांची समजूत पाडण्याची त्यांची सौम्य आणि मोहक शैली यांचा श्रोत्यांच्या मनावर विलक्षण परिणाम झाला. या भाषणाच्या मागोमाग ब्रायटन येथें याच विषयावर त्यांनीं पुन्हां एकदां भाषण केले. श्रोत्यांपैकीं अनेकांना हें 'नवें खूळ' पसंत नव्हतें. परंतु फॉसेट्बाईंची विषयाची मांडणी आणि त्यांनीं केलेला कोटिक्रम हीं पाहिल्यानंतर त्यांना सुद्धां वाटूं लागे कीं, बाईच्या बोलण्यांत पुष्कळच तथ्य आहे. परंतु, 'बायकाना मतदानाचा हक्क असावा' हेंच या ऐकणाऱ्यांना बिलकुल पसंत नव्हतें. त्यांनीं आपली नापसंती एका निराळ्याच तऱ्हेनें व्यक्त केली. ते म्हणूं लागले कीं, 'बाईच्या या नव्या थेरामुळें मि. फॉसेट् हे लोकांत अप्रिय बनूं लागतील; आणि पार्लमेन्टमधील आपली जागा ते गमावून बसतील!' ही भीति दाखविली, म्हणजे हा अंध माणूस बायकोला आवरून धरील; आणि अशा रीतीनें या विषयाचा कांटा आपोआपच निघेल, असा त्यांचा अंदाज होता. पण अंधाचें मतही बायकोसारखेंच होतें. शिवाय त्याला लोकप्रियतेची किंमत असली, तरी स्त्रियांच्या हक्काची किंमत जास्त होती. अर्थात् या दहशतीचा कांहीं उपयोग झाला नाहीं. आपल्याला जें कृत्य न्यायाचें दिसतें, तें केलेंच पाहिजे, असा आग्रह पतिपत्नींनीं धरला. आणि प्रथम प्रथम जरी कोणी विरोध केलेला असला, तरी शेवटी फॉसेट् बाईच्या प्रतिपादनाला इंग्लंडांत यश मिळालें.

'.स्त्रिया सार्वजनिक जीवनांत थोडी हालचाल करूं लागल्या, कीं यांना संसाराचीं कामें करावयास नकोत; चूल सैंपाकिणीच्या हवाली करावी; मूल दाईच्या हवालीं करावें, आणि आपण 'टोळ, टोळ' करीत गांवभर हिंडावें, यांतच असल्या बायका भूषण मानतात," अशी त्यांची .निंदा सुरूं होई. फॉसेट् बाईंना ही निंदा आरंभापासूनच सहन करावी लागली. खरी गोष्ट अशी होती कीं,

प्रपंचातील आपल्या जबाबदाऱ्यांविषयीं त्यांच्या मनांत कधींही तिरस्कार उत्पन्न झाला नव्हता. इतकेंच नव्हे, तर आपल्या प्रापंचिक जीवनांत गोडी उत्पन्न व्हावी, म्हणून जें जें करतां येणें शक्य होतें, तें तें सारें फॉसेट्बाई करीत असत.

आपलीं घरें जर खरीं खरीं सुखाचीं निवासस्थानें व्हावयास हवीं असलीं, तर स्त्रीचा दर्जा वाढावयास हवा; आणि लौकिक जीवनांत स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचें स्थान प्राप्त व्हावयास हवें, असें मात्र त्यांचे मत बनलें होते. स्त्रीया म्हणजे घरांतील एक कामाठीण आणि आपल्या मनाला चाहील त्याप्रमाणें पुरुषांनीं वागवून घेण्याची एक वस्तु, हा सध्यांचा स्त्रीचा दर्जा प्रपंचांत कधींही खरें सुख उत्पन्न करणार नाहीं; अशी स्त्री नवऱ्याला आणि मुलांना ममत्वानें सुखी करूं शकणार नाहीं. म्हणून, तिची सामाजिक पदवीच उंच व्हावयास हवी; आणि यासाठीं मतदानाचा हक्क तिला मिळालाच पाहिजे, असें या विदुषीचें मत लोकांच्या पुढें जोरजोरानें येऊं लागलें.

ती स्वतः घरांत एरवींच्या प्रापंचिक स्त्रियांप्रमाणेंच वागे. नवऱ्याची बायको आणि मुलांची आई हीं नातीं ती कधींच विसरली नाहीं. त्यांतही नवरा आंधळा असलेला. वेड्या प्रेमाच्या पहिल्या झटक्यांत असल्या माणसाशीं लग्न केलेंही असेल; पण एखाद्या स्त्रीला पुढें पश्चात्ताप झाला असतां; आणि त्या नवऱ्याची अवहेलना ती करू लागली असती; त्याच्या जीविताचे तिनें केवळ पोतेरे करून टाकले असतें. परंतु, फासेट बाईनें नवरा आंधळा म्हणूनच पत्नीत्वाचे नातें अधिक मंजुळ आणि अधिक प्रेमळपणाचें करून टाकलें. त्याची सर्व तऱ्हेची निगा ती ठेवी; आणि लेखनाच्या कामांत त्याला हरतऱ्हेचे साहाय्य करी. उलटपक्षीं, ज्या आपल्या प्रियकर पत्नीचें मुख त्यानें कधींही पाहिलें नव्हतें, तिच्यावर या प्रोफेसराची प्रीति केवळ अगाध होती.

एकदां असें झाले कीं, रपेटीला गेल्या असतांना फॉसेटबाई घोड्यावरून पडल्या. त्यांना बरेच लागले. त्यांना घरी आणल्यावर पुष्कळच धावपळ झाली. बायको घोड्यावरून पडली आहे, आणि तिला लागले आहे, येवढें फॉसेटना कळलें होतें. पण कुठें लागलें आहे, किती लागलें आहे, हें त्यांना कसें कळणार? विचारून विचारून त्यांनीं सर्वांना गांगरवून टाकले. ते म्हणाले, 'हिला जास्त लागलें असलें पाहिजे. पण मी भिऊ नये, म्हणून तुम्ही माझ्यापासून तें चोरून ठेवत असलां पाहिजे.' इतकें बोलून फॉसेट ढसढसां रडूं लागले.

फासेट हे आपल्या मतदारांना नेहमीं सांगत कीं, "राजकारणाचें माझ्या बायकोचें ज्ञान माझ्यापेक्षां अधिक चांगलें आहे. तिनें दिलेलें मत आणि केलेला निर्णय माझ्यापेक्षां समर्पक असतो." केवळ बायकोची स्तुति करावी, म्हणून प्रो. फॉसेट असें म्हणत असत असें नव्हें. त्यांच्या मित्रांच्याही हें ध्यानांत येऊन चुकले होतें कीं, बाईची निर्णयबुद्धि ही खरोखरच फार चलाख आहे.

फॉसेट यांच्याकडे पोस्ट ऑफिसचे कांहीं काम होतें. अगोदर स्त्रियांचा दर्जा वाढला पाहिजे, हें त्यांचें मत होतेंच. पण बायकोच्या शहाणपणाचा प्रत्यय त्यांना नित्य येत असल्यामुळें पोस्ट खात्यांत बायकांच्या नेमणुका करण्याचा प्रघात त्यांनीं पाडला. ही पद्धति भराभर बळावत गेली; आणि पोस्ट ऑफिसें, बँका इत्यादि ठिकाणीं शेंकडोंच्या शेंकडो बेकार मुलींना कामें मिळूं लागलीं. या कामीं फॉसेट बाईनीं नवऱ्याला हरतऱ्हेची मदत केली. अशा प्रकारे दोघांचा संसार मोठ्या सुखानें चालला असतांना बाईवर दुःखाचा डोंगर कोसळला !

१८८४ त प्रो. फॉसेट यांना प्लूरसीचे दुखणें झालें; आणि त्यांची फुफ्फुसें सुजूं लागलीं. त्यांची मोठी मेहुणी डॉक्टरीण झालेली होती. तीही औषध पाण्यासाठीं आली; पण कसलाही उपयोग न होऊन हा जवान मनुष्य ऐन उमेदींत मरण पावला.

प्रो. फॉसेट हे गरिबांचे कैवारी असत; आणि लहानसहान व्यवसायांतील माणसांची कड घेऊन ते नेहमीं भांडत असत. ते वारल्यानंतर बाईंना अर्थातच सांत्वनपर शेकडों पत्रें आली. त्यांत चार सुतार, दोन गवंडी, एक घिसाडी, एक पोस्टमास्तर आणि एक कारकून यांचीं आलेलीं पत्रें फार कळवळून लिहिलेलीं होतीं. 'आमचा मित्र गेला,' 'सोयरा गेला,' कैवारी गेला,' 'आतां तुमचें कसें चालेल ?' 'तुम्हाला कांहीं तारण आहे कां ?' अशा मजकुरानें हीं पत्रें भरलेलीं होतीं. एकानें तर म्हटलें होतें कीं, "एडमंड बर्कच्या नंतर येवढा मोठा माणूस आमच्या देशांत झालाच नाहीं !" आपल्या नवऱ्यावर गरीब गुरीबांची इतकी भक्ति असलेली पाहून बाईचें दुःख अधिकच अनावर व्हावें, हें स्वाभाविक होतें. त्यांनीं प्रसिद्धपणें सर्वांचे आभार मानले; आणि त्यांना कळवलें कीं, "माझ्या योगक्षेमाची व्यवस्था फॉसेट यांनी बरी करून ठेवली आहे. माझी चिंता कोणी करूं नये. फॉसेट हे अतिशय काटकसरीने वागत; आणि म्हणून माझें साधारणपणें बरें चालावें, इतकी माया त्यांनीं ठेवली आहे."

प्रो. फॉसेट यांच्यापासून बाईंना एकच मुलगी झाली. ही फिलिपा पुढें बुद्धीनें अतिशय चलाख निघाली. तिचें बुद्धिवैभव पहाण्यास प्रो. फॉसेट जिवंत राहिले नाहीत याचें सर्वांनाच वाईट वाटे. फिलिपा लहान होती, तेव्हांपासूनच स्त्रियांना वरिष्ठ तऱ्हेचें शिक्षण अवश्य मिळालें पाहिजे ' ही चळवळ फॉसेटबाईंनीं सुरू केली होती. किंबहुना 'केंब्रिज युनिव्हर्सिटीच्या परीक्षांना मुलींना बसतां यावें,' अशी मागणी करण्यासाठीं भरलेली पहिली सभा बाईंच्याच घरांत भरली होती. फॉसेटबाईंच्या प्रयत्नांना फार त्वरेनें यश मिळूं लागलें; आणि या परीक्षांना बसणाऱ्या मुलींच्या शिक्षणाची स्वतंत्र सोय बाईंनीं केली. या सोईचा लाभ पहिल्याच वर्षी ऐंशी मुलींनीं करून घेतला. याच्या पाठोपाठ त्यांनीं विद्यार्थिनींचे एक मोठें वसतिगृह केंब्रिजच्या जवळ बांधलें. चळवळीला जोर चढत चालला; आणि १८७५ सालीं त्यांनीं न्यून् हॅम् कॉलेज या नांवाचें एक स्वतंत्र महाविद्यालयच सुरू केलें फॉसेट् बाईंची फिलिपा याच कॉलेजांत शिकूं लागली.

आईच्या अंगांतील स्वावलंबनाचा गुण लेकीच्या ठिकाणीं पुरापुरा अवतरला होता. मुलींना इकडे तिकडे धाडायचे, म्हणजे सोबतीशिवाय धाडूं नये, अशी वहिवाट असे. फासेट्बाईंनीं ही वहिवाट मोडून टाकली; आणि फिलिपा सुद्धां निर्भयपणाने सगळीकडे हिंडूं लागली. क्लॅपहॅम हायस्कूलमध्यें तिला रोज जावें लागे· शाळा घरापासून बरीच लांब होती. ' शाळेंत जाणारी पोर ' म्हणून तिची टवाळी करण्यासाठी कांहीं उडाणटप्पू लोक टपून बसलेले असत. अशांपैकीं एकाने एकदां तिची कांहीं चमत्कारिक खोडी केली; त्याबरोबर या पोरीने त्याच्या नाकाडावर हातांतल्या छत्रीचे तडाखे असे फडाफड दिले, कीं पुन्हां त्या माणसानें तोंडच वर करूं नयें.

स्त्रियांची योग्यता पुरुषांपेक्षां कमी नाहीं, हा घोष आईने चालवलाच होता; पण लेकीनें शाळा-कालेजांतील आपल्या अभ्यास-क्रमांत सर्वांना हें प्रत्यक्ष पटवून दिलें. बायकांनीं कोणचा व्यायाम करावा, आणि पुरुषांनीं कोणचा करावा, याचा कांहीं एक विवेक केला पाहिजे; असा सर्वांचा समज होता. फॉसेट्बाईना हें तत्त्व मान्य नव्हतें. फिलिपा हिनें व्यायामाच्या कामांत आईचेंच धोरण पुढें चालविलें. अर्थातच पुरातन संस्कृतीचा अभिमान बाळगणाऱ्या लोकांनीं तिच्याकडे पाहून नाकें मुरडलीं असतील, हें कांहीं सांगावयास नको. फिलिपा हिचा शिक्षण-क्रम संपत आला; आणि केंब्रिज येथील गणिताच्या सर्वश्रेष्ठ परीक्षेस ती

बसली. १८९० सालच्या या परीक्षेंत फिलिपा ही पहिली आली. सर्व पुरुष विद्यार्थ्यांना मागें टाकून या पोरीनें गणितासारख्या अवघड विषयांत पहिला क्रमांक मिळवलेला पाहून इंग्लंडच्या स्त्रियांच्या आनंदाला मात्र असें कांहीं विलक्षण भरतें आलें, कीं फिलिपा हिच्या विजयाचा डंका त्यांनीं महिनोन् महिनें अखंड चालू ठेवला.

पण सर्वच पुरुष कांहीं इतके अनुदार नव्हते. अनेक तरुण लोकांनीं एक मोठी मिरवणूक काढली; आणि फॉसेट्च्या घरापाशीं आल्यानंतर 'फिलिपा सिनीयर रँगलर,' 'फिलिपा सिनीयर रँगलर,' म्हणून त्यांनीं गर्जना केल्या. आईला आणि लेकीला पराकाष्ठेचा आनंद झाला असेल, हें सांगावयास हवे काय? पण या आनंदानें त्यांचीं डोकीं मात्र भडकलीं नाहींत; आपण कोणी मुलखानिराळ्या स्त्रिया आहों, अशी समजूत त्यांनीं करून घेतली नाहीं. आईनें आपल्यावर केवढे उपकार केले आहेत, हें फिलिपा हिला चांगलें माहीत होतें. म्हणून फॉसेट्बाईनीं चालवलेल्या स्त्रीशिक्षणाच्या पुरस्काराचें काम तिनेंही अधिक जोरानें चालू केलें.

मागें सांगितलेंच आहे कीं, प्रो. फॉसेट् यांच्या संगतींत बाईंना अर्थशास्त्राची गोडी लागली. आंधळे होते तरी फॉसेट् हे आपला प्रोफेसरीचा धंदा करीत. त्यांना वाचून दाखवण्याचें काम बाईंना रोज करावें लागे. दोघांनीं चर्चा करावी; ती बाईनीं लिहून काढावी, असें होतां होतां, 'निबंध आणि व्याख्यानें' या नांवाचें एक पुस्तक बाईनीं प्रसिद्ध केलें. १८७० त अर्थशास्त्रावरच त्यांनीं एक पुस्तक लिहिलें. या अर्थशास्त्राच्या विचारांतूनच स्त्रियांच्या हक्कांचा प्रश्न बाईंच्या मनावर ठसूं लागला.

मिसेस फॉसेट् म्हणूं लागल्या कीं, 'जे कायदेकानू आम्हीं पाळावे अशी अपेक्षा सरकार ठेवतें, ते कायदे-कानू बनवण्याच्या कामांत जर आमचा हात आला, तरच ते पाळण्याला आम्हीं बांधलेल्या आहों. पुरुषांनीं एकत्र जमावयाचें; आणि आम्हांला कळूं न देतां कायदे पसार करून ते आमच्या माथीं मारावयाचे, ही गोष्ट अतःपरः चालावयाची नाहीं. पुरुषांप्रमाणेंच आम्हांलाही मतदानाचा हक्क हवा. तो मिळाला, म्हणजे आमच्या बाबतींत तुम्हीं कसले कायदे करतां, हें आम्हीं पाहून घेऊं.'

फॉसेट्बाई पुढें जाऊन गर्जू लागल्या कीं, "नवरा-बायकोचें नातें कसें असावें; आमची वैवाहिक नीति कशी असावी; घटस्फोट व्हावे कीं नाहीत; घटस्फोटित स्त्रियांच्या मुलांची वासलात कशी लावावी, याचे सारे कायदे तुम्हीं पुरुष करतां; आणि ते पाळण्याची जबाबदारी आमच्यावर लादतां. कायदे करतांना, तुम्हीं पुरुषांच्या बाजूनें पक्षपात करतां; आम्हां स्त्रियांना अन्याय करतां. पत्नी कितीही चांगली असो, तिच्या बदमाश नवऱ्याला कायदा संभाळून धरतो; आणि सुशील पत्नीच्या जीविताचें पोतेरें करून सोडतो. सुशील घटस्फोटित आईचीं मुलें तुमचा कायदा अतिशय दुराचारी आणि नाठाळ बापाच्या हवालीं करतो. बरें, आई आणि बाप दोघेंही दुराचारीं असलीं, तर शिक्षेचा तडाखा स्त्रीला जितका बसतो तितका पुरुषाला बसत नाहीं. खरें पाहतां, शिक्षा सोसण्याचें सामर्थ्य पुरुषांना जितकें असतें, तितकें बायकांना असत नाहीं; पण असें असूनही आणि स्त्री–पुरुषांचा दोष सारखा, असला तरी शिक्षेचा ससेमिरा तुम्हीं बायकांच्या मागें जास्त लावतां."

१८७१ सालीं पार्लमेन्टमध्यें 'स्त्रियांना होणाऱ्या अन्यायाचें परिमार्जन' या नांवाचें एक विधेयक पुढें आलें होतें. या बिलावर बोलतांना इंग्लंडचा मुख्य प्रधान ग्लॅडस्टन् हा म्हणाला कीं, 'आपल्या या घटस्फोटाच्या कायद्यानें स्त्रियांच्या विरुद्ध एक नवें आणि अघोरी वैषम्य उत्पन्न केलें आहे. या बिलानें पुरुषांचा पक्षपात केलेला आहे; वैवाहिक जीवनांत जर स्त्रीच्या हातून कांहीं प्रमाद घडला, तर आपला कायदा तिचा सारखा छळ करीत सुटतो; पण पुरुषाच्या हातून जर चूक झालेली असली, तर तो त्याला संभाळून धरतो.' इतकें बोलून ग्लॅडस्टन्नें असा दावा मांडला कीं, 'आपल्या राजकारणावर स्त्रियांच्या मताचा दाब पडल्याशिवाय स्त्रियांचें हें गाऱ्हाणें कधींही मिटावयाचें नाहीं' याचा अर्थ असा कीं, फॉसेट्बाईनीं चालू केलेली ही चळवळ ग्लॅडस्टन्सारख्या मुत्सद्याला पसंत पडूं लागली होती.

याच प्रसंगीं आणखी एक उपकारक गोष्ट घडून आली. बायकांना मतदानाचा हक्क असावा, हें अनेक पुरुषप्रतिनिधींना मान्य नव्हतें. परंतु ते संभवितपणानें गप्प बसत. एक सभासद मात्र संतापानें अगदीं बेहोष होऊन गेला; आणि भर पार्लमेन्टांत बायकांच्या विरुद्ध भलभलतें बोलूं लागला. तें त्याचें भरमसाट भाषण ऐकून, या चळवळीला कांहींसे विरुद्ध असलेले लोक मतदानाचा हक्क देण्याच्या

अंगालाच वळूं लागले. ते म्हणाले, 'आम्हां पुरुषांच्या मनांत स्त्रियांच्याविषयीं जर हेंच पाप वागत असेल, तर स्त्रियांना मतदानाचा अधिकार देणेंच अवश्यक आहे!'

इंग्लंडांत सर्वच बाजूनीं स्त्रियांची कुचंबणा होत असे. स्त्रिया कितीही हुषार असल्या, तरी सरकारी नोकरींत त्यांचा प्रवेश होणें मुश्कील असे; आणि चांगल्या चांगल्या वेतनाच्या जागा तर त्यांना मुळींच मिळत नसत. प्रत्यक्ष तिच्या वडील बहिणीची या बाबतींत काय दुरवस्था झाली होती, तें आपल्याला माहीतच आहे. १८८२ सालीं विवाहित स्त्रियांच्या जिनगीचा कायदा पार्लमेंटनें पास केला; पण तोंपर्यंत स्त्रीला स्वतः मिळवलेल्या धनावर सुद्धां कसलाही हक्क नसे. वारसा रूपानें तिला जें कांहीं मिळालें असेल, व तिनें स्वकष्टानें जें मिळविलें असेल, तें तें सारें नवऱ्याच्या मालकीचें होत असें. तिला भिकेला लावून नवऱ्यानें तिचें हें सारें धन भोगावें, नासावें, विकावे, अशी वहिवाट होती. अर्थात्च मिसेस फॉसेट् यांनीं अशी चळवळ सुरू केली कीं, बायकांना मतदानाचा हक्क मिळाल्याशिवाय त्यांच्या वर होत असलेला हे जुलूम कधींही नाहींसे होणार नाहीत.

असें समजूं नयें कीं, फॉसेट बाईंना या कामीं साहाय्याला कोणींच नव्हतें. देशांतल्या बहुतेक साऱ्या सुशिक्षित स्त्रिया यांच्या बाजूच्याच होत्या; आणि जसजसा त्यांच्या वाणीचा प्रभाव अधिकाधिक पडत चालला, तसतशी खुद्द राजधानीच्या शहरांतही त्यांची छाप पडत चालली. लंडनमध्यें त्यांच्या व्याख्यानाला अफाट गर्दी होऊं लागली; आणि बायकांची सभा म्हणून बाजूला तोंड करून फिदिफिदी हंसण्याची प्रवृत्ति पूर्णपणें मावळून सर्व श्रोते बाईंचीं व्याख्यानें मोठ्या अदबीनें ऐकूं लागले.

ब्रिस्टल येथें १८७१ सालीं त्यांचें एक मोठें दांडगें भाषण झालें. कोणी असा आक्षेप घेतला होता कीं, जर स्त्रियांना मतदानाचा हक्क दिला, तर त्यांच्या ठिकाणचें मार्दव व संस्कृतीचा हळुवारपणा यांचा लोप होऊन जाईल; आणि स्त्री शब्दानें जें जें कांहीं ध्वनित होतें, तें तें सारें नष्ट होईल. या आक्षेपाला उत्तर देतांना बाईंनीं काढलेले उद्गार खरोखरच मननीय आहेत. त्या म्हणाल्या, 'जी गोष्ट मूलतःच लाजिरवाणी आणि बेअब्रूची नाहीं, तिचा अवलंब स्त्रीनें केला, म्हणून स्त्रिया आपलें स्त्रीत्व गमावून बसतील, असें तुम्हीं सम-

जतां तरी कसें ? स्त्रियांनीं आत्तांपर्यंत रणांगणाची हवा पाहिलेली आहे; आपल्या भोंवती रक्तामांसाचा सडा झालेला त्यांनीं पाहिला आहे; आणि मरत असलेल्या घायाळांच्या किंकाळ्या त्यांनीं कानांनीं ऐकलेल्या आहेत. तसेंच अशा ठिकाणीं जाऊनही स्त्रियांनीं घायाळ पुरुषांच्या प्रकृतीची वास्तपुस्त केली आहे. हीं कामें त्यांनीं केल्यामुळें त्यांच्या अंगांतील स्त्रीत्व कमी झाल्याचें वर्तमान तुम्हीं कधीं ऐकलें आहे काय ? '

असल्या प्रतिप्रश्नांनीं श्रोत्यांचीं मनें फॉसेट्बाई सहज हस्तगत करीत असल्या पाहिजेत, हें उघड आहे. त्यांची लोकप्रियता भराभर वाढूं लागली. तथापि यशाचा उन्माद त्यांना केव्हांच आला नाहीं. प्रतिपक्षाचें म्हणणें काय आहे, त्याच्या अडचणी कोणच्या आहेत, याकडे त्या विधायक बुद्धीनें लक्ष देत; आणि आपल्या कुशल वाक्पाटवानें त्या सर्वांचा निरास करीत. अर्थातच स्त्रियांच्या मतदानाच्या चळवळीला जोराची भरती येत चालली; आणि मतदानाचा अधिकार मिळावा, यासाठीं त्यांनीं १८९५ सालीं केलेल्या अर्जावर अडीच लक्ष स्त्रियांनीं सह्या केल्या.

या सर्वांचा परिणाम काय झाला, हें आपल्याला माहीत आहे. आज इंग्लिश स्त्रीचें जीवित पुरुषांच्या जाचांतून बहुतांशीं मुक्त झालें आहे; आणि तिचा दर्जा पुरुषांच्या बरोबरीला आलेला आहे. या यशाचें श्रेय सर्वथा फॉसेट्बाईंचेंच नसलें, तरी त्याचा फार मोठा वाटा इंग्लंडचा आजचा स्त्रीसमाज त्यांच्याच पदरांत टाकील, यांत कसलाही संदेह नाहीं. इंग्लंडांतील स्त्रियांचें बंधविमोचन डोळे भरून पाहून सुखी झालेली ही स्त्री १९२९ सालीं मरण पावली.

• • •

हिनेंच पहिल्यानें गरिबांच्या झोपड्या नष्ट केल्या !

## बॅरनेस बर्डेट कूटस्   : ४ :

बॅरनेस बर्डेट कूटस् या इंग्रज स्त्रीचें चरित्र खरोखरच मोठें मननीय आहे. नशिबाचा योग, स्वतःची प्रवृत्ति, थोर पुरुषांचें साहचर्य आणि उदार माणसांचें मार्गदर्शन यांचा एक मोठा मनोज्ञ मिलाफ या बाईच्या चरित्रांत झाला; आणि व्हिक्टोरिया राणीच्या खालोखाल तिला इंग्लंडांतील प्रजा मानूं लागली !

हिचें पहिलें नांव ॲंजिला जॉर्जिना असें होतें. तिचा जन्म १८१३ च्या एप्रिल महिन्यांत झाला. तिसऱ्या जॉर्जच्या कारकीर्दीत सर फ्रान्सिस बर्डेट या नांवाचा जो एक उदारमतवादी मुत्सद्दी इंग्लंडांत होऊन गेला, त्याची ही शेवटची मुलगी होय. हिची आई साफिया ही इंग्लंडांतील थॉमस कूटस् या नांवाच्या एका श्रीमंत पेढीवाल्याची मुलगी होती. दोन्ही घराण्यांतील माणसें उच्च कुलांत आणि श्रीमंतींत वाढलेलीं असलीं, तरी त्यांच्या ठिकाणीं गरिबांच्या संबंधीचा जिव्हाळा विशेष असे. रिफॉर्म बिलाच्या वेळीं सामान्य लोकांच्या बाजूनें जे विशेष झगडणारे लोक होते, त्यांत तिच्या वडिलांची गणना होत असे. त्यांनीं हा झगडा इतक्या त्वेषानें केला, कीं राजानें त्यांची रवानगी शेवटीं टॉवर ऑफ लंडन या इतिहासप्रसिद्ध तुरुंगांतच केली ! त्यांना पकडतांना सुद्धां सरकारी पोलिसांना मोठीच मारामारी करावी लागली; आणि लोकांनीं पोलिसांवर दगडांचा वर्षाव केला. हा सर फ्रान्सिस १८४४ मध्यें वारला; आणि थोड्याशा दिवसांत त्याची बायकोही वारली व जॉर्जिना पोरकी बनली.

तिकडे आजोळच्या घराण्यांत एक मोठा चमत्कारिक फरक पडला. जॉर्जिनाची आजी वारली. आणि श्रीमंत पेढीवाले जे आजोबा, त्यांनीं चौऱ्यांशी वर्षांच्या वयाला एका देखण्या नटीशीं लग्न लावलें. कांहीं दिवसांनीं थॉमस कूटस् हा वृद्ध नवरदेव मरण पावला. पण या नटीवर त्याचा जीव इतका जडला होता, की पहिल्या बायकोच्या प्रजेला कांहीही न ठेवतां त्यानें आपली सर्व जिनगी या

नटीच्या नांवानेंच करून टाकली. अर्थात त्याची नात जी जॉर्जिना तिला मोठाच विषाद वाटला. हा विषाद अधिकच तीव्र बनावयास आणखी एक कारण झालें.

वृद्ध नवरदेव लवकरच मेलेले आणि नटी तर श्रीमंत बनलेली. या नटीनें ड्यूक आफ सेंट अलबान्स या सरदाराशीं पुनर्विवाह केला. म्हणजे कूटस्च्या घराण्यांतील सारा पैसा ड्यूकच्या घराण्यांत गेला! कूटस्च्या घराण्यांतील कांही माणसांनीं आतां डचेस बनलेल्या या बाईची मर्जी संपादण्यासाठीं पुष्कळ लटपटी करून पाहिल्या; परंतु कांही उपयोग झाला नाही. मात्र विशेष गोष्ट म्हणजे ही कीं, आजोबांचा पैसा आपल्याकडे यावा, म्हणून जॉर्जिनानें या बाईची कधींही मनधरणी केली नाही.

पण दैवाचें चक्र मोठें गंमतीनें फिरत राहिलें; आणि कोणाच्या ध्यानीं ना मनीं असा एक प्रकार या डचेसनें करून टाकला. आपण मरतों असें जेव्हां तिला दिसूं लागलें, तेव्हां आपल्याकडे आलेली सारी दौलत कूटस्च्या घराण्यांतील आहे हें ओळखून, या बाईनें मृत्युपत्रांत लिहून ठेवले कीं, "माझ्या पहिल्या नवऱ्याची नात जी ॲंजिला बर्डेट, तिला ही सारी दौलत मिळावी. अट मात्र एवढीच कीं, बर्डेट या आपल्या आडनांवापुढें कूटस् हें आजोळचें आडनांवही तिनें जोडून द्यावें." अशा रीतीनें तेवीस वर्षांच्या वयाला अजिला जॉर्जिना बर्डेट हिला दोन कोट रुपयांचा खजिना वारस म्हणून मिळाला! खुद्द इंग्लंडच्या राणीची सुद्धां खाजगी दौलत इतकी मोठी नव्हती.

भरींत भर म्हणून आणखी एक मौजेची गोष्ट घडून आली. ड्यूक ऑफ सेन्ट अलबान्स याच्या बायकोनें पहिल्या नवऱ्याकडून आलेली दौलत त्याच्या नातीच्या नांवानें करून ठेवतांना आपल्या दुसऱ्या नवऱ्याची म्हणजे ड्यूकचीहि एक तरतूद करून ठेवली. बावन एकरभर पसरलेल्या तिच्या मिळकतींतील एका उद्यानांत एक मोठा सुंदर राजवाडा होता. हें उद्यान व हा राजवाडा तिनें ड्यूकच्या नांवाने करून टाकला. यांतून त्या ड्यूकला दर वर्षी एक लाख रुपये मिळत असत. याचा भोगवटा थोडीशीं वर्षें घेतो तोंच या ड्यूकलाहि मरणानें गांठलें; आणि मग, ही मिळकतही ॲंजिला जॉर्जिना हिलाच वारसा हक्काने मिळाली.

नशिबाचा जोर असला म्हणजे काय घडतें तें बघा. वास्तविक पाहतां, तिचा बाप जो सर फ्रान्सिस, त्याच्यापाशीं कांहींच फारसें नव्हते; आणि म्हातारपणीं

प्रेमवेडा बनलेल्या आजोबानें सारी दौलत एका नटीच्या हवालीं केली होती. ही दौलत बरोबर घेऊन नटी दुसऱ्या नवऱ्याच्या घरीं गेली होती. पण मरतांना तिला सद्बुद्धि झाली; आणि इतकीं चंचल बनलेली लक्ष्मी योग्य मार्गावर येऊन, ॲंजिला जॉर्जिना हिला मिळाली ! तेवीस वर्षांची, अत्यंत सुस्वरूप तरुण मुलगी, रहावयाला राजवाड्यासारखीं सुंदर मंदिरें, भोंवताली कित्येक एकरांचें रम्य उपवन, आणि घरांत दोन कोट रुपयांचा खजिना. अर्थात् या देखाव्याकडे कोणाकोणाचें लक्ष गेलें असेल, याची कल्पना आपल्याला सहज करतां येते. पण इतिहास घडला तो मात्र निराळा !

मोठमोठाल्या डचेसेस्, इंग्लंडचा वृद्ध मुख्य प्रधान ड्यूक ऑफ विलिंग्टन्, अशा सारख्या थोर स्त्रीपुरुषांची वात्सल्यबुद्धीची पाखर तिच्यावर राहूं लागलीच. पण नवलाची गोष्ट ही कीं, तेव्हां हळूंहळू उदयास येऊं लागलेला इंग्लंडचा सुप्रसिद्ध कादंबरीकार जो चार्लस् डिकन्स, त्याची आणि ॲंजिला जॉर्जिना हिची ओळख झाली. डिकन्सचें कादंबरीवाङ्मय वाचून जॉर्जिनाच्या मनांत, समाजांतील हीन, दीन, दुःखी, दुबळीं अशा लोकांविषयीं मोठीच करुणा उत्पन्न झाली होती. त्यांतच जेव्हां त्याची प्रत्यक्ष ओळख झाली; आणि तो तिच्याशीं संभाषण करूं लागला, तेव्हां या स्त्रीच्या मनाला कारुण्याची मोठीच भरती येऊं लागली; आणि आपल्याजवळ असलेल्या पैशाचा उपयोग निर्धन आणि कष्टी लोकांच्या विपत्ती नाहीशा करण्याकडेच करावा, असा निश्चय तिनें केला.

डिकन्सला बरोबर घेऊन ही श्रीमंतीण लंडन शहरांतील दारिद्र्यानें गांजलेल्या आणि घाण व दुर्गन्धी यांचा बुजबुजाट झालेल्या पेठांतून मुद्दामच हिंडूं लागली. ‘ नोव्हास्कोशिया बाग ’ या नांवाची एक अतिशय घाणेरडी वस्ती तेव्हां लंडन शहरांत होती. ही वस्ती म्हणजे रोगाचें माहेरघरच बनलेलें असे. चिखल आणि सडके पदार्थ हीं जिकडे तिकडे पसरलेलीं असत; आणि नीतिअनीतीचा कसलाही विवेक येथल्या लोकांना राहिलेला नव्हता. चोरटे, खुनी, आणि छिनाल अशा लोकांचा गजबजाट येथें झालेला असून प्रत्यक्ष पोलिसांनाही तेथें जायची भीति वाटत असे. बर्डेट कूटस् हिनें ही सगळीच्या सगळी बाग-म्हणजे ह्या वस्तीची सारी जागा-सरकारांतून एकदम विकत घेतली. आणि, पहिल्या सपाट्याला तेथलीं सारीं घरें पाडून टाकून चांगलें स्वच्छ मैदान बनवलें;मग या मैदानावर आधुनिक पद्धतीचे गाळे बांधून तिनें या लोकांना रहावयास दिले. पाण्याच्या तोट्या, संडास, मोऱ्या,

घराघरांच्या मध्यें सोडलेली जागा, मुलांना खेळावयासाठीं राखून ठेवलेली जागा, अशी सर्व तऱ्हेची अद्ययावत् व्यवस्था तिनें केली; आणि लोक स्वच्छता ठेवतात ना, यावरही पाळत ठेवली. हे गाळे इतके चांगले बांधले आहेत, कीं घरबांधणीच्या कल्पनांत बदल होत चाललेले असले, तरी ते अजूनही आधुनिकच असल्यासारखे दिसतात !

हें झाल्यावर डिकन्स यानें या बाईचें लक्ष दुसऱ्या एका बाबीकडे वळवलें. लंडन शहरांत अशा कितीतरी स्त्रिया होत्या, कीं ज्यांच्यावर गुन्हेगार म्हणून शिक्का बसलेला होता. डिकन्सला वाटे कीं, या बाया मूळच्या गुन्हेगार किंवा पातकी नाहीत. त्यांच्यावर भलभलते प्रसंग गुदरल्यामुळें त्या असल्या हीन अवस्थेला येऊन पोहोचल्या आहेत. या दारुण परिस्थितींतून त्यांना सोडवावें, अशी योजना डिकन्स यानें आंखली; आणि प्रश्न स्त्रीजातीचाच असल्यामुळें बर्डेट कूटस् हिनें तो फार ईर्ष्येनें हातीं घेतला.

या बायांना सुधारावयाचें, तर प्रथम त्यांची चांगल्या ठिकाणीं राहण्याची व्यवस्था केली पाहिजे, हें ओळखून बर्डेट हिनें ' सदन ' नांवाची एक भली मोठी इमारत बांधली. ज्या कोणा स्त्रीला पापाच्या आणि घाणीच्या कर्दमांतून बाहेर पडावयाचें असेल, तिनें या सदनांत येऊन रहावें, अशी पत्रें या स्त्रियांना डिकन्स यानें स्वतःच लिहिलीं. प्रत्यक्ष पत्रें लिहिण्याचें काम जरी डिकन्स यानें केलेलें असलें, तरी माहितगार लोकांच्या मताप्रमाणें, त्या पत्रांतला सारा मतलब बर्डेटनें सांगितलेला असे. कारण, अशा स्त्रियांचें मानसिक दुःख काय असूं शकेल, याची खरी खरी कल्पना स्त्री म्हणून, बर्डेटलाच असणें शक्य होतें. पत्रांत म्हटलेले असें कीं, ' बाई, मी तुम्हांला पत्र लिहितों; पण मी कोणी तुमच्याहून श्रेष्ठ माणूस आहे म्हणून लिहीत नाहीं. तुमच्या वर्तनाची ओळख तुम्हांला करून देऊन तुम्हांला लाजवावें, किंवा तुमच्या मनाला क्लेश उत्पन्न करावे, अशी इच्छा मला खरोखरच नाहीं. तुमच्या संबंधीची केवळ करुणाबुद्धिच माझ्या मनांत वागत असते. अशा परिस्थितींत सांपडलेल्या माझ्या बहिणीला मीं जसें लिहिलें असतें, तसेंच मी तुम्हांला लिहीत आहे. आपल्या या नगरींतील एका उदारमनस्क श्रीमंत कुमारिकेनें तुम्हांला आश्रय मिळावा, म्हणून एक सुंदरसें सदन बांधलें आहे; सध्यांच्या आपल्या गर्तेतून बाहेर पडावें, अशी इच्छा जर तुम्हांला खरोखरच होत असेल, तर तुम्ही तत्काळ या सदनांत या आणि तेथें वसति करा. तुम्ही रस्त्यावरून

चाललेल्या असलांत, म्हणजे तुमच्याकडे पाहून या उदार कुमारिकेचें हृदय विदीर्ण होऊन जातें. ती तुम्हांला या सदनांत आश्रय देईल. येथें तुम्हांला कोणी वाईट-वाकटें बोलणार नाहीं. तुमच्या आजवरच्या पातकांचा उल्लेख येथें कोणी करणार नाहीं. येथें तुम्हांला कोणी हिणवणार नाहीं; आणि तुम्हीं पातकी स्त्रिया म्हणून तुम्हांला कोणी निराळें चोळीलुगडेंही देणार नाहीं; येथें राहणाऱ्या सर्वांना सारखेंच पोशाख मिळतील. पश्चात्तापानें दग्ध होऊन तुम्हीं तेथें एकदां राहूं लागला, तरी इतर समाजापासून तुम्हांला मुद्दामच दूर दूर ठेवावें, अशाही या थोर स्त्रीची इच्छा नाहीं. हळूं हळूं तुम्हांला समाजांत प्रविष्ट करून घ्यावें, तुम्हांला आणि लोकांना तुमच्या पूर्वचरित्राचा विसर पडला म्हणजे, तुम्हीं वाटल्यास कोठेंही दूरदेशीं जावें, आपल्या पसंतीच्या पुरुषांशीं लग्नें करावी; आणि तुम्हीं सुखानें संसार करावा, अशी या स्त्रिची इच्छा आहे. ”

बाईच्या तर्फे डिकन्स यानें पाठवलेल्या या पत्रांना कितीतरी बायांनीं भराभर उत्तरें दिलीं; आणि त्या या सदनांत येऊन राहूं लागल्या. या सदनाला ‘ युरेनिया कॉलेज ’ असें नांव मिळालें. आपण येथें रहात आहों; तर आतां आपण अब्रूदार स्त्रिया झालों आहों, असें या बायांना वाटूं लागे; आणि मिळालेली पत वाढविण्यासाठीं त्या अधिकच नेकीनें आणि सचोटीनें वागूं लागल्या. हळू हळू बर्डेटला दिसूं लागलें कीं, आपण दाखवलेलें दातृत्व वांया गेलेलें नाहीं. नवे संसार उभे रहात आहेत, नवीं जोडपीं गुण्या गोविंदानें नांदत आहेत, आणि त्यांचीं घरें मुलाबाळांनीं भरून गेलीं आहेत. ‘ युरेनिया कॉलेज ’ ची ही कल्पना एकंदर समाजालासुद्धां मोठी अद्‌भुत वाटली.

एकीकडे बर्डेट हिच्या औदार्याचा आणि डिकन्सच्या मार्गदर्शनाचा असा एक विलास चालूं असतांना, दुसरीकडे एका तरुण माणसाच्या मनांत एक निराळाच विकल्प उत्पन्न झाला. या माणसाचें नांव डयून असें होतें. याच्या मनानें घेतलें कीं, जर ही कुमारी एवढी सुंदर आहे, आणि श्रीमंत आहे, आणि जर आपलें मन तिच्यावर बसलेलें आहे, तर तिला प्रत्यक्ष मागणी घालावयास कांहींच हरकत नाहीं. ‘ माझें तुमच्यावर फार प्रेम आहे, ’ येवढेंच त्यानें पत्रांत म्हटलें असतें, तर तिकडच्या पद्धतीप्रमाणें बर्डेटला विशेषसें कांहींच वाटलें नसतें. अशा प्रकारचीं अनेक पत्रें तिच्याकडे आतांपर्यंत आलेलीं होतीं. पण या डयूकचें ‘ प्रेम ’ थोडें अनावरच झालें; आणि शिष्टाचाराची मर्यादा ओलांडून तो बर्डे-

टच्या भोंवतीं भोंवतीं करूं लागला. तिनें प्रथम प्रथम त्याच्याकडे लक्षच दिलें नाहीं. मग ' बाई घरांत नाहीत, ' असें नोकरांकरवीं सांगण्याचा परिपाठ तिनें चालू ठेवला. इतक्यांतूनही दृष्टादृष्ट झालीच, तर ती त्याच्याकडे तिरस्कारानें पाहूं लागली. हें सारें तिने केलें; पण डयूनचा लघळपणा कांहीं केल्या संपेना.

पातकी स्त्रियांना समाजांत आणून सोडण्याची योजना प्रत्यक्ष अंमलांत आणाल्यानंतर, लंडन शहराच्या दरिद्री वस्तींतील मच्छीबाजाराकडे बर्डेट हिचें लक्ष गेलें. हा बाजार अतिशय घाणेरडा असे. मक्तेदार लोक मालाची कोंडी करून गरीब लोकांना तो महागाईनें विकत. बर्डेट हिनें जवळच एक चांगलीशी जागा पाहून एक मोठा शोभिवंत, स्वच्छ आणि ऐसपैस असा मच्छीबाजार बांधला; आणि स्वतंत्र तऱ्हेनें तेथें माल आणवण्याची व्यवस्था केली. अशासाठीं कीं, तेथील गरीब गिऱ्हाईकाला तो स्वस्ताईनें मिळावा. गरीब लोकांना साहाय्य करण्याची बर्डेटची बुद्धि खरोखरच चांगली होती. पण मक्तेदारांनीं या कामांत तिला यश मिळूं दिलें नाहीं. स्वतंत्रतणें ते तेथें मालच येऊं देईनात. आणि शेवटी तिनें हें सुरूं केलेलें मार्केट केवळ रिकामें पडून राहिलें.

लवकरच बर्डेट हिनें दहा लक्ष रुपये खर्च करून वेस्ट मिन्स्टर येथें आपल्या पित्याचें स्मारक म्हणून, एक चर्च बांधलें आणि कांहीं शाळाहि बांधल्या. या संस्थांना लागणारा सर्व खर्च बर्डेट स्वतः करीत असे. हें चर्च तर इतकें सुंदर बांधलें होतें, कीं लोकांनीं त्याच्याकडे बघतच रहावें. त्याचें शिल्प तर वाखाणण्यासारखें आहेच आहे; पण तेथें ठेवलेल्या पुराणकालीन कांहीं कांहीं वस्तू मुद्दाम जाऊन पहावयास हव्या, अशा योग्यतेच्या होत्या. डयूक ऑफ विलिंग्टन यानें स्थंडिलावर घालावयास एक भरजरी चादर दिली होती, आणि भोंवतालीं लावावयास गजनीचे पडदे दिले होते. श्रीरंगपट्टणावर हल्ला करून जेव्हां या डयूकनें टिपू सुलतानचा राजवाडा हस्तगत केला, तेव्हां जमा केलेल्या लुटींत ही भरजरी चादर आणि हे गझनीचे पडदे त्यानें तिकडे नेले होते. अशा या शोभिवंत ठिकाणीं मुलांमुलींच्या शिक्षणासाठीं बर्डेट हिनें हरतऱ्हेच्या संस्था प्रस्थापित केल्या; आणि कामकरी वर्गांतील मुलांमुलींना येथील शिक्षणाचा उत्तम उपयोग होऊं लागला. बर्डेट हिचें लक्ष अशा परोपकारांच्या कार्यांत गुंतलेलें असे; पण डयून यानें आपली चिकाटी सोडली नाहीं. नको त्या ठिकाणीं हा दत्त म्हणून येऊन उभा राही; आणि परोक्ष रीतीनें आपली प्रीतीचीं मागणी तिच्या कानावर घाली. आपल्या मागचा हा ससेमिरा

कसा सुटेल, असें बर्डेटला झालें होतें. परंतु तिचा कांहीं इलाज चालेना. अशा अडचणींतून बाहेर पडावयास कांहीं कायद्याचा आश्रय मिळतो कां, असेंही तिनें पाहिलें; पण याहीं कामीं तिची निराशा झाली.

लवकरच लंडन शहरांत हातमाग चालविणाऱ्या कोष्ट्यांच्या धंद्याचा प्रश्न उत्पन्न झाला. हे कोष्टी रेशमी कापड विणीत असत; आणि या कापडाला गिऱ्हाईकही चांगलें असे. देशादेशांत दळणवळण वाढूं लागलें होतें. त्यामुळें लंडनची बाजारपेठ हस्तगत करावी, असें परकीय देशांतील कापडवाल्यांना वाटूं लागलें. रेशमी कापडांच्या ताग्यांचे गठ्ठेच्या गठ्ठे लंडनमध्यें येऊं लागले; व हें कापड स्वस्त मिळूं लागलें. अर्थात् शहरांतील कोष्टयांचा धंदा एकदम बसला; आणि लवकरच त्यांना अन्नान्नदशा प्राप्त झाली. बर्डेटबाईचें लक्ष त्यांच्या दुःस्थितीकडे गेलें. ज्याला जी मदत हवी असेल, त्याला ती देण्याचें काम तिनें सुरू केलें. पोट भरण्यासाठीं परदेशीं जातों, असें जे म्हणाले, त्यांना तिनें वाटखर्चीला पैसे दिले. जे कुणी दुसऱ्या धंद्यांत पडूं म्हणाले, त्यांना तिनें भांडवलें दिलीं. ज्यांना घरचें कोणी नव्हतें, अशा बायकांचा आणि मुलींचा प्रश्न तर फारच बिकट बनला. पण बर्डेट हिनें या मुलींना निरनिराळ्या प्रकारचीं शिक्षणें देऊन कामाला लावलें; आणि प्रौढ स्त्रियांना शिवण्या-टिपण्याचें काम गांठून दिलें. पोलिसांना आणि लष्करांतील शिपायांना खूप पैरणी लागत. या कामाचा मक्ता घेऊन या प्रौढ स्त्रियांचा प्रश्न बर्डेटनें सोडविला. जे कोणी आजारी होते, त्यांच्या औषधपाण्याची व्यवस्था तिनें केली. अशा रीतीनें बेकार बनलेल्या कोष्टयांचा प्रश्न केवळ खाजगी रीतीनें सोडविण्यांत आला.

१८६७ सालीं लंडनच्या पूर्वभागांत महामारीची सांथ आली; त्याबरोबर बर्डेट हिनें नर्सेस, आरोग्य-तपासनीस इत्यादिकांची नेमणूक करून या सर्व वस्तींत जंतुनाशक द्रव्यांचा सडा घालण्याची व्यवस्था केली. मिळवते पुरुष पटापट मेल्या-मुळें बायकामुलें उघडीं पडूं लागलीं. म्हणून तांदूळ, ॲरोरूट, मांस, साबुदाणा, निरनिराळ्या तऱ्हेचीं मद्यें, दूध, रजया, ब्लँकेटें असें पदार्थ या वस्तींत तिनें खंडीवारी पाठवून दिले.

इकडे बर्डेटबाईचा हा परोपकाराचा उद्योग चालू असतां, डयून याच्या खेपा चालूंच होत्या. शेवटी पैक्याआडक्याच्या बाबतींत त्यानें लबाडीचें कृत्य केलें. म्हणून त्याच्यावर खटला होऊन त्याला पांच वर्षांची शिक्षा झाली. बर्डेट हिला

बरें हायसें वाटलें. पांच वर्षे तुरुंगांत राहिल्यानें याची प्रेमाची तहान मरून जाईल, असा अंदाज तिनें केला; पण हा भाबडा गृहस्थ पांच वर्षांनीं तुरुंगांतून सुटल्याबरोबर पुन्हां त्यानें आपला लाळघोटेपणा चालू केला. परंतु शेवटी ही बाई बघत नाहीं, असें पाहून हा कंटाळला; आणि त्यानें आपलें प्रेमाचें सुकाणूं राजघराण्यांतील एका मुलीकडे वळविलें. या प्रेमवेड्याकडे हळू हळू पोलिसांचे लक्ष जाऊं लागलें; आणि शेवटीं त्यांनीं त्याला एका वेडेखान्यांत नेऊन ठेवलें! बर्डेट ही एवढी श्रीमंत मुलगी आणि तिला आश्रयही थोरामोठ्यांचा पण या प्रेमवेड्याचें लफडें कायद्याचा आश्रय घेऊन तिला तोडून टाकतां येईना, याचें तिला नवल वाटलें. या माणसाचा तिला फारच उपसर्ग पोंचत होता. शेवटीं अशा रीतीनें त्याचा अंत झाला.

मुक्या प्राण्यांचा छळ सगळीकडे नेहमींच होतो. बर्डेट हिचें लक्ष या प्राण्यांच्या हालांकडे जाऊं लागलें. या प्राण्यांना कठोर रीतीनें वागविणारांचा बंदोबस्त व्हावा, म्हणून प्रस्थापित झालेल्या संस्थेंत बर्डेट आरंभींच दाखल झाली होती. या कामीं लागेल तेवढा पैसा ती खर्च करीत असेंच. लहानपणापासूनच मुलामुलींच्या ठिकाणीं पशूच्या संबंधानें करुणाबुद्धि उत्पन्न व्हावी, म्हणून निरनिराळ्या शाळांत या विषयांवरील निबंधाच्या स्पर्धा तिनें चालू केल्या; आणि उत्तम निबंध लिहिणारांना मुबलक बक्षिसें तिनें देऊं केलीं. टांग्याचे घोडे, ट्रामचे घोडे यांच्याकडेही तिचे लक्ष असे. जर मालक लोक किंवा हाक्ये त्यांना निर्दयपणानें वागवूं लागले, तर त्यांच्यावर पाळत ठेवून बर्डेट त्यांचा चांगला बंदोबस्त करून टाकी.

१८४८ सालांत आयर्लंडमध्यें फार मोठा दुष्काळ पडला. तेव्हां तिनें तिकडील मिशनऱ्यांच्या हातीं एक लाख रुपये दिले; आणि त्यांतल्या त्यांत गरीब लोकांच्या भाकरीसाठीं या रक्कमेचा व्यय व्हावा, अशी व्यवस्था तिनें केली. रशिया व तुर्कस्तान यांचें युद्ध १८७७ सालीं सुरू झालें; आणि डॅन्यूब खोऱ्यांत रशियाची स्वारी येऊन पोंचली. हजारों तुर्की लोक जीव घेऊन पळत सुटले. त्यांची अन्नान्नदशा झाली. थंडीचा कडाका पडला, बर्फाचीं वादळें होऊं लागलीं. हजारों लोक वाटेनें अत्यंत विपन्न स्थितींत इस्तंबूल येथें दाखल झाले. बादशहानें निरनिराळ्या मशिदींत त्यांना जागा दिलीं, राजवाड्याचीं मोठालीं दालनें खुलीं करून दिलीं, आणि लोकांनींही आपल्या घरांत त्यांना ठेवून घेतले. बर्डेटबाईच्या कानीं हें वर्तमान आलें; आणि ज्यांच्यावर प्रसंग आला होता, ते मुसलमान असलें तरी

प्राणिमात्र तेथून सारे एकच आहे; आणि आपण जर खरेखुरे ख्रिस्ती आहोंत, तर या लोकांना मदत केली पाहिजे, असें तिनें ठरविलें; आणि एक मोठा थोरला निधि तिनें जमा केला. तीन लक्ष रुपये जमा करून तिनें सुलतानाकडे पाठवून दिलें. सुदान, झुलूलॅण्ड इकडे लढाईवर गेलेल्या शिपायांच्या स्वास्थासाठीं तिनें लाखों रुपयांच्या देणग्या दिल्या. जेरुसलेम शहरांत पिण्याच्या पाण्याची नीट व्यवस्था नव्हती. म्हणून जुन्या काळीं तेथें घातलेले खापरी नळ जर शहरचे अधिकारी पुन्हां चालू करीत असतील, तर खर्चाची व्यवस्था आपण करूं, असें बाईनें तेथील अधिकाऱ्यांना कळविलें. परंतु अधिकाऱ्यांना ही कल्पना मानवली नाहीं; आणि त्यांनीं बाईच्या दातृत्वाचा उपयोगही करून घेतला नाहीं.

बर्डेटबाईची दृष्टि किती विशाल आणि सूक्ष्म होती, हें आणखी एका प्रकारणावरून दिसून येईल. १८५८ सालीं एडिंबरो येथें ग्रे नांवाचा माणूस मरण पावला. त्याचा दफनविधि झाला. पण त्याला नातेवाईक फारसे कोणी नव्हते. एक बॉबी नांवाचा विश्वासू कुत्रा मात्र होता. रोजच्या रोज हा कुत्रा आपल्या धन्याच्या गारीपाशीं येऊं बसून लागला. स्मशनांतील पहारेकऱ्यानें त्याला हांकून द्यावें, पण बॉबीनें धन्याच्या गारीपाशीं पुन्हा येऊन बसावें, असा क्रम चालूं झाला. होता होतां पहारेवाल्यांना त्याची कींव येऊं लागली; आणि ते त्याला भाकरी टाकू लागले ग्रेच्या खड्डयावर दगडसुद्धां ठसविला नव्हता. थोड्याच दिवसांनीं सारी जमीन सपाट होऊन गेली. आणि ग्रेला कोठें पुरले आहे, हें सुद्धां कळेनासें झालें. पण बॉबीनें मात्र त्या ठिकाणाची ओळख चांगली ठेवली होती. वर्षामागे वर्षं गेलें. पण बॉबीने धन्याच्या गारीवरील पहारा कधींच सोडला नाहीं; आणि पहारेकऱ्यांनीं त्याला तुकडा टाकावयाचे कधीं बंद केले नाहीं. पुढें १८६७ साली नगरपालिकेनें कुत्र्यावर कर बसविण्याचे ठरविलें. अध्यक्षांच्या कानावर बॉबीची हकिगत गेली. तेव्हां त्यांनीं आज्ञापत्रक काढलें कीं, बॉबीला कर माफ व्हावा! त्यांनीं कौतुकानें त्याच्या गळयांत एक चांगलासा पट्टाही घातला. वर्षानुवर्ष कुत्रा मालकापाशीं येतच राहिला. शेवटी १८७२ सालीं बॉबी मरण पावला. त्याच्या विश्वासूपणाची ही हकीगत बर्डेट हिच्या कानीं आली. तेव्हां तिनें बॉबीचा एक पंचरशी धातूचा पुतळा केला; आणि एक अतिशय सुंदर तांबड्या संगमरवरी पाषाणाचा स्तंभ उभा करून त्यावर तो बसविला. पायथ्याशीं कुत्र्यांना पाणी पिण्यासाठीं म्हणून एक सुंदरशी पुष्करणीही बांधली. प्रो. ब्लॅकी

यानें त्या कुत्र्याच्या विश्वासूपणाचें आणि बर्डेटच्या रसिकपणाचें केलेलें वर्णन या स्तंभावर कोरलेलें आहे.

बर्डेट कूटस् हिच्या औदार्याची वार्ता व्हिक्टोरिया राणीच्या कानीं केव्हांच गेलेली होती. व्हिटोरियाला माहित होतें कीं, आपल्याजवळही जितका पैसा नाहीं, तितका या बाईपाशीं आहे; आणि त्याचा उपयोग दुःखितांचा परामर्श घेण्यासाठीं ती करीत आहे. तसेंच सर्व देशभर तिच्या नांवाचा जयजयकार चालूं असतो, या गोष्टीचाही व्हिक्टोरियाच्या मनावर मोठाच परिणाम झाला; आणि म्हणून तिला बॅरनेस करण्याचें तिनें ठरविलें. ही वार्ता देशांत कळतांच राणीच्या या हेतूला सर्व संस्थांनीं आणि लोकांनीं मोठ्या आनंदानें आपली पसंती दर्शविली; आणि १८७१ सालीं बर्डेट ही बॅरनेस ( एक सर्वश्रेष्ठ मानकरी ) झाली. याच वेळीं युवराजांच्या हस्तें ' देशांतील दोन नंबरची म्हणजे राणीच्या खालोखालची स्त्री ' ही पदवी तिला बहाल करण्यांत आली. तुर्कस्तानच्या सुलतानानेंही ' मेजीदी ' आणि ' शफाकत ' अशा पदव्या तिला बहाल केल्या; आणि लोकही तिला लेडी कूटस् असें म्हणूं लागले. ज्या बाल्टिमोर परगण्यांतील लोकांना तिनें अनेक प्रकारच्या संकटांतून वांचविलें होतें, ते लोक तर तिला बाल्टिमोरची राणीच म्हणूं लागले. ' फ्रीडम ऑफ दी सिटी ऑफ लडंन ' मिळणें हा एक मोठा बहुमान समजतात. हा बायकांना तर क्वचित् एकादे वेळीं मिळतो. १८७३ सालीं गिल्डहॉलध्यें फार नामांकित समारंभ झाला; आणि बर्डेट हिला हा सन्मान प्राप्त झाला.

बर्डेटचे मित्रही फार मोठाले लोक होते. चार्लस् डिकन्स हें नांव मागें आलेलेंच आहे. थॉमस मूर हाही तिचा मित्र होता. डॉ. मोफात आणि डॉ. लिव्हिंग्स्टन हे आफ्रिका खंडाचे संशोधक मिशनरी या बाईच्या मित्रपरिवारांतीलच होते. सुदान प्रान्तांत सेनापति गॉर्डन् याचा वध झाला, हें आपल्याला माहित आहे. साम्राज्यवादी सरकारचा तो एक हस्तक म्हणून आतां त्याचें नांव अप्रिय झालें असलें, तरी गॉर्डन् हा मोठा उमदा आणि उदार माणूस होता. सुदान प्रान्ताकडे जेव्हां तो शेवटीं जावयास निघाला, तेव्हां बर्डेटचा निरोप घेण्यासाठीं तो तिच्या घरीं कांहीं वेळ जाऊन राहिला होता. जातांना, ' आपलें स्मरण म्हणून मला एक लहानशीं पत्रपेटिका आपल्या हातानें द्या, ' अशी विनंती त्यानें बर्डेटला केली. गॉर्डन्वर पुढें जेव्हां तेथील रानटी लोकांनीं हल्ला केला, आणि त्याच्या छातीवर भाले रोखले, तेव्हां कोटाच्या आंतल्या अंगाला त्यानें आपल्या मैत्रिणीची ही पत्र-

पेटिका ठेवली होती, असें पुढें दिसून आलें. तो तिकडे गेल्यावर त्याला सर्व तऱ्हेचीं सुखसाधनें उपलब्ध व्हावींत, म्हणून बर्डेट हिनें वाटले तितका पैसा खर्च केला. त्याला पत्रें पोंचणें अवघड होत आहे, असें दिसतांच मोरक्को देशांतील एका हुन्नरी व्यापाऱ्याला तिनें हाताशी धरलें. वेषान्तराची विद्या याला चांगली साधली होती. तो सुदानी माणसासारखा दिसूं लागला. गॉर्डन याला लिहिलेलीं आपलीं खाजगीं पत्रें एका पेटींत घालून बर्डेट हिनें या व्यापाऱ्याच्या हवाली केलीं; आणि तीं त्यानें सुदान प्रांतांत जाऊन गॉर्डन याला पोंचतीं केलीं. आपल्यासंबंधीं बाईच्या मनांत वागत असलेला हा आत्मभाव पाहून सेनापति गॉर्डन याला निःसंशय धन्यता वाटली असावी.

१८८१ सालीं बर्डेट बाईनें आपल्या एका कृत्यानें साऱ्या जगाला आश्चर्याचा धक्काच दिला. या वेळीं बाईंना सदुसष्ट वर्षें पूर्ण झालीं होतीं. पण त्यांनीं लग्नपत्रिका काढल्या; आणि वुइल्यम ॲश्मील बार्टलेट् यांच्याशीं आपण विवाह करणार आहोंत, अशी घोषणा केली. आतांपर्यंतचा सारा काळ परोपकारांत आणि धर्मकृत्यांत गेलेला; आणि वयही सदुसष्ट वर्षांचें होऊन गेलेलें; अशा वेळीं बाईंना लग्न करण्याची बुद्धि व्हावी, याचें सर्वांना नवलच वाटलें; आणि कांहीं कांहीं लोकांच्या मनांतून तर बाई थोड्याशा उतरल्या. लग्न केलें हें तर एक नवल होतेंच होतें; पण दुसरें नवल हें कीं, या सदुसष्ट वर्षांच्या बाईचा नवरा बार्टलेट् हा तीस वर्षांचा तरणाबांड पोऱ्या होता! हळू हळू लोकांना बसलेला आश्चर्याचा धक्का ओसरला; आणि बाईचें वैवाहिक जीवन फार सुखानें चालू आहे, हें कळल्यावर लोकांनाही बरें वाटूं लागलें. एका वर्तमानपत्राच्या बातमीदारापाशीं बाई म्हणाल्या कीं, ' आतांपर्यंतचा माझा जन्म सुखानेंच गेला होता; पण आतांची ही माझी शेवटचीं वर्षें विशेषच सुखानें जात आहेत, असें मला वाटतें. " बाईनीं आपण होऊनच अशी जबानी दिल्यानंतर शंकेखोरांना आणि कुचुकुचू करणारांना बोलायला जागाच उरली नाहीं. बाईचा संसार श्रीमंती थाटानें व मोठ्या सुखासमाधानानें चालू होता. घराचा थाट तर केवळ अलौकिक होता. वाडा नाना प्रकारच्या अलंकारांनीं शृंगारलेला असून कलावंतांनीं काढलेलीं चित्रें आणि बनविलेले पुतळे यांनीं नटलेला होता. नाना प्रकारचे वेंचक पशुपक्षी बाईनीं जमा केले होते. आल्यागेल्याची बडदास्त तर राजेशाही पद्धतीनें राहात होती. अशा प्रकारें जीविताची शेवटचीं सव्वीस सत्तावीस वर्षें बाईनीं फार सुखासमाधानानें घालविलीं; आणि १९०६ सालीं या उदार बुद्धीच्या वृद्ध स्त्रीचा अंत झाला. ● ● ●

## हिनें गरिबांना अन् श्रीमंतांना एकत्र आणलें !

# जेन अदाम्स् : ५ :

जेन अदाम्स या अमेरिकन स्त्रीचें चरित्र एखाद्या साधु पुरुषाला शोभण्यासारखेंच झालें. हें साधुत्व समकालीन लोकांनीं तिला अर्पण केलें नाहीं. परंतु, भूतदया आणि शांति यांचें राज्य पृथ्वीवर जों जों जास्त होत जाईल, तों तों या राज्याचे मागचे मागचे संस्थापक कोण, याचा शोध लोक करूं लागतील; आणि मग जेन अदाम्स या स्त्रीच्या चरित्राला त्याचा खरा महिमा प्राप्त होईल. पुष्कळ तत्त्ववेत्ते, कर्ते आणि विचारी लोक योग्य काळाच्या आधीं जन्माला आलेले असतात. त्यांचीं ज्ञानें, कृत्यें किंवा विचार हीं समकालीन लोकांना नीटशीं आकलतां येत नाहीत. शें–दीडशें वर्षें गेलीं, म्हणजे त्यांचें मर्म लोकांना समजूं लागतें; आणि या लोकांचे नातू पणतू त्यांचा गौरव करूं लागतात. जेन अदाम्स या बाईचें जरी तंतोतंत असें झालें नसलें, तरी सामान्यपणें पाहतां, त्या थोड्या आणखी उशिरा जन्मास आल्या असत्या तर बरें झालें असतें, असें वाटतें !

अमेरिकेच्या इलिनॉय परगाण्यांत सेदरव्हिली येथें एक बडा गिरणीवाला होता. हा क्वेकर पंथीय असून कांहींशा इतमामानें वागणारा असे. आपल्या धंद्यांत सचोटीनें वागावें; आणि शेजाऱ्यापाजाऱ्यांवर पूर्ण विश्वास ठेवून मनाला कसलाहि कहार करून घेऊं नये, असें त्याचें धोरण असें. त्यानें आपल्या घराला कुठें कुलूप सुद्धां लावलें नाहीं; इतका त्याचा गांवांतल्या लोकांवर विश्वास असे. याची बायको आधींच मरून गेली होती; आणि दोन वर्षांची छोटी जेन सारखी त्याच्या मागें मागें करीत असे. आई आणि बाप हीं दोन्हीं नातीं जेनच्या दृष्टीनें त्याच्या ठिकाणीं एकवटलेलीं होतीं; आणि म्हणून प्रत्येक गोष्टींत बाबांच्या तोंडाकडे पहावें, आणि ते करतील तसें करावें, असा जेनचा स्वभावच बनला होता.

हा गिरणीवाला मोठा सचा माणूस असून वचनाचा धड असे. अर्थातच एकाद्या वेळीं जेन खोटें बोलून गेली, तर तिला चैन पडेनासें होई; आणि मग हलकेंच बाबांच्या उशाशीं जाऊन ती त्यांच्या कानांत सांगे कीं, " मी मघाशीं

खोटें सांगितलें. मला तुम्ही क्षमा करा. " पोरीच्या मनाची ही थोरवी पाहून बापाला स्वाभाविकपणेंच मोठा आनंद होई. जेन ही कांहींशी लहानखुरी होती; आणि बाप तर मोठा उंचापुरा आणि पोसलेला असे. आदितवारीं देवळांत वगैरे जातांना बाबांच्या बरोबर आपण गेलों, तर ' येवढ्या धिप्पाड माणसाची ही कुलुंगी मुलगी ' असें आपल्याला लोक म्हणतात, हें तिच्या लक्षांत आलें होतें. म्हणून चणीनें लहान असलेल्या आपल्या चुलत्याबरोबरच ती बाहेर जात असे.

तथापि, आपला बाप म्हणजे एक कोणीतरी मोठा माणूस आहे, हें तिला लहानपणापासून कळून चुकलें होतें. आब्राहम लिंकन वारला, तेव्हां हा आदामभाई अतिशय कष्टी झाला; आणि पुढें एकदां जेव्हां जोसेफ मॅझिनी वारला, तेव्हांहि तो असाच कष्टी होऊन बसला. आब्राहम लिंकन किंवा मॅझिनी हीं माणसें कोण, हें जेनला इतक्या लहानपणीं माहीत नव्हतें; पण थोड्याशा वर्षांनीं त्यांचा महिमा तिला कळून आला. आपला बाप येवढ्या मोठ्या लोकांचा चाहता आणि अभिमानी होता, हें पाहून तिला फार आनंद वाटूं लागला.

प्लूटार्कनें लिहिलेलीं मोठ्या लोकांचीं चरित्रें बापानें जेनला वाचावयास दिलीं. चरित्र वाचावें, त्याचा सारांश सांगावा, आणि चार आणे बक्षीस घ्यावें, असें धोरण तिनें व बापानें ठेवलेलें होतें ! कांहीं अंशीं बक्षिसाच्या लालचीने, पण मुख्यतः या चरित्रांतील ऐतिहासिक रस फार मधुर वाटल्यामुळें जेननें हीं चरित्रें तर वाचलींच; पण आणखीहि अनेक चरित्रांचें वाचन करतां करतां अमेरिकन स्वातंत्र्याची प्रस्थापना करणाऱ्या थोर पुरुषांच्या चरित्रांपर्यंत ती येऊन ठेपली. तथापि हीं सारीं चरित्रें वाचूनहि तिच्या मनाला राहून राहून असें वाटें कीं, आपले बाबा यांच्याहूनहि थोर आहेत. तिनें बापाचा आचार-विचार अगदीं जवळून पाहिलेला होता. तो विधिमंडळांत निवडून आलेला होता; आणि पैसे खाण्याचें धोरण त्याने ठेवलें असतें, तर वाटेल तेवढा गल्ला त्याला जमा करतां आला असता. परंतु, त्याच्या सचोटीची कदर एवढी मोठी असे, कीं लुबरे कामसाधू लोक त्याच्या नजिक येण्यासहि धजत नसत. अशा बापाच्या संगतींत घरीं वाढत असलेली जेन सतराव्या वर्षी रॉकफोर्ड कॉलेजांत प्रविष्ट झाली.

कॉलेजांत आल्यावर, तिच्या मनाचें क्षितिज अधिक रुंदावूं लागावें हें अगदीं स्वाभाविक होते. आतांपर्यंत बाबाच काय ते तिचें परब्रह्म होतें पण आतां तिला निराळीं ब्रह्में भेटूं लागलीं. मानवी जीवनांत सामरस्याचें महत्त्व फार आहे व

हें ओळखणारा तत्त्ववेत्ता जो इमर्सन, त्याचें नांव आतां जेनला चांगलें माहीत झालें; आणि याहिपेक्षां म्हणजे मानवाची सेवा करण्यांतच जीविताचें सारसर्वस्व आहे, हें ज्या येशूख्रिस्तानें जगाला दोन हजार वर्षांपूर्वीं सांगितलें, त्याच्या चरित्राची आणि उपदेशाचीं पारायणें या उच्च शिक्षणांत तिला करतां येऊं लागलीं. जेनच्या मनाचा पिंड आधींच औदार्याच्या कणांचा बनलेला होता. बापाच्या उदाहरणानें तिचें मन शुद्धतर झालेलें होतें. आतां या दोन थोर पुरुषांच्या चरित्रसमागमांत हा तिचा मनःपिंड अत्यंत सात्त्विक, शुद्ध आणि तेजोमय बनला.

१८८९ मध्यें फिलॅडेल्फिया येथील बायकांच्या वैद्यक महाविद्यालयांत जेन प्रविष्ट झाली. एक वर्ष जातें न जातें, तोंच तिला एक चमत्कारिक दुखणें आलें. तिच्या पाठीचा कणा वाकूं लागला; आणि तिनें अंथरूण धरलें. डॉक्टरांनीं बरेच इलाज करून पाहिले, आणि शेवटीं सल्ला दिला कीं, 'या हवेंतून तुम्ही बाहेर पडा; वर्ष दीड वर्षपर्यंत युरोपची फेरी करून या.' डॉक्टरांच्या सल्ल्याला अनुसरून जेन युरोपला हवा पालटण्यासाठीं निघाली; आणि इंग्लंडांत येऊन दाखल झाली. इंग्लंडच्या राजधानीचें तें वैभव पाहून तिला मोठा आचंबा वाटला. शहरचे देखावे पाहण्यासाठीं एका उघड्या गाडींत बसून ती किती वेळ तरी हिंडत होती.

येतां येतां लंडनच्या पूर्व टोकाला ती आली. मात्र तेथील देखावा पाहून तिच्या मनांत जी उलथापालथ झाली, तिनें जेनच्या जीविताला कायमचें निराळें वळण लावलें. लंडनच्या या बाजूला गरीब लोकांची वस्ती फार, दारिद्र्यानें गांजलेले, भुकेलेले, पोटावर थापट्या मारीत हिंडणारे आणि चिंध्या पांघरलेले हजारों लोक तिला येथें दिसलें. जवळच एका तिट्ठ्यावर भाजीपाल्याचा लिलाव चालू होता. 'भाजीपाल्याचा' याचा अर्थ मात्र निराळा समजला पाहिजे. कोबीचा पाला, कांद्याचा पाला, नवलकोलाचा पाला, कीं जो इतर वस्तींतील लोकांनीं टाकून दिलेला असे, त्याचा लिलाव या ठिकाणीं चाललेला होता. शहराच्या निरनिराळ्या भाजी-बाजारांत भाज्यांचा जो गाळसाळ उरलेला असे, तोहि या लिलावांत दाखल झालेला होता. लिलाववाला 'एकवार, दोनवार' करीत होता; आणि तसला तो गळाठा घेण्यासाठीं सुद्धां त्या दरिद्री लोकांतले 'श्रीमंत दरिद्री' पुढें सरसावून येत होते. 'हे लोक या पाल्याचें करणार तरी काय,

असें जेनला प्रथम वाटलें; पण पोटाचा डबरा भरण्यासाठीं याहि वस्तूंचा गरीब लोक उपयोग करीत असले पाहिजेत, हें तिच्या चटकन् ध्यानांत आलें. मग निद्रित असलेलें तिचें मानवी औदार्य क्षणांत खडबडून जागें झालें. मानव-प्राण्याची ती दुस्थिति तिला बघवेना. आपण चांगलें चांगलें खाणारे आणि लेणारे लोक पातकी आहों, असें तिला वाटूं लागलें. आत्मारोपाचा आवंढा तिनें गिळला. या मुलीच्या मनाची बैठकच साफ बदलली. पुढें कांहीं दिवसपर्यंत ती लंडन शहरींच राहिली; पण शहरांतून फिरतां फिरतां आपण असल्या एखाद्या ठिकाणीं जाऊन पुन्हा पोहचूं कीं काय, असा धसका तिला वाटूं लागला. असला देखावा पुन्हां पाहणें नको, आपल्याला तो सहनच होणार नाहीं, असें तिच्या मनानें पक्कें घेतलें. जर कां कोठें हाल, विपत्ति, दारिद्य, हीं दिसलींच, तर चट्कन् गाडींतून खालीं उतरे आणि दुःखितांचा थोडाबहुत तरी परामर्श घेऊन ती पुढें निघून जाई.

हिंडतां हिंडतां ती स्पेन देशांत आली. माद्रिद् येथें असतांना ' बैलाची टक्कर' पाहण्यासाठीं ती गेली. तो भयानक देखावा पाहून ती अगदीं थिजूनच गेली. पहावयास आलेल्या सर्व लोकांनीं भोंवतींच्या उंच जागांवर बसावें, आणि मधल्या विस्तीर्ण हौद्यांत एका पिसाळलेल्या बैलाची आणि एका चपळ पहिलवानाची चाललेली झुंज पहावी, असा हा टकरीचा प्रकार असे. करमणुकीसाठीं मातबर लोक दुसऱ्या गरजू माणसांना कोणच्या संकटांत नेऊन घालतात, पुन्हां पुन्हां टाळ्या वाजवून त्याच कामांत त्यांना कसें गोवितात, आणि जर कां हे चपळ पहिलवान बैलांच्या हुंदाड्यानें मरण पावले, तर ' आज मोठीच मैफल उडाली ' असें म्हणत घरीं कसें परत येतात, हें पाहून मानवी दुष्टाव्याचें तिला फारच आश्चर्य वाटूं लागलें.

माणसांचीं मनें कशीं सुधारतील, तीं एकमेकांशीं प्रेमानें केव्हां वागूं लागतील, आणि हरतऱ्हेचे भेदभाव विसरून परस्परांच्या साहाय्याला कधीं धावूं लागतील, या चिंतेनें जेनचें मन कष्टी होऊं लागलें. पुष्कळदां असें होतें कीं, दुसऱ्यांच्या हालानें आपलें मन फार कष्टी होत आहे, यांतच माणसें समाधान मानतात; दुसऱ्यांच्या दुःखांचा प्रत्यक्ष परिहार करावा, हें त्यांना भावतच नाहीं. दुसऱ्याचें दुःख पाहून आपल्याला दुःख झालें म्हणजे आपली मानवता फार उंच दर्जाची ठरली, असें त्यांना वाटतें; आणि तीं येथेंच विराम पावतात. पण जे खरे थोर

लोक आहेत, ते येथेंच थांबत नाहीत. दुःखितांच्या दुःखाचा परिहार प्रत्यक्ष कृतीनें केला नाहीं, तर आपली सहानुभूति, भूतदया हीं सारीं कमी कसाचीं ठरतात, हें त्यांनीं ओळखलेलें असतें; आणि म्हणून ते कामाला लागतात. जेन अशा लोकांपैकींच एक होती. लोकांची मानवता उन्नत करावयास हवी, आणि त्यांचा बंधुभाव वाढवावयास हवा, हें झालें तरच जगांत शांति आणि सुख हीं नांदतील असा मनाचा निश्चय करून ही तरुण स्त्री कामाला लागली.

युरोप-अमेरिकेचे इतिहास ज्यांनीं थोडेबहुत तरी वाचले आहेत, त्यांना हें माहीत आहे कीं, अमेरिकेंतील लोकवस्ती युरोप व आफ्रिका येथील निरनिराळ्या लोकांची आवक होऊनच बनलेली आहे. प्रथम प्रथम इंग्लंड व हॉलंड येथील कांहीं लोक तिकडे गेले; मग फ्रान्समधले गेले. असें होतां होतां, ज्यांना स्वदेश नकोसा झाला होता, आणि जे स्वदेशाला नकोसें झालेले होते, असे शेकडों लोक आपपल्या देशांतून ऊठून अमेरिकेंत जाऊन राहूं लागले. जमीन सुपीक आणि वाटेल तेवढी फुकट मिळण्यासारखी, म्हणून ज्यांना कष्ट करण्याची धमक होती, ते सारे तिकडे जाऊं लागले. त्यांतच मजुरीसाठीं आणलेल्या निग्रो लोकांची भर पडली.

अमेरिकेंत जमा झालेले हे युरोपियन लोक एका भूमींत आले खरे; पण तेवढ्यानें ते एक झाले नाहीत. आपण आयरिश आहों, आपण जर्मन आहों, आपण पोलिश आहों, अशी जाणीव प्रत्येक गटाला असे. हे गट मिळून जरी एकादें शहर बनत असलें, तरी त्यांचे निरनिराळे मोहल्ले असत; आणि ते परस्परांशीं थोडेसें बाकूनच वागत. त्यांत पुन्हां कोणी प्रॉटेस्टंट, कोणी कॅथॉलिक, कोणी क्वेकर अशा पंथोपपंथांचे लोक असत. त्यामुळें बारीक बारीक गटांच्यासुद्धां चिरफळ्या झालेल्या होत्या. सुखासमाधानानें जमीन पिकवून खावी, असें न करतां हे लोक एकमेकांशीं हमरी-तुमरीवर येत. यांत आफ्रिकेंतून आलेल्या त्या काळ्या निग्रोंची काय रया रहात असेल, याची कल्पनाच केलेली बरी! असल्या लोकांनीं गजबजलेलीं शहरें आणि गांवें अमेरिकेच्या पूर्वभागांत भराभर वाढत चाललीं होतीं. प्रत्येक गांवांत आणि शहरांत जातींचीं भांडणें अगदीं उतूं जात असत. शिकॅगो शहरीं तर निरनिराळ्या जातींच्या लोकांचा एक शिकारखानाच बनला होता! वास्तविक पाहतां, काळे निग्रो सोडून दिले, तर युरोपांतील निरनिराळ्या देशांतून आलेले हे लोक एकाच ख्रिस्ती धर्माचे,

एकाच वर्णाचे, आणि जवळ जवळ एकाच संस्कृतीचे होते. त्यांच्या भाषा निराळ्या आणि त्यांचे देश निराळें इतकेंच काय तें. अशा लोकांनीं कां भांडावें, आणि हे असेच भांडत राहिले, तर अमेरिकेंत लोकशाही कशी प्रस्थापित होईल, हा विचार जेनच्या मनांत अतिशय प्रबळ झाला. या सर्वांना एकत्र आणलें पाहिजे, त्यांच्यांतील साम्यें त्यांना दाखवून .देऊन त्यांचा बंधुभाव जागृत केला पाहिजे, करावा. यासाठीं जेननें एकदम कामाला आरंभ केला. या कामाचा विस्तार होतां होतां अमेरिकेंतील लोकशाही सध्यांचें रूप पावली.

युरोपांतून आलेल्या किंवा आफ्रिकेंतून आणलेल्या हलक्या प्रतीच्या लोकांचा उद्धार वरिष्ठ लोकांनीं करावा, ही जेनच्या मनाची भूमिकाच नव्हती. तिला असें वाटे कीं, या प्रत्येक जातीच्या लोकांत कांहींना कांहीं तरी चांगले गुण असलेच पाहिजेत. कोणीहि लोक असे नसतात कीं, ज्यांच्यामध्यें कल्पना, भावना, उपजतबुद्धि, प्रवृत्ति यांचा यत्किंचितहि पोष झालेला नाहीं. जें करावयास हवें तें हें कीं, या पोसलेल्या गुणांची ओळख निरनिराळ्या जातींच्या लोकांना त्या त्या जातींतील जाणत्या लोकांनीं करून द्यावयास हवी; परंतु अमेरिकेंत त्या वेळीं घडत नव्हतें तें हें कीं या भिन्न भिन्न जातीच्या लोकांना परस्परांच्या मनोगुणांची माहिती व्हावी, आणि त्यामुळें त्यांनीं एकमेकांशीं तुसडपणानें वागू नये. जेननें असें ठरवलें कीं, यांची एकमेकांशीं चांगली ओळख करून द्यावी. तिचें हें अवलोकन अगदीं बरोबर होतें. आफ्रिकेंतून आलेले अगदींच अडाणी निग्रो लोक सोडले, तरी केवळ योग्य त्या परिचयाच्या अभावीं इटॅलियन, ज्यू, जर्मन, फ्रेंच अशांसारखे लोकसुद्धां एकमेकांशीं सामरस्यानें वागत नसत. त्यांच्या मनाचा एक रांधाच होईना. हा करण्याची जर व्यवस्था झाली, तर अमेरिकन लोकांतील फुटीरपणा नाहींसा होईल, त्या सर्वांची मिळून एक सलग लोकशाही निर्माण होईल, हें जेनचें सामाजिक तत्त्वज्ञान अगदीं बरोबर होतें.

या तत्त्वज्ञानाला मूर्त रूप आणण्यासाठीं, तिनें 'हल हाऊस' या नावाचें एक मंदिर उभें केलें. हें मंदिर मोठें सुंदर असून त्याला अनेक दालनें होतीं; आणि तीं जरी श्रीमंती थाटानें श्रृंगारलेलीं नसलीं, तरी त्यांत सर्व प्रकारच्या सुखसोयी तिनें केलेल्या होत्या. नुसत्याच सुखसोयी असत्या, तर ती स्टेशनची एक वेटिंग रूम झाली असती. पण तिनें तेथें चांगलीं चांगलीं पुस्तकें ठेवलीं, निरनिराळ्या देखाव्यांचीं चित्रें भिंतीला लावलीं, नकाशे टांगले, टेबलांवर करमणुकीचीं

साधनें ठेवलीं. एतावता, येथें जाऊन बसावें असें कोणालाहि वाटावें, इतपत आकर्षकता या मंदिराला तिनें प्राप्त करून दिली. तेथें जावें असें गरिबांनाहि वाटावें, श्रीमंतांनाहि वाटावें, स्त्रियांना वाटावें, पुरुषांनाहि वाटावें, आपापल्या ओळखीच्या वस्तू आणि संस्कृतीच्या खुणा पाहून सर्व जातींच्या लोकांना तेथें जावेसें वाटावें, अशी योजना या कल्पक स्त्रीनें केली; आणि मग वृत्तपत्रांतून घोषणा केली कीं, " या मंदिरांत सर्व लोकांनीं यावें; येथें कसलाहि भेदभाव नाहीं; येथें सर्वांनाच आपापल्या संस्कृतीची ओळख पटेल; येथें सर्वांनीं यावें, खावें, प्यावें, गोष्टी बोलाव्या, एकमेकांना आपलीं सुखदुःखें सांगावीं, आणि स्नेहसंबंध जुळवावे. "

पहिल्या-पहिल्यानें लोक थोडेसे बिचकलेच. त्यांना वाटलें कीं, यांत बाईचा कांहींतरी डाव असावा. गरिबांना वाटलें कीं, तेथें श्रीमंत येणार, तर आपण कसे जावें; आणि श्रीमंतांना वाटलें कीं तेथें जमलेल्या भिकाऱ्यांत आपण जाऊन कसें बसायचें ? पण ' काय आहे तें बघूं तर खरें ' असें म्हणणारे कांहीं लोक निघालेच. जेननें त्यांचें चांगलें स्वागत केलें. खाद्यपेयांच्या, संभाषणांच्या, विश्रान्तीच्या तऱ्हा तिनें अशा ठेवल्या, कीं वादाला कोठें जागाच उत्पन्न होऊं नये; उलट परस्परांत असलेल्या चांगल्या गुणांचा व भावनांचा वापर होऊन त्यांना एकमेकांची संगति सुखाची वाटावी.

थोडेसे दिवस गेले; आणि या मंदिरांत येऊन गेलेले लोक भोंवतालच्या लोकांना मंदिराचें स्वारस्य मनोभावें सांगूं लागलें. अर्थताच मंदिरांत येणाऱ्या लोकांची संख्या भराभर वाढूं लागली. पण हें मंदिर म्हणजे केवळ करमणुकीचें ठिकाण होऊं देतां कामा नये, असा जेनचा कटाक्ष होता. ती कॉलेजांत होती; तेव्हांपासूनच मनुष्यमात्राची सेवा हा तिच्या मनाचा धर्मच बनलेला होता; आणि युरोपांतील भ्रमन्तीनें तो दृढ झालेला होता. या सेवेचा उपक्रम या मंदिरांत बाईनें सुरू केला.

एकदां एक ग्रीक बाई घाबऱ्या घाबऱ्या मंदिरांत आली; आणि म्हणाली, ' रस्त्यांत माझें मूल चेंगरलें आहे, नवरा कामाला मेला आहे, आणि औषधाला माझ्यापाशीं कपर्दिकहि नाहीं. मी आतां काय करूं ? ' जेननें तत्काळ एका डॉक्टरला बोलावून आणलें. ताबडतोब औषधोपचार होऊन, त्या बाईचें

मूल वांचलें. एकदां एक पंधरा सोळा वर्षांची इटॅलियन नवरी मुलगी या मंदिरांत धांवत आली आणि म्हणाली, नवऱ्यानें दिलेली लग्नाची आंगठी माझ्या हातून गमावली; आणि म्हणून नवरा मला सारख्या शिव्या देत आहे.' जेननें त्या नवऱ्याला बोलावून आणलें. दोघांना बसवून घेऊन सौम्यपणानें त्यांना तिनें चार समजुतीच्या गोष्टी सांगितल्या. अंगठीला लागणारें द्रव्य त्यांना दिलें, आणि ती त्या नवऱ्याला म्हणाली, 'आतां तरी तू हिला शिव्या देऊं नकोस.' नवरा–नवरी खूष होऊन जेनला दुवा देत मंदिरांतून बाहेर पडलीं! हळू हळू भोंवतालच्या साऱ्या टापूंतील भांडणांचीं प्रकरणें तिच्याकडेच येऊं लागलीं; आणि मानवी मनाचे व्यापार नीट ओळखणाऱ्या या स्त्रीनें एका समजूतदार न्यायाधीशाची भूमिकाच आपल्याकडे घेतली. लोक म्हणत 'ही बाई श्रीमंत दिसते; पण गरिबांसारखीच अगदीं सरळ स्वभावाची आहे!'

लवकरच तिनें एक बालसंगोपन–गृह काढलें. आसपासच्या टापूंतील बाया कामाला जात; तेव्हां त्यांच्या मुलांची फार आबाळ होत असे. या गृहांत आयांनीं आपलीं मुलें आणून सोडावीं, आणि कामावरून परत आल्यानंतर घरीं घेऊन जावीं, अशी व्यवस्था तिनें केली. मुलांची बडदास्त तिनें इतकी उत्तम ठेवली, कीं त्यांना परत घरीं नेतांना, त्यांचीं सुहास्य वदनें पाहून आयांच्या मनाला आनंद वाटे. जेन म्हणे कीं, 'मी तुमची एक शेजारीण आहे; आणि म्हणून मी तुमच्या उपयोगी पडतें. याहून जास्त कांहीं नाहीं.' शेवटीं तिला 'भली शेजारीण' हेंच नांव मिळालें; आणि 'शेजारधर्म म्हणजे सेवाधर्म' असा अर्थ लोकांच्या मनांत रूढ झाला.

चमत्कार असा कीं, शेजारधर्म, सेवाधर्म, परिचय–मंदिर या कल्पना शिकॅगो शहरांतून बाहेर पडून देशांतील इतर शहरांत भराभर पसरल्या. 'मित्रभावाचीं घरें' ठिकठिकाणीं स्थापन होऊं लागलीं. आतांपर्यंत एकमेकांपासून दूर रहात आलेले इटॅलियन, आयरिश, जर्मन हे सारे या मित्रमंदिरांत एकत्र जमा होऊं लागले; परस्परांना साहाय्य करूं लागले. अशा रीतीनें जेन अदाम्स हिच्या हस्तें एका नव्या सामाजिक तत्त्वज्ञानाचा उदयच झाला.

वंशीय सामरस्याचें हें मंदिर उभारण्याचें काम पुरें झाल्यावर, जेननें लहान मुलांना सुखी कसें करतां येईल, याकडे आपलें लक्ष वळवलें. त्या काळांत लहान मुलांना कामाला लावण्याची पद्धति अमेरिकेंत होती. एकीकडे आमचें राष्ट्र

सुधारलेलें आहे, अशी फुशारकी मारायची, आणि दुसरीकडे सात सात वर्षांच्या कोंवळ्या पोरांना कारखान्यांत, वखारींत, कामाखालीं बेजार करावयाचें, अशी अमेरिकन नीति होती. कांहीं कांहीं ठिकाणीं सात वर्षांच्या मुलांना चवदा तास राबवून घेत असत. लेखकांनीं या वर्णनाच्या कामीं अतिशयोक्ति केली आहे असें धरून चाललें, तरी कष्टकरी मुलांना फार उपद्रव होत असे, हा सत्याचा सांका शिल्लकच रहातो. यंत्रादिकाचे धक्के लागून कित्येक मुलें जन्माचीं अधू होत. जेन हिनें मातृपदाचा स्वीकार केव्हां केलाच नाहीं. पण या मुलांचे हाल पाहून स्त्रीजातीला सहज अशी जी वात्सल्यबुद्धि ती तिच्या ठिकाणीं उत्कटत्वानें प्रकट झाली; आणि नेहमींच्या मनोधर्मांप्रमाणें ती एकदम कामाला लागली.

'लहान मुलांचे कष्ट' या विषयाचें तिनें संशोधनच सुरू केलें· होतां होतां, तिच्यापाशीं इतकी आंखबंद माहिती जमा झाली, कीं या बाबतींतील तिचीं अनुमानें अचूक होऊं लागलीं; आणि तिनें केलेलीं विधानें प्रमाणभूत बनूं लागलीं. इलिनॉय परगाण्यांतील स्त्रियांच्या आणि कामकऱ्यांच्या संघटनांशीं तिनें आपला संबंध जोडला; आणि त्यांच्या सहकार्यानें मोठी चळवळ करून १९०३ सालीं लहान मुलांना न राबवण्याच्या कामीं सरकारांतून एक कायदा करून घेतला. या कायद्यानें तिनें काय साधलें, तें लक्षांत घेतलें, म्हणजे मूळचा सामाजिक रोग किती दुर्धर होता याची कल्पना येते. कायदा एवढाच झाला कीं, 'सोळा वर्षांपेक्षां लहान वयाच्या मुलांना सकाळीं साताच्या पूर्वी आणि संध्याकाळीं साताच्या नंतर काम सांगूं नयें.' यावरून इतकेंच दिसून येतें कीं, सोळा वर्षांच्या खालच्या मुलांना हे लोक दिवसभर राबवीत असत! जेननें हा मोठाच विजय मिळवला. कारण या प्रश्नाकडे देशांतील विचारवंतांचें मन तिनें ओढून घेतलें; आणि अनेक परगण्यांत या कायद्याचें अनुकरण होऊं लागलें.

जेन येवढ्यावरच थांबली नाहीं. तिला वाटें कीं, देशांतील पोरें वांया जात आहेत. शेकडों पोरें रस्त्याच्या गटारांत खेळत असत. यांना जास्त स्वच्छ आणि प्रसन्न वातावरणांत नेलें आणि खेळूं दिलें, तर हींच पुढें फार चांगलीं माणसें होतील, असा कयास तिनें बांधला; आणि 'गांवांतील लहान मुलांचीं क्रीडांगणें' हा नवा उपक्रम तिनें सुरू केला. शिकॅगो शहरांत लवकरच कितीतरी क्रीडांगणें निघालीं; आणि तेथें सर्व दर्जांचीं मुलें आनंदानें खेळूं लागलीं. होतां होतां ही क्रीडांगणांची चळवळ सर्व अमेरिकेभर पसरली. ती म्हणे कीं, 'मुलें

कोणाचींहि असूं द्या. त्यांच्या ठिकाणीं देवानें चांगल्या भावनांचें आणि सामर्थ्याचें बीज खोचलेलेंच असतें. हीं बीजें वाढवणें, हाच खरा खरा थोर धर्म होय.' निर-निराळ्या जातीचीं हजारों मुलें तिच्या त्या मंदिरांच्या प्राकारांत जमूं लागलीं; आणि नवल हें कीं, तिनें लावलेल्या या नव्या वळणामुळें गटारांतून बाहेर आलेलीं शेकडोंच्या शेकडों मुलें समाजांत मानाचे धंदे करूं लागलीं. त्यांचें तें वैभव पाहून जेन वात्सल्यानें गहिंवरून जाई. येथपर्यंत जेनला मोठेंच यश मिळत गेलें.

तिला वाटे कीं, सर्वांनीं सुखासमाधानानें वागावें; एकमेकांचीं मनोगतें समजावून घेऊन, त्यांनीं परस्परांशीं जमवून घ्यावें; आणि एकमेकांच्या अडीअड-चणींचा परिहार करावा. हें व्हावयाचें, तर देशांत शांति नांदली पाहिजे; आणि ती नांदावयाची, तर जसें माणसां-माणसांनीं एकमेकांत, तसें राष्ट्रां-राष्ट्रांनीं परस्परांत समंजसपणानें आणि सलोख्यानें वागावें. युद्ध म्हटलें, कीं तिच्या अंगावर कांटा उभा राही. पण दुर्दैव असें कीं, १९१४ सालीं पहिलें महायुद्ध सुरू झालें. जगांतील वारे कसे वहात आहेत हें तिनें पाहिलेंच होतें. म्हणून ती सर्व राष्ट्रांना व विशेषतः अमेरिकेला असें सांगूं लागली कीं, 'तुम्ही वर्दळीवर येऊं नका; मतभेद तडजोडीनें मिटवा. हातांत शस्त्रें घेऊं नका; आणि बायका-मुलांच्या जीविताचा उन्हाळा करूं नका." युद्धाच्या गर्जनांनीं भांबावलेले लोक म्हणूं लागले कीं, 'ही बाई जर्मनीच्या बाजूची आहे; जर्मनांनीं पुंडाई करावी, आणि आम्हीं मात्र गप्प बसावें, असें हिला वाटतें.' तिनें प्रत्युत्तर केलें कीं, 'जर्मनांनींही पुंडाई करूं नये, व तुम्हींहि शस्त्रें धारण करू नये.' तथापि युद्धाचा डंका येवढ्या जोरानें वाजूं लागला, कीं तिच्या शांतिपाठाच्या मंजुळ गाण्याचे स्वर कोणाला ऐकूंहि जाईनात. पण तिनें आपला हट्ट सोडला नाहीं. शांतीचें निशाण हातीं धरून ती एकटी बाजूला उभी राहिली; आणि म्हणाली, 'माझी ही घोषणा तुम्हांला इतक्यांत पटावयाची नाहीं.' भ्रान्त बनलेल्या लोकांनीं तिला हिडिस-फिडीस केलें, देशद्रोही म्हटलें, आणि जणूं कांहीं तिला वाळींत टाकलें; पण ही साध्वी स्त्री आपल्या तत्त्वाला जागली; आणि विश्वशांतीची घोषणा करीत एकाकी उभी राहिली.

युद्ध संपलें; आणि शेकडों प्रपंच कसे उजाड झाले आहेत, हें लोकांना प्रत्यक्ष दिसूं लागलें. स्त्रियांच्या जीविताची तर दाणादाण झाली होती. या गोष्टीचा फायदा घेऊन तिनें 'अमेरिकन स्त्रियांचा शांतिपक्ष' जोरानें पुढें आणला. हा पक्ष पूर्वी होताच.

पण आतां त्याला नवें बळ तिनें आणलें. लवकरच इतर देशांतहि अशा तऱ्हेच्या संघटना उभ्या राहिल्या; आणि त्या सर्वांचें मिळून एक जाळें बनलें. जेनचा महिमा एवढा मोठा, कीं या सार्वदेशीय संघटनेचें अध्यक्षपद जेनला देण्यांत आलें. अशा रीतीनें जेन एक जगप्रसिद्ध स्त्री बनली.

तिनें याच वेळीं लोकांना बजावलें कीं, 'लवकरच हुकुमशाह्या प्रस्थापित होतील; आणि शिरजोर हुकूमशहा तमाम लोकांच्या अन्नांत माती कालवतील.' तिचा शांतिघोष जगभर एवढा गाजला, कीं १९३१ सालीं निकोलस मूरे बटलर याला व जेनला मिळून शांतीचें नोबेल प्राइज मिळालें. या बक्षिसाचे मिळालेले सुमारे पाऊण लक्ष रुपये तिनें स्त्रियांच्या आंतरराष्ट्रीय संघाला देऊन टाकलें; आणि देतांना सांगितलें कीं, 'देशोदेशींच्या अर्भकांना तुम्ही जवळ घ्या; आणि परस्परांचीं मनोगतें समजावून घेऊन विश्वांत शांति प्रस्थापित करा.'

१९३५ सालीं जेनच्या कुशींत एकाएकीं चमका निघूं लागल्या. शस्त्रक्रिया केली पाहिजे, असें डॉक्टर म्हणूं लागले. शस्त्रक्रिया झाली, तों आंतून एक मोठें थोरलें गळूं निघालें. हें कॅन्सरचेंच दुखणें असलें पाहिजे. चारच दिवसांनीं या जगद्विख्यात स्त्रीचा अन्त झाला. पन्नास हजार लोक तिच्या प्रेतयात्रेला गेले; आणि या शान्तिदेवीचें नांव घेऊन ते सारे ओक्साबोक्शीं रडले !

• • •

हिनेंच आपल्या हालांनीं क्रान्तीचें बीज रुजविलें!

## कॅथरीन् ब्रेशकोव्‌स्की. : ६ :

कॅथरीन् ब्रेशकोव्‌स्की या रशियन् क्रान्तीच्या जननीचें मूळचें नांव एक ओळभर लांब भरेल! "एकाटेरिना कॉन्स्टॅन्टिनोव्हा ब्रेशकोव्‌स्काया" एवढें लांबलचक नांव तिचें होतें. या स्त्रीच्या पोटीं रशियन् राज्यक्रांति जन्माला आली, असें म्हणणें अतिशयोक्तीचें होईल; कारण तिला एकदां कां हा गौरव अर्पण केला, म्हणजे लेनिन् इत्यादि जबरदस्त कर्तबगार लोकांना कोणचें श्रेय शिल्लक उरतें असा प्रश्न क्रान्तीच्या अभिमान्यांना पडेल. तथापि ब्रेशकोव्‌स्की ही स्त्री असूनहि तिनें क्रान्तिकल्पना रुजत घालण्यासाठीं, आणि त्या व्यवहारांत आणण्यासाठीं सोसलेल्या वेदना लक्षांत घेतल्या, म्हणजे तिच्या चाहत्यांनीं क्रान्तीचें मातृपद तिला अर्पण करावें, हें पुरुषांच्या स्त्री-दाक्षिण्याला शोभेसेंच आहे. तसेंच हिला परित्यक्तपण प्राप्त झालें, हा दावा सर्वच क्रान्तिकारक मान्य करतील, अशी शाश्वति देववत नाहीं. तथापि अलंकारांच्या पोटीं सर्व कांहीं खपून जातें हा न्याय आपण मानला पाहिजे; आणि या स्त्रीला 'क्रान्तीची परित्यक्त जननी' हें नांव खुषीनें दिलें पाहिजे. आपण पुष्कळदां म्हणतों कीं, प्रतिकार–बुद्धींतून क्रान्तीचीं बीजें अंकुरित होतात; आणि ज्यांचे हाल चाललेले असतात, त्यांतूनच वीर पुरुष जन्माला येतात. पण हें नेहमींच खरें नसतें. धर्मकारणांत ज्याप्रमाणें उपाध्यायवर्गांतूनच कित्येक सुधारक निपजले आहेत, त्याप्रमाणेंच समाजकारणांतही सरंजामशाही भोगणाऱ्या वर्गांतून गरिबांचा कैवार घेणारे आणि स्वकीयांवर चढाई करून जाणारे क्रान्तिवीर निघाले आहेत. कॅथरीन ब्रेशकोव्‌स्की हिचे वाडवडील आणि आजोळचें घराणेंही सरदार-दरकदार अशा वर्गांतीलच होतें. दोन्ही घरीं सर्व तऱ्हेची सुबत्ता होती. पण इतर सरदार घराण्यांहून या लोकांच्या मनाची ठेवण कांहींशीं निराळी बनली होती. तेव्हांचीं रशियन सरदार घराणीं उतून मातून गेलेलीं असत. सुखलालसेपलिकडे दुसरा मनोधर्म त्यांना उरलेला. नव्हता; आणि आपण हे भोग कशाच्या बळावर भोगतो, याची वर्दीही त्यांना नसे. पैसा मातीमोल होता, तो उधळत रहावें, एव-

ढेंच त्यांना माहीत असे. कोणी देवाच्या नांवानें त्यांना हिणवलें, तर ते म्हणत कीं, 'आम्हीं फक्त "पोटोबा" जाणतों, विठोबा जाणत नाहीं.' कांहीं कांहीं जमीनदार तर असे लफंगे बनले होते, कीं एकाच सुगीच्या सर्व धान्याचा सौदा ते अनेक व्यापाऱ्यांशीं करीत. प्रत्येक व्यापाऱ्याकडून आनामत रकमा घेत, आणि शेवटीं धान्य कोणालाच विकत नसत. जर कोणी व्यापाऱ्यांनीं तक्रार केली, तर ते त्याला पळवून नेत, आणि चाबकाखालीं बेदम मारून काढीत. ऐदीपणामुळें यांचीं पोरेंहि सुस्त बनत आणि अर्धवट निवटत. पण असल्या अर्धववटांच्या सुखसोयीसाठीं हे लोक लाखों रुपये खर्च करीत. धडधाकट आणि बुद्धिमान पोरांच्या आईबापांना स्वाभाविकच वाटे कीं, असलीं मद्दड पोरें सुखांत रहात आहेत, आणि आपलीं चलाख मुलें अर्धपोटीं काळ कंठीत आहेत. हीच तक्रार जर कां त्यांनीं उघडपणें केली, तर वरील व्यापाऱ्यांप्रमाणें त्यांच्याही पाठीं नरम होत असत. सुदैवानें कॅथरीन् ब्रेशकोवूस्की हिच्या आईबापांची सदसद्विवेकबुद्धि अजून जागृत राहिलेली होती. श्रीमंतीनें आणि सुखानें हे लोक कोडगे आणि बेपर्वा बनलेले नव्हते. गरिबांना आपल्यासारखाच जीव असतो, आणि त्यांनाही मनें आणि बुद्धि हीं परमेश्वरानें दिलेलीं असतात, हें त्यांनीं ओळखलें होतें. इतकेंच नव्हें, तर त्याप्रमाणें त्यांची वर्तणूकही होत असे. कॅथरीनच्या अंगीं आईबापांचे हे गुण लहानपणापासूनच दिसूं लागले. देशांतील निराश्रित आणि गरीब लोकांनीं लष्करांत भरती व्हावें, नवीं नवीं युद्धें निघावींत, त्यांचें जीव जावें, आणि सरदारांनीं व सरंजामदारांनीं मागें राहून देशाभिमानाच्या गोष्टी कराव्या, हा सनातन प्रघात होता. जे कोणी अशा रीतीनें मरत, ते आपल्या जिवाला मुकत, त्यांचीं बायकापोरें उघडीं पडत, आणि तिकडें सरदार-सरंजामदार देशाभिमानाचा डंका आपल्या वाड्याच्या मनोऱ्यावर वाजवीत बसत. कॅथरीनचे आईबाप याच वर्गांतले असले, तरी आतांच सांगितल्याप्रमाणें त्यांची विचारशक्ति जागी झालेली होती आणि आपल्या लोकांच्या हातून कांहींतरी विपरीत घडत आहे, आपण पातकी आहोंत, या जाणिवेनें त्यांचें मन त्यांना सारखें खात असे. आपल्या आईबापांचें हें मानसिक दुःख कॅथरीनच्या ध्यानांत फार लहान वयांतच आलें होतें, आणि तिचा अंकुरही तोच असल्यामुळें तिच्या कोंवळ्या मनाला या दुःखाचा चटका जास्तच तीव्रतेनें बसत असे. आपल्या आसपासचे मग्रूर श्रीमंत लोक नोकरचाकरांना आणि शेतावरच्या गुलामांना फटाफट फटके मारूं लागले, म्हणजे कॅथरीन् हिचें मन अगदीं कळवळून

जाई. आपले आईबाप मात्र आपल्या लोकांना ममतेनें वागवतात, हें पाहून तिला फार आनंद वाटे. लोकांना मारावयास चटावलेले ते मग्रूर सरदार कॅथरीनच्या बापाला म्हणत, 'तुमचें घर म्हणजे प्रजासत्ताक राज्य आहे.' या त्यांच्या थट्टेचा अर्थ एवढाच होता कीं, हा भला गृहस्थ आपल्या लोकांना चांगल्या तऱ्हेनें वागवत असे.

कॅथरीन् हिनें आपल्या श्रीमंतीचा डौल लहानपणापासूनच टाकून दिला. गरिबांच्या मुलांतच जाऊन खेळावें, त्यांच्याशीं गोष्टी बोलत बसावें, असा तिचा शिरस्ता असे. एकादे वेळीं आपल्या सोबत्याच्या अंगांत जर कुडतें नसलें, तर आपल्या अंगांतलें काढून त्याला द्यावें, असा प्रकार ती कितीदां तरी करी. आईनें म्हणावें, "तूं आपले कोट सारखे देऊं लागलीस, तर कसें बरें चालेल?" यावर कॅथरीन् तिला उत्तर करी, "आई, बायबलांत सांगितलें आहे ना कीं, तुमच्यापाशीं जर दोन कोट असले, तर त्यांतला एक उघड्यानें हिंडणाऱ्या माणसाला देऊन टाका!" यावरून दिसून येईल कीं, कॅथरीनच्या मनाची ओढ जे कोणी रंजले-गांजले असतील, त्यांच्या बाजूला असे.

कॅथरीनला वाटे कीं, साऱ्या गरीब लोकांना आपल्यासारखेंच सुखी करावें, त्यांना चांगलें खायला मिळावें, त्यांना अंगभर चांगलें वस्त्र असावें, आणि त्यांना त्यांचें स्वतःचें घर असावें. पण हें सारें कसें होणार होतें? कॅथरीननें ऐकलें होतें.कीं, अमेरिकेंतील कॅलिफोर्निया देशांत सोन्याच्या खाणी आहेत, एल्-डो-रॅडो इकडेही नदीच्या वाळवंटांत सोन्याचे गोळेच्या गोळे सांपडतात; असें जर आहे, तर आपण अमेरिकेंत जावें, खाणींतून खूप सोनें खणून काढावें, आणि तें घरीं आणून गरिबांना अन्न, वस्त्र, आणि निवारा प्राप्त करून द्यावा, असें तिला वाटूं लागलें. कॅलिफोर्निया किंवा एल्-डो-रॅडो इकडे सोनें केवळ फुकट सांपडतें, फक्त तें खणून काढावें लागतें, किंवा गोळा करावें लागतें, असा तिचा समज होता. तिची ही कल्पन बालपणची अर्थातच फोल ठरली आणि लवकरच तिला कळून चुकलें, कीं अशा रीतीनें सोनें गोळा करून आणणें आणि त्याच्या बळावर गरिबांचे हाल नाहींसें करणें, गुलामांना मुक्त करणें, हें सर्वथा अशक्य आहे. परंतु लहानपणचीं तिचीं बरींच वर्षें या मनोराज्यांतच गेलीं.

सरदार, सरंजामदार,बडे उत्पन्नदार, राजे-रजवाडे, आणि झारच्या दरबारांतील मानकरी यांच्या लेकी-सुना नटण्या-मुरडण्यांत आणि घरीं आलेल्या श्रीमंत पाहु-

ण्यांची बडदास्त ठेवण्यांत नेहमीं गुंतलेल्या असत. आज अमक्याच्या वाड्यावर, नाच आहे, उद्यां तमक्याच्या बागेंत मेजवानी आहे, परवां झारच्या दरबारीं कलावन्तांचा सन्मान आहे, अशीं बोलावणीं त्यांना येत असत. अर्थात् परस्परांच्या गांठीभेटी, पानसुपाऱ्या, नाचरंग, आणि गुजगोष्टी, यांत त्या पोरींचा सारा वेळ नाहींसा होई. परन्तु कॅथरीन् ही अशा प्रकारांपासून पहिल्यापासूनच अलिप्त राहात असे. तिला हे श्रीमंतीचे ढंग आणि चोचले कधीं रुचलेच नाहीत. सुदैवानें तिला फ्रेंच आणि जर्मन या भाषा अवगत झालेल्या होत्या; आणि त्यांतील श्रेष्ठ दर्जाचें वाङ्मय तिच्या परिचयाचें झालें होतें. व्हाल्टेअर, रूसो आणि डिडिरो या क्रांतिकारकांचीं वाङ्मयें तिला फारच आवडत; आणि फ्रेंच राज्यक्रांतीवरचे ग्रंथ तर तिनें मुखोद्गत केलेले होते. १८४८ मध्यें जर्मनींत झालेली क्रान्ति तिनें चांगली अभ्यासिली होती. तिचें मन रशियांतून बाहेर पडून युरोपच्या क्रान्तिमय जीवनांत अव्याहत संचरूं लागलें. रशियांत क्रान्ति झाली नव्हती; परंतु क्रांति व्हावी अशी परिस्थिति मात्र होती. बाहेरच्या युरोपांतील लोकांनीं आपल्या दास्याचे पाश तटातट तोडलेले पाहून तिला मोठा विस्मय वाटे. हेंच धैर्य आपल्या देशांतील लोक केव्हां दाखवितील, अशी चुटपूट तिला लागून राहिली.

क्रांति शब्दानें, अचानक झालेली उलाढाल किंवा एकाएकीं झालेली घडामोड सूचित होते. परंतु ही कल्पना असावी तितकी बरोबर नाही. क्रांतीच्या कल्पनांचा उद्भव, त्यांची परिणति आणि त्यांचा स्फोट कांहीं वेळ खातात. या साऱ्या गोष्टी विजेच्या धक्क्याप्रमाणें अचानक घडून येत नाहीत. कॅथरीननें ओळखलें कीं, बाहेरील देशांतील लोक दास्यमुक्त झाले आहेत, तसे आपल्याही देशांतील होतील; परंतु त्यांच्या विमोचनाची तयारी कोणीतरी केलीच पाहिजे. या लोकांच्या मनांत स्वातंत्र्याच्या कल्पना रुजत घातल्या पाहिजेत. त्या तेथें वाढल्या, म्हणजे केव्हां ना केव्हांतरी सफल होतीलच. सुटकेच्या कल्पना रुजत घालावयाच्या, तर लोकांच्या मनावरचें अज्ञानाचें किटण खरडून काढावयास हवें, आणि या कामाला शाळा हें फार उत्तम साधन आहे.

म्हणून कॅथरीन् ब्रेशकोवस्की हिनें शेतांत राबणारांसाठीं एक शाळा सुरू केली. हे शेतकरी अतिशय अडाणी होते. ते लाचार बनलेले असत. आपला जमिनीचा लहानसा टवका, त्या जमिनीवरचा गोंठा, गांवठणांतील एकादें कच्च्या विटांचें खोपट, आणि फार झालें तर एखादी बैलजोडी याच्या पलिकडे त्यांच्या मनाचा

व्याप जातच नसे. नांगरणें, पाऊस पडणें, पेरा करणें, तण काढणें, पाणी देणें, कापणी करणें, मळणें, सावकाराला धान्य घालणें, सरकारी कर भरणें, आणि स्वतः वर्षभर जीविताचें कातडें कसेंतरी कुरतडत बसणें, एवढेंच शेतकऱ्यांचें जीवन असे. कॅथरीनच्या मनानें घेतलें कीं, रशियन शेतकऱ्यांना यांतून बाहेर काढलेंच पाहिजे. युद्ध सुरू झालें, म्हणजे झारबाबासाठीं मेलें पाहिजे; आणि युद्ध नसलें, म्हणजे झारबाबाच्या खजिन्यांत कर भरीत राहिलें पाहिजे, ही या शेतकऱ्यांच्या डोक्यावरील टांगलेली तलवार तोडून टाकली पाहिजे, असा तिच्या मनाचा निश्चय झाला.

शेतावरची गुलामगिरी रशियाच्या झारनें रद्द केली होती हें खरें. शेतावर राबणारे लोक बंधमुक्त झाले, असें वर्तमान सर्व युरोपभर पसरलें; पण आपण बंधमुक्त झालों म्हणजे काय, याचें मर्म त्या जमीन कसणारांनाच फक्त कळून आलें! झारच्या फर्मानाचा परिणाम एवढाच झाला कीं, शेतावर राबत असतांना या लोकांना अर्धपोटीं राहावें लागत असें, तें आतां बंधमुक्त झाल्यावर त्यांना मुळींच खावयास मिळेनासें झालें! अमेरिकेंतील बंधमुक्त निग्रोंची जी स्थिति झाली, तीच या राबणारांचीही झाली. जमीनदारांचा आणि यांचा कसलाही संबंध उरला नाहीं. अर्थात् जो थोडासा कुणगा त्यांना मिळावयाचा, तोही मिळेनासा झाला. शेतकरी सरकाराला म्हणूं लागले कीं, 'आम्हांला तुम्ही मुक्त केलें असेल. पण आमची चंदीही तुम्ही बंद केलेली आहे; आम्हीं पोरांना काय आपलीं हाडें खाऊं घालावीं?' सरकारचे अधिकारी कोडगेपणानें उत्तर करीत, 'तें तुमचें तुम्ही पहा. तुमची गुलामगिरी नष्ट व्हावयास हवी होती, ती आम्हीं नष्ट केली आहे !'

ब्रेशकोवस्कीची शाळा चालूच होती; पण देशभर उडालेला हा हाहाःकार पाहून तिला वाटूं लागलें कीं, क्रांति घडवून आणण्याला आपण योजत असलेला इलाज फार सौम्य आणि दिवसगतीचा आहे; हा उपाय जेथें पोंचावयास हवा, तेथें पोंचणार नाहीं. देशांत प्रचंड राज्यक्रांति झाली पाहिजे. ती झाली, तरच आर्थिक क्रांति होईल. आणि आर्थिक क्रांति झाली, तरच शेतकऱ्यांची दैना फिटेल. आतां राजकीय क्रांति करावयाची म्हणजे करावयाचें तरी काय? घडी हळूं हळूं बदलत न्यावी, इष्ट त्या सुधारणा घडवून आणाव्या, हा कार्यक्रम तिला बरोबर वाटे. राज्यव्यवस्था आणि मग समाजव्यवस्था आमूलाग्र उलथून पाडावी, हें तिला अजूनही भावत नव्हतें. अशा काळांत एका सुधारणावादी क्रान्तिकारकाची व तिची गांठ

पडली; आणि त्यांचा प्रेमसंबंध जुळून तिनें त्याच्याशीं लग्नही करून टाकलें. कॅथरीनच्या आईला असें वाटें कीं, पोरगी नाता तऱ्हेचें पाखंड बोलूं लागली आहे. एकदां तिच्या गळ्यांत संसाराची माळ पडली, म्हणजे ती शुद्धीवर येईल. अर्थात् लग्न झाल्याबरोबर ती म्हणाली, ' चला, माझा जीव आतां भांड्यांत पडला; आतां ही पोर मार्गाला लागेल. ! '

कॅथरीननें लग्न केलें खरें, पण या नवरोजीच्या संगतींत तिच्या क्रांतिप्रवण मनाला समाधान मिळेना. आपण नवऱ्याची बायको झालों असूं; पण लहानपणापासून आपण घेतलेला ध्यास शांत होण्याचीं लक्षणें या नवऱ्याच्या संगतींत सांपडत नाहींत, व तिची हें तिला चक्क दिसूं लागलें. लवकरच पीटर क्रोपोटकिन् या एका तरुण माणसाची गांठ पडली. हा क्रोपोटकिन् राजघराण्यांतील असून फार रूपसुंदर माणूस होता. घरचाही हा चांगला गबर होता. परंतु क्रांतीच्या कल्पनेनें तोही केवळ भडकून गेला होता. आपल्या जिंदगीवर त्यानें तुळशीपत्र ठेवलें, सरकारांतून मिळालेलें सारें किताब त्यानें टाकून दिले; आणि तो गरीब लोकांत जाऊन राहूं लागला. गरिबांसाठीं फकिरी पत्करलेल्या अशा या माणसाची आणि कॅथरीनची गांठ पडली. त्याच्याशीं संभाषण चालूं झालें, म्हणजे भविष्यकालाचें खरें खरें चित्र कॅथरीनच्या डोळ्यासमोर उभें राही; आणि त्याच्या वक्तृत्वानें तिच्या मनाचे अणुरेणू कंप पावूं लागत. दूर बसून शेतकऱ्यांना शिकवावें, एवढ्यानें भागण्यासारखें नाहीं, आपण त्यांच्यापैकींच झालें पाहिजे, हा प्रिन्स क्रोपोटकिन् याचा नवा संदेश कॅथरीनच्या कानीं आला; आणि तिनें ठरविलें कीं, आपल्या समाजाचा आणि इभ्रतीचा त्याग करून आपण शेतकऱ्यांशीं तन्मय होऊन जावें. तिनें आपल्या नवऱ्याला एकें दिवशीं विचारलें कीं, ' मला आतां तत्सम होऊन जावयाचें आहे. मी आपल्या साऱ्या पीठिका विसरणार आहे. तुम्ही माझ्याबरोबर प्रत्यक्ष शेतकरी जीवनांत प्रविष्ट होण्याला येतां काय ? ' नवरा म्हणाला, " तूं म्हणतेस तें कदाचित् आवश्यक असेल; पण माझ्या हातून ही गोष्ट होण्यासारखी नाहीं. मला हें झेंपायचें नाहीं. "

नवऱ्याचें उत्तर ऐकून कॅथरीन् मनांत खट्टू झाली; पण तिनें ताडकन् उत्तर केलें कीं, " कांहीं हरकत नाहीं. तुम्ही बाहेर पडला नाहीं; तर नाहीं, मी मात्र आतां चाललें. " या वेळीं तिचे दिवस अगदीं भरत आले होते. परंतु नवऱ्याचा आणि घराचा त्याग करून, क्रांतीची कल्पना अमलांत आणण्यासाठीं ही तरणी

JAN 1951

बाई बाहेर पडली. पुढें काय वाढून ठेवलें आहे, हें तिला दिसतच होतें. एक तुरुंगांत खितपत पडावें किंवा दूर कोठेंतरी सायबेरियाच्या रेताडांत हद्दपार व्हावें. अर्थात् मरेपर्यंत मग घर नाहीं, नवरा नाहीं, कोणी नाहीं. तथापि तिनें त्याला स्वच्छच सांगितलें कीं, 'क्रांतीसाठीं मी आतां मरणाला कवटाळण्यास तयार झालें आहे!'

कॅथरीन घरांतून बाहेर पडली ती, थेट रशियाची एक जुनी राजधानी कीव येथें गेली. या कीव शहरीं तिची बहीण राहत असे. या विधवा बहिणीकडे जाऊन तिनें कांहीं दिवस मुक्काम केला. आणि शरीरावरचा भार हलका होईपर्यंत ती तेथेंच राहिली. कांहीं थोडें शिकविण्याचें काम करावें, आणि आपला गुजारा करावा, असा क्रम तिनें ठेवला होता. दिवसां शिकवावें आणि रात्रींच्या वेळीं क्रान्तीचा दिवस जवळ यावा, म्हणून लोकांत चळवळ करावी. असे थोडे दिवस जातांच कॅथरीन प्रसूत झाली. आतां मात्र तिची निष्ठा कसोटीस लागायची होती. पण तिनें आपला मुलगा, भाऊ आणि भावजय यांच्या हवालीं केला; आणि अंगांत थोडी शक्ति येतांच तीं पुन्हां संचाराला बाहेर पडली. "आईपण आणि क्रांतींची चळवळ ही दोन्ही मला झेपणार नाहीत; पण क्रान्तीला तर मी माझा जीवच अर्पण केला होता; मुलाला टाकून जाणें सोपें काम नव्हतें. त्याला लोकांच्या हवालीं करतांना माझें काळीज केवळ पिचून गेलें." असें ती पुढें एकदां म्हणाली. प्रपंच करून गुलामगिरींत वाढावयासाठीं प्रजा निर्माण करावी, कां प्रपंचावर अंगार ठेवून राष्ट्रांतील लोकांना बंधमुक्त करण्यासाठीं जिवावर उदार व्हावें, असा प्रश्न तिच्या पुढें होता; आणि असें सांगतात कीं, कॅथरीननें जसा त्याग केला, तसा त्याग करणाऱ्या कित्येक रशियन स्त्रिया या काळांत उत्पन्न झाल्या.

पोटासाठीं कांहींना कांहीं करणें भाग होतें. शिवाय 'तुम्ही धंदा काय करतां, खातां काय' असा प्रश्न सरकारी लोक आपल्याला विचारणार, हें तिला माहीतच होतें. धंदा नाहीं म्हटलें कीं पोलिसांचा डोळा आपल्यावर जास्तच राहील, म्हणून तिनें रंगाऱ्याचें काम शिकण्यांत कांहीं दिवस घालविले. तथापि माशा कॅलेन्किना आणि याकोब स्टिपॅनोविच् यांच्यासह कॅथरीन् क्रांतीच्या चळवळीला निघाली. क्रांतीची ज्योत कोठें सांपडते, हें त्यांना पहावयाचें होतें. त्यांनीं शेतकरी स्त्रियांचीं रूपें घेतलीं आणि कामाला सुरवात केली.

त्या काळीं प्रवासाला परवाने लागत. म्हणून त्यांनीं खोटेच परवाने तयार केले. कॅथरीनच्या परवान्यांत म्हटलें होतें कीं, ‘ या बाईचें वय चाळीस वर्षांचें असून, ओलेंव प्रांतांतील एका खेडेंगांवची ही आहे. ’ खरें म्हटलें म्हणजे कॅथरीनचें वय सध्यां तीस वर्षांचेंच होतें; पण आपण थोडें पोक्त दिसावें, अशी तरतूद तिनें केली. तसेंच एकाकी प्रवासांत सौंदर्यहि पुष्कळदां धोक्याचें ठरतें. म्हणून तें घालविण्याचीहि व्यवस्था तिनें केली; म्हणजे कसली तरी ओंगळ वस्त्रें पेहरावीं, सुरकुत्या पडलेला पदर तोंडावरून घ्यावा, पायांत कसला तरी झाडाच्या सालीचा वगैरे जोडा घालावा, आणि शेतकऱ्यांच्या बायका अंगांत घालीत असत तसें एक निळें कुडतें घालून, कमरेला एक तांबडा पट्टा बांधावा. तात्पर्य, कोणालाहि असेंच वाटावें कीं, ही एक साधीसुधी गांवढळ बाई आहे. पण किती झालें तरी तिच्या शरीराचें सुकुमारपण पूर्णपणें लपणें सर्वथा अशक्य होतें. अशा वेषानेंच ती शेतकऱ्यांत आणि कामगारांत जाऊन मिसळत असे. पण बारीक रीतीनें तिच्याकडे पाहणारांना असें वाटें कीं, ही आपल्यापैकीं नव्हे. एकदां एक मजूर तिच्या शरीराकडे पाहून म्हणाला, ‘ आपण शेतकरी आहां असें तुम्ही म्हणतां, मग तुमचे हात इतके गोंडस आणि मऊ कसे ?’ कॅथरीननें बतावणी केली कीं, “ एका श्रीमंत उमरावाच्या घरीं मी कामधंद्याला होते. तो मला नेहमीं नाजूकच कामें सांगी. त्यामुळें माझे हात असे राहिले आहेत. ” मजुराला हें खरें वाटेना. तो कांहींसा हंसून म्हणाला, “ आलं ध्यानांत; आलं ध्यानांत. ”

या गांवाहून त्या गांवाला असें करतां करतां तिचा प्रवास पुष्कळच झाला. सर्व देशभर हिंडावें आणि खेडेंगांवच्या लोकांत असंतोषाची आगटी पेटवावी, असा कॅथरीनचा हेतु होता. म्हणून ती प्रवासाला निघाली होती. चालून चालून तिच्या पायाला फोड येत; ती श्रीमंतींत वाढलेली पण आतां शेतकऱ्यांच्या घरचा मिळेल तो तुकडा तिला खावा लागे. कित्येकदां तो तोंडापुढें सुद्धां आणूं नये असें वाटे. पण इलाज नव्हता. कोठें मुक्कामाला राहावें, तर चन्द्रमौळी घर असावें, आंत कोळिष्टकें लागलेलीं असावीं, तेथेंच खांद्यावरच्या सामानसुमानाचा भार उतरवून एखाद्या पटकुरावर झोपीं जावे; आणि उंदरांची चिंवचिंव कानाशीं चालू असतां जी काय मिळेल ती झोंप घ्यावी, अशा रीतीनें कॅथरीनचा प्रवासाचा कार्यक्रम अखंड चालू राहिला.

इतके हाल होत होते, तरी तिनें आपलें काम सोडलें नाहीं. खेडेगांवच्या लोकांत झारशाहीच्या विरुद्ध भावना उत्पन्न करणें, हें आपलें पहिलें काम आहे, असें तिनें ठरविलें होतें. पण बोलावयास जावें, तों शेतकरी म्हणत, "आमचे झारबाबा मोठे थोर आणि उमदे गृहस्थ आहेत. आम्ही त्याचीं लेकरेंच आहोंत; आणि तो आमचा बाप आहे. आमचे हाल होतात, याला तो काय करणार? सरदार लोक हे अतिशय वाईट आहेत; हे उमराव आम्हांला सारखे छळत असतात आणि झारला जाऊन सांगतात कीं, जिकडे तिकडे अबादी-अबाद आहे, लोक तूप-साखर खात आहेत; आणि राज्याचा बंदोबस्त उत्तम आहे. आमच्या हालांची कहाणी झारच्या कानावर कधीं जातच नाहीं." लोकांच्या मनांतून हा गैरसमज काढून टाकणें फार कठीण जाऊं लागलें. झार स्वतः प्रजेकडे दुर्लक्ष करतो; आपण सुखांत राहतो; आणि कष्ट करणारांना छळणारे कायदे पास करतो, कोणी थोडी मान वर केली, कीं त्याला दडपून टाकण्यासाठीं आपलें प्यादें तो पाठवितो, हें कॅथरीनचें म्हणणें शेतकऱ्यांना आणि कामगारांना खरेंच वाटेना. झारचा दरबार कसा चालतो, आणि सामान्य लोकांची चालू असलेली दैना खुद्द झार स्वतः उघड्या डोळ्यांनीं कशी पाहतो, या संबंधींची छापलेलीं पत्रकें या लोकांना वाचून दाखवावीं, तर त्यांवरहि त्यांचा विश्वास बसेना. ते म्हणत, "कायद्याचीं पुस्तकें उमरावांनीं तयार केलीं आहेत; आणि आमच्या रक्षणासाठीं झारबाबांनीं चांगल्या कायद्याचीं जीं पानें यांत घातलेलीं असत, तीं हे उमराव लोक फाडून टाकतात." अशा या लोकांचा भ्रम नाहींसा करणें मोठें कठीण काम होतें.

तथापि 'मोझेस् आणि त्याचे चार भाऊ' अशा सारखीं कांहीं कांहीं पुस्तकें या लोकांना वाचून दाखविण्याचा क्रम कॅथरीननें चालू केला. आणि मग मात्र या अडाणी लोकांचे डोळे एकदमच उघडले. त्यांना कळून चुकलें कीं, अमीर उमराव आणि झार हे दोघेहि एकाच माळेचे मणी आहेत, सारे उडीद सारखेच काळे आहेत, काळे-गोरे म्हणून निवडावयास मुळींच जागा नाहीं. हळू हळू शेतकऱ्यांत आणि कामगारांत असंतोषाचें वारें फैलावूं लागलें. पण अजूनहि झारबाबावर श्रद्धा असलेल्या लोकांनीं कॅथरीनच्या या चळवळीची बातमी पोलिसांच्या कानावर घातली; आणि मग एके दिवशीं या लोकांच्या पुढें क्रांतिवाङ्मयाचें वाचन चालू असतां त्यांनीं कॅथरीनवर झडप घातली.

क्रांतिकारकांची भीति झारच्या दरबाराला इतकी पडली होती, कीं या लोकांना शिक्षा द्यावयाची ती कंबर मोडेशीच दिली पाहिजे, असें दरबारनें ठरविलें होतें.

पोलिसांनीं कॅथरीनला पकडलें, तेव्हां ती म्हणाली, ' मी दुसरें तिसरें कांहीं करीत नसून या अज्ञ लोकांना विचार करावयास शिकवीत आहे.' यावर ते पोलिस म्हणाले, ' थांब, तुला विचार करावयाला छान जागा देतों.' त्यांनीं तिला एका जेलखान्यांत भिरकावून दिलें. तेथें डोळ्यांत बोट घातलें, तरी दिसत नव्हतें; उंदीर-घुशींचा सुळसुळाट चालला होता; आणि आंतल्या लोकांनीं केलेल्या घाणी-वर आंत येणारांचे पाय सरासर घसरत होते. सारी रात्र कॅथरीन् हिनें उभें राहूनच काढली. यानंतर या तुरुंगांतून त्या तुरुंगांत तिची रवानगी होत राहिली; आणि निरनिराळ्या जेलखान्यांची चव तिला आणून दिल्यानंतर त्यांनीं तिला सायबे-रियांत हद्दपारीवर पाठवून दिलें. पांच वर्षेंपर्यंत खाणी खणण्याचें सक्तमजुरीचें काम तिला देण्यांत आलें. ही मुदत संपल्यानंतर पुढें कित्येक वर्षें सायबेरियाच्या रेताडांतच तिनें राहावें, अशी सजा देण्यांत आली.

पोलिसांनीं तिला एका गाडींत बसविलें, दोन्हीकडें दोन गलेलठ्ठ शिपाई बसविले होते. आठवड्यामागें आठवडा ही गाडी खडकाळ सडकांवरून धक्के खात चालली होती. कोठेंहि दहा मिनिटांपेक्षां जास्त मुक्काम त्यांनीं होऊं दिला नाहीं. झोंपेचें नांव नाहीं. आणि ते गलेलठ्ठ आसामी तर तिच्याकडे सारखे टक लावून बसले होते. कोठें एकादी रात्र मुक्काम करावा, तर मुक्कामाची जागा म्हणजे उंदीर-घुशींचें पेंव फुटलें आहे, असें वाटत असे. अशा प्रकारची ही दुर्धर आपत्ति या झार-बाबांच्या काळांत दहा लक्ष लोकांच्या नशिबीं आली होती.

जातां जातां शेवटीं ही टोळी कारा गांवच्या खाणीजवळ येऊन पोंचली. येथें सक्तमजुरी तर होतीच, पण कांहीं कांहीं वेळां ऐद्यासारखें बसून राहण्याची शिक्षा होत असे. थोडेसे दिवस येथें गेल्यावर उत्तर ध्रुव प्रदेशांतील बार्गुझिन् या गांवाकडे तिची रवानगी करण्यांत आली. हा गांव जवळ जवळ बर्फांत गाडले-लाच असे. तेथें पोंचेपर्यंत कॅथरीन् हिला एक हजार मैल पायीं चालावें लागलें. सारे कैदी लोक खालीं माना घालून दिवसानुदिवस चालले होते. हुं कां चूं करण्याची सोय नव्हती. वाटेनें उजव्या डाव्या हाताला पहावें, तर असल्या हालांत मरून गेलेल्या कैद्यांच्या प्रेतांचे सापळे दोन्ही बाजूला भेडसावीत असत. तेथें पोंचल्यावर कांहीं स्थानिक लोकांच्या मुलांना शिकवावें, असें कॅथरीननें ठरविलें. पण तिला जरब देण्यांत आली कीं, झारच्या राज्यांत शिकविणें-बिकवणें सारें बंद आहे.

बरेच दिवस गेल्यावर तेथलीं तीन तरणीं शिकाऊ पोरें बरोबर घेऊन कॅथरीननें या गांवांतून पळ काढला. सायबेरिया म्हणजे एक अवाढव्य देश आहे; आणि इतक्या वर्षांपूर्वी तर पाऊलवाटांशिवाय दुसऱ्या वाटाहि फारशा नसत. अर्थात् वाटाड्याशिवाय वाटचाल करणें सर्वथा अशक्य होतें. कॅथरीनचा वाटाड्या वाट चुकला आणि ही सारी मंडळी अचानक पोलिसांच्या हातीं लागली!

कॅथरीनला पुन्हां खाणींतल्या सक्त मजुरीची शिक्षा झाली. येथें केवळ कदान्नावर रहावें लागे. पण कॅथरीनची मूळची शरीर प्रकृति दणकट आणि तिची मनःप्रकृति तर अधिकच बळकट; त्यामुळें ती त्यांतूनहि बचावून गेली. एक अमेरिकन बातमीदार तिला भेटण्यासाठीं मुद्दाम गेला होता. त्याला ती कठोर निग्रहानें म्हणाली, " आम्ही मरून जाऊं; आमचीं मुलें बंधमुक्त होतील; कदाचित् मुलेंहि मरून जातील; पण नातवंडें तरी मुक्त होतील!" तिचा हा दुर्दम्य आशावाद पाहून बातमीदार चकितच होऊन गेला.

१८९६ मध्यें, सायबेरियांतून तिची मुक्तता झाली. परत आल्यावर ती आपल्या जुन्या मित्रांना आणि नातेवाईकांना भेटली. त्यांचें तें सुखाचें जीवन पाहून तिला मोठा विस्मय वाटला. परंतु रशिया मुक्त होईपर्यंत ती गप्प बसणार नव्हती. ती पुन्हा क्रांतिकारकांच्या टोळींला जाऊन मिळाली. शेतकऱ्याचा वेष घेऊन तिनें कामाला सुरवात केली. पोलिसांना हुलकावण्या देण्यांत ती आतां पटाईत झाली होती. केव्हां शेतकऱ्यासारखें दिसावें; केव्हां स्वैंपाकिणीचा वेष घ्यावा, असें करीत तिनें कांहीं दिवस घालविले. आणि मग ती अमेरिकेंत गेली. तेथील लोकांनीं तिचा जयजयकारच केला. ती सभास्थानीं येतांच सारे श्रोते तटकन् उभे राहात; हातरुमाल उडवून ते तिच्या नांवानें आरोळ्या मारीत; आणि " रशियांतील क्रांतीची जननी " म्हणून तिचा गौरव करीत. ते तिला म्हणूं लागले कीं, "आतां तुम्ही रशियांत परत जाऊं नका." परंतु या करारी बाईनें हा त्यांचा प्रेमळ आग्रह बाजूला सारला; आणि ती स्वदेशाला परत गेली.

१९१२ सालीं तिच्यावर पुन्हा खटला झाला; आणि तिला जन्मठेपेची शिक्षा झाली. पुन्हा शिक्षा, पुन्हा सायबेरिया, असें चाललें होतें. पोलिसांना वाटत होतें कीं, या प्रदेशांतील दोन तीन हिंवाळे हिनें खाल्ले, म्हणजे ही मरून जाईल. पण त्यांचा अदमास अगदीं चुकला. या बाईचें शरीर लोखंडाचें बनलें होतें. ती आतां सत्तरीला आलेली होती. पण तिचें अंग चांगलें गुबगुबीत आणि चेहरा

लालबुंद असे. जों जों वय व्हावें, तों तों ही जास्तच तरुण होत चालली आहे, असें पोलिस लोक म्हणूं लागले. ते म्हणत, " ही बाई चेटकी आहे. " त्यांनीं तिच्यावर सक्त पाहारा ठेवला; पण असल्याहि पाहाऱ्यांतून तिनें शेवटीं झुकांडी दिलीच. पण तिचें दैव खोटें. हजारों मैल चालत जाऊन आतां रशियांतून बाहेर पडणार तोंच, पोलिसांनीं तिला पुन्हां गांठलें. त्यांनीं तिला सायबेरियाच्या अगदीं उत्तर टोंकाकडें फेकून दिलें. येथल्या समुद्राच्या खाडींत आपण गोठून मरून जाणार, असें कॅथरीनला स्वतःलासुद्धां वाटूं लागलें. चार–पांच वर्षें गेलीं; आणि एके दिवशीं शुभवर्तमान आलें कीं, " रशिया स्वतंत्र झाला आहे; क्रान्ति यशस्वी झाली आहे; झारशाही समूळ उपटून पडली आहे !" आपलें स्वप्न खरें ठरलेलें पाहून ही पराक्रमी बाई आनंदानें बेहोष होऊन गेली आणि मास्कोला परत आली.

परत आल्यावर क्रान्तीचा एकंदर रोख आपल्याला हवा आहे तसा चालूं नाहीं, हें पाहून तिला वाईट वाटलें. जर्मनांशीं क्रान्तिकारकांनीं तहनामा करावा, हें तिला बिलकुल पसंत नव्हतें. मतभेद होऊन ती शेवटीं झेकोस्लोव्हाकियांत जाऊन राहिली. तथापि साऱ्या गोष्टी आपल्याला हव्या आहेत, तशाच नेहमीं घडत नाहींत, हा मानवी जीवनांतला उंच विचार तिनें प्रमाण मानला. पण शहात्तराव्या वर्षी या बाईनें प्राग येथें एक नवीन शाळा काढली; आणि आपल्याला पसंत असलेल्या क्रांतितत्त्वांचें शिक्षण चालूं ठेवलें. चौदा वर्षें म्हणजे नव्वद वर्षांची होईपर्यंत हा उद्योग तिनें चालूं ठेवला; आणि जीवितांत कृतकृत्य होऊन या क्रांन्तिकारक वृद्धेनें जगाला शेवटचा प्रणाम केला.

• • •

## हिनें गुन्हेगार मुला–मुलींना माणसांत आणलें !

# मेरी कार्पेंटर : ७ :

डॉ. लँट कार्पेंटर हा अध्यात्मविद्येवर लिहिणारा एक मोठा ग्रंथकर्ता होऊन गेला. पहिल्यापासूनच त्याचें मन धर्मप्रवण असल्यामुळें त्यानें व्यवसायहि उपदेशकाचाच पत्करला. त्याची बायकोहि फार सालस आणि धर्माचा सतत विचार करणारी होती; अर्थात् घरांतील सारें वातावरण याच कल्पनांनीं भरलेलें असे. परमेश्वराचें चिंतन आणि मानवाची सेवा हे जे दोन धर्माचे भाग ते या पतिपत्नींना चांगले अवगत होते. हीच त्यांची धर्मबुद्धि त्यांच्या सर्व मुलांतहि उतरली. मेरी कार्पेंटर ही १८०७ मध्यें जन्मली. मुलीला मेरी हें नांव देण्यांत आईबापांनीं आपली हीच बुद्धि प्रगट केली असें म्हटलें पाहिजे. मुलांना आणि मुलींना शिक्षण देण्याच्या कामीं डॉ. कार्पेंटर हा अतिशय दक्ष असे. आपल्याला पसंत असलेलीं मतें आणि मनोज्ञ वाटणाऱ्या भावना यांचा ठसा मुलांच्या मनावर आईबापांनीं लहानपणींच उठविला पाहिजे, असें त्याचें मत होतें. जें लोकांनींसुद्धां करावें असें त्याला वाटें, तें त्यानें स्वतः केलें असेल, हें उघडच आहे. परंतु मतांचें व भावनांचें शिक्षण देण्याचें काम जरी वडिलांनीं चालू ठेवलें असलें, तरी मुलींना घरगुती व्यवसाय आलेच पाहिजेत, असा मातुश्रींचा कटाक्ष असे; आणि या दोहोंचा मेळ कसा घालावा हें डॉ. कार्पेंटर याला चांगलें कळलेलें होतें.

१८२९ पर्यंत मेरी कार्पेंटर हिच्या जीवितांत विशेष कांहींच घडलें नाहीं. तेव्हांच्या मुली ज्याप्रमाणें वागत, त्याप्रमाणेंच तीहि वागे; आणि थोड्याफार फरकानें सरसकट मुलींच्या मेळांत सहज लोपून जाईल, अशीच तिची चालचलणूक असे. तिला एकविसावें वर्ष लागलें; आणि बापानें तिला पत्र लिहिलें कीं, “ तुझ्या जीविताची घडी पुढें कशी बसत जाणार आहे, याची निश्चित कल्पना मला होत नाहीं; पण येशू ख्रिस्तानें जो धर्मदीप प्रज्वलित केला आहे, त्याचीं किरणेंच तुझ्या अंगावर पडावींत, आणि त्या तेजाच्या अनुरोधानें तूं आपलें भावी

जीवित घालवावेस, असें मला वाटतें. तूं स्वतःचा उद्धार करून घ्यावास, आणि कसलाहि दिमाख न दाखवितां परमेश्वरानें निर्माण केलेल्या मानवांची सेवा तूं मनापासून करावीस अशीहि माझी इच्छा आहे."

डॉ. कार्पेंटर हळूहळू थकूं लागला, आणि त्याचा नित्याचा व्यवसाय त्याच्या हातून होईना. प्रपंच कसा चालवावा असा प्रश्न पडला. तेव्हां मेरी आणि तिच्या दोन बहिणी यांनीं ठरविलें कीं, आपण एक स्त्रीशिक्षणाची शाळा चालवावी. मुलींची आईहि या कामीं त्यांना साहाय्य करावयास सिद्ध झाली. तिलाहि थोडें शिवणें, टिपणें, विणणें इत्यादि कामें येत असत; आणि स्त्री-शिक्षणांत या गोष्टी अवश्य मानल्या जात. अर्थात् आई आणि मुली या चौघींनीं मिळून शाळा सुरू केली; आणि डॉ. कार्पेंटरच्या प्रपंचाचा गाडा त्या मोठ्या तरतुदीनें हाकूं लागल्या. मुलींना असें दिसूं लागलें कीं, आपण शाळा काढली खरी आणि आपण शिकवितोंहि, पण शिक्षणाच्या व्यवसायांतील खरें कसब अजून आपल्याला लाभलेलें नाहीं. तें हस्तगत करण्यासाठीं त्या चारसहा महिने पॅरिसला जाऊन राहिल्या; आणि मग स्त्रीशिक्षणाची शाळा कशी चालवावी, हें त्यांना जास्त चांगलें समजूं लागलें. शाळा लवकरच भरभराटीला आली. लॅटिन, ग्रीक या पुराणभाषांचें शिक्षणहि या शाळेंत मिळत असे. पण मुख्य म्हणजे कार्पेंटर यांच्या कुटुंबांत चालत आलेली जी समाजसेवेची आवड, ती सर्व विद्यार्थिनींच्या मनांत रुजत राहिली. या शाळेंतून बाहेर पडलेल्या कांहीं मुलींनीं पुढें आपलें प्रपंचाचें काम सांभाळून गरीब व अज्ञान लोकांना शिकविण्याचें काम चालू केलें. कांहींनीं आदर्श प्रपंच कसे करावे, हें तेव्हांच्या लोकांना दाखवून दिलें; आणि कांहीं कांहीं तर सार्वजनिक जीवितांत आपल्या कर्तृत्वानें चांगल्याच मान्यता पावल्या. शाळेच्या चालकांचा असा एक ठाम सिद्धांत असे कीं, शिक्षणामुळें स्त्रिया प्रपंचाला नालायक होतात. हें मत खोटें ठरवावें, असा मुलींचा आग्रह असे. आया मात्र म्हणत कीं, 'इतकें थोरलें शिकून काय करावयाचें आहे ? शिवणें, टिपणें, विणणें, आणि हिशेब-ठिशेब ठेवणें येवढें आलें म्हणजे पुरें !'

सुमारें पांच वर्षेपर्यंत मेरीचा हा शिक्षण देण्याचा उद्योग चाललेला होता. हिच्या मनांत कांहीं अकल्पित फरक पडेल, आणि हिच्या जीविताला कांहीं निराळें वळण लागेल, असें कुणालाहि वाटलें नाहीं. परंतु याच सुमारास एक अकल्पित

घटना घडून आली आणि मेरीच्या मनाला एक निराळाच झोका मिळाला. या अकल्पित घटनेचें स्वरूप थोड्या विस्तारानें सांगितलें पाहिजे.

राजा राममोहन रॉय हा आधुनिक काळांतील भारतांतील पहिला सुधारक होय. बंगाल्यांत इंग्रजांचें राज्य इतर प्रांतांच्या आधीं झालेलें असल्यानें ख्रिस्ती मिशनऱ्यांची पैरवी तिकडे बरीच झालेली होती. सामाजिक आणि धार्मिक मतांत मोठी चलबिचल उडून राहिली, आणि 'आपलें आजपर्यंत सारेंच चुकत आलें आहे' असा तेव्हांच्या लोकांचा समज झाला. राजा राममोहन रॉय हा तिकडील एक उच्चकुलीन ब्राह्मण असून प्राचीन विद्येचें त्याचें अध्ययन चांगलें झालेलें होतें. इंग्रज लोकांची राज्यकारभाराची तऱ्हा, त्यांचें साहस, त्यांची विद्याभिरुचि आणि त्यांच्या मिशनऱ्यांचे धर्मप्रसारासाठीं चाललेले यत्न हीं पाहून राममोहन रॉय अगदीं विस्मित होऊन गेला होता. त्याच्या मनाचा ओढा ख्रिस्ती धर्माकडे होऊं लागला. मूर्तिपूजेसंबंधानें त्याला पराकाष्ठेची अप्रीति उत्पन्न झाली. संस्कृत, पर्शियन व अरेबिक या तीनहि भाषा त्याला फार चांगल्या येत होत्या, आणि म्हणून मूर्तिपूजा व इतर सुधारणेचीं मतें यासंबंधींचीं अनेक पुस्तकें त्यानें या तीनहि भाषांत लिहिलीं. इंग्रजी भाषेंतहि येशू ख्रिस्ताच्या मूलभूत सिद्धांतासंबंधानें त्यानें एक ग्रंथ लिहिला. होतां होतां शेवटीं आपण इंग्लंडांतच जावें आणि तेथें धर्मांचा तौलनिक अभ्यास करावा, असें त्याला वाटूं लागलें; आणि त्याप्रमाणें तेव्हांच्या त्या दिवसांत त्यानें परदेशगमनहि केलें.

तो ब्रिस्टल येथें गेला, तेव्हां त्याची आणि डॉ. कार्पेंटर याची गांठ पडली. डॉ. कार्पेंटर हा अध्यात्मवादी लेखक होता, हें मागें सांगितलेंच आहे. कार्पेंटर व राजा राममोहन रॉय यांच्या पुष्कळ चर्चा चालत; आणि त्या ऐकावयास मुलीहि बसत. राममोहनच्या विचाराचा पल्ला आणि त्याच्या मनाचें विशाल क्षितिज यांचा मेरीच्या मनांवर विलक्षण परिणाम झाला. तिचा बाप धर्मपंडितच होता; आणि त्याच्या मुखांतून धार्मिक प्रमेयांचें विवेचन तिनें कितीदां तरी ऐकलेलें होतें. पण या हिंदु पंडिताच्या विवेचनाची छाप तिच्या मनावर जास्तच बसली. हिंदुस्थानांत स्त्रीशिक्षण पसरावें, अशी राजा राममोहन यांचीहि इच्छा होती. हें काम आपण करावें, आणि शिक्षणाच्या द्वारां भारतांतील अज्ञानाचा निरास करावा, अशी वासना मेरीच्या मनांत उत्पन्न झाली. हें सारें पुढें केव्हांतरी

व्हावयाचें होतें. पण त्या कल्पनेचें बीजारोपण राममोहन यांच्या सहवासानें तिच्या मनांत झालें हें खरें.

१८६६ त राजा राममोहन रॉय यांच्या 'इंग्लंडांतील शेवटचे दिवस' या ग्रंथाचें संपादन तिनें केलें. ग्रंथाला लिहिलेल्या प्रस्तावनेंत रॉय यांच्या संबंधाची आपली आदरबुद्धि तिनें ठिकठिकाणीं प्रकट केली आहे. धर्म आणि सदाचार यांच्या प्रसारासाठीं, रॉयनें केलेल्या प्रयत्नांचा तिनें मोठाच गौरव केला आहे; आणि त्याची गुणाढ्यता व त्याचें शुचिष्मंत चरित्र यांविषयीं गाढ आदर प्रकट केला आहे. बापानें दिलेल्या धर्मशिक्षणाच्या खालोखाल राममोहन याच्या उदात्त सहवासाचा आणि मताचा मेरीच्या मनावर फार मोठा परिणाम झाला असला पाहिजे.

मेरीचें स्त्रीशिक्षणाचें काम चालूंच होतें. डॉ. कार्पेंटर याची प्रकृति आतां अगदीं बिघडली. हवा पाणी बदलावें, म्हणून इंग्लंडांत तो अनेक ठिकाणीं जाऊन राहिला; पण प्रकृतीला कोठेंच आराम पडेना. शेवटीं वैद्यांनीं सांगितलें कीं, दक्षिण युरोपांत कोठेंतरी जावें. बापाचें दर्शन पुन्हां होईलच, अशी शाश्वति मेरीला नव्हती. मेरीला या वियोगाच्या वेळीं अत्यंत दुःख झालें. पण डॉ. कार्पेंटर याचा अंत निराळ्याच तऱ्हेनें व्हावयाचा होता. नेपल्समधून लेगहॉर्न इकडे जातांना, जहाजावरून तो समुद्रांत पडला. दोन महिन्यांनीं त्याचें प्रेत किनाऱ्याला लागलें! तेव्हां त्याचें खरोखरी काय झालें हें सर्वांना कळलें.

आतां या साऱ्या मुली पोरक्या झाल्या. पोरकें होणें म्हणजे काय, हें मेरीच्या ध्यानांत आलें. पण आपल्याला एकविसावें वर्ष लागलें, तेव्हां बापानें कोणचा उपदेश केला होता, याचें तिला पक्कें स्मरण होतें. जे कोणी पोरके असतील, पण यांना परमेश्वरानेंच उत्पन्न केलेलें असतें, त्यांची सेवा करावी, हा भाव तिचा मनांत उदित झाला; आणि आपलें भावी जीवित याच कार्यांत व्यतीत करावें, असें तिनें ठरविलें.

या वेळीं इंग्लंडांत उपरी बनलेल्या आणि उनाडक्या करीत फिरणाऱ्या मुलांना ताळ्यावर कसें आणावें, त्यांना हातीं धरून शहाणे करून सन्मार्गाला कसें लावावें, या विषयींची चर्चा विचारवंतांत आणि मुत्सद्यांत चालली होती. ती वाचीत असतांना, मेरीच्या मनाला वाटूं लागलें कीं, आपण याच कामांत पडावें; हीं

उपरीं मुलें आपलीं म्हणावीं, त्यांना ममता दाखवावी, आणि त्यांना परत माणुसकींत आणून सोडावें. हीच परमेश्वराची सेवा होईल. एकदां निश्चय झाल्यानंतर मेरीनें काचकूच केलें नाहीं किंवा मागेंहि पाहिलें नाहीं. लोकसेवेची ही बिकट वाट तिनें आपण होऊन धरली.

उपरीं आणि भटकीं मुलें बोलून चालून मुलेंच असतात. तीं मुद्दाम उनाडपणानें वागतात, असें नाहीं. त्यांच्या विचारशक्तींत जन्मतःच कांहीं दोष राहून गेलेला असतो; त्यांचीं मनें कदाचित् खुजट राहिलेलीं असतात. कांहीं ठिकाणीं असेंहि होतें कीं, दुसऱ्या बायकोच्या नादीं लागून बाप आपल्या पहिल्या बायकोच्या मुलांची निगा ठेवीनासा होतो. तो त्यांना हिडीस-फिडीस करतो; आणि मग हें घर आपलें नव्हें असें मानून पोरें दूर कोठेंतरी पळून जातात; कित्येकदां सावत्र आया त्यांना वरकरणी माया दाखवून आंतून त्यांचा छळ करतात; त्यांचें पोट मारतात; आणि मग कंटाळून जाऊन मुलं अभद्र बोलूं लागतात व घरांतून निघून जातात. कित्येक वेळां सावत्र बाप अशा लहान मुलांचा छळ करतात; आणि आपली आई येथें कोठें आली आहे; आणि हा गृहस्थ कोण, असे कडवट प्रश्न या मुलांना पडतात व तीं पळून जातात. कांहीं कांहीं वेळां शाळांतील माराच्या भयानें पोरें दडून बसूं लागतात; आणि आईबापांना हें कळूं नयें, म्हणून शेवटीं पळून जातात. एकादा दुष्ट बाप आईला मरमर मारीत आहे, हें न पाहवल्यामुळें पोरें परागंदा होतात. कांहीं मुलांना लहानपणींच, वयानें मोठीं असलेलीं दुर्गुणीं मुलें भलत्याच नादाल लावतात; आणि मग त्यांच्या मनाच्या शक्ती क्षीण होत जातात. अशा सर्व प्रकारच्चीं मुलें निराश्रित होऊन, पोटासाठीं लहान लहान चोऱ्या करूं लागतात. समाज त्यांचा वैरी बनतो; आणि न्यायाधीश त्यांना शिक्षा करतो.

वास्तविक पाहतां, यांत मुलांच्याकडे कांहींच दोष नसतो. ही प्रजा वांया जाऊं द्यावी काय, हा प्रश्न अनेकांच्या मनांत उद्भवतो; आणि त्यांना त्यांच्याविषयीं सहानुभूति उत्पन्न होते. अशांपैकीं ज्यांची धर्मबुद्धि अत्यंत उत्कट असते, ते प्रत्यक्ष कामाला लागतात; आणि हळूहळूं विनाशाच्या गर्तेत जाणाऱ्या या बालप्रजेला सावरून धरतात. मेरी कार्पेंटर ही अशाच लोकांपैकीं होती. असल्या प्रजेची सेवा हाच तिनें आपला धर्म बनवला.

परंतु, केवळ भावनेनें या प्रश्नाकडे पाहणें पुरेसें नसतें, हेंहि तिला कळून आलें; आणि तिनें या प्रश्नाचा अभ्यास सुरूं केला. शेंकडों उनाड मुलांचीं

चरित्रें तिनें जवळून न्याहळून पाहिलीं; शेकडों घरांतील प्रापंचिक रहस्यें समजावून घेतलीं; अशा मुलांच्या तोंडून अभावितपणें कोणचे उद्गार निघतात, त्यांच्या अतृप्त वासना कोणच्या असतात, आणि काय झालें किंवा ऐकलें म्हणजे त्यांचा दुर्मुखलेपणा क्षणभर दूर होतो, याचें तिनें बारकाईनें निरीक्षण केलें. हीं सारीं प्रमाणें तिच्या हाताशीं असल्यामुळें तिच्या बोलण्याला हळूंहळूं प्रामाण्य प्राप्त झालें; आणि मग या प्रश्नाच्या चौकशीसाठीं पार्लमेन्टनें जेव्हां एक समिति नेमली, तेव्हां तिच्यापुढें झालेली आपल्या या मेरीची जबानी सर्वत्र गाजली. मेरी कार्पेंटर म्हणजे या प्रश्नावर अधिकारवाणीनें बोलणारी स्त्री, असा तिचा लौकिक झाला.

लवकरच मेरीनें 'गुन्हेगार लोकांच्या मुलांना सुधारणाऱ्या शाळा' या नांवाचें एक पुस्तक लिहिलें. यानंतर लवकरच 'उनाड मुलें' या नांवाचा ग्रंथहि तिनें लिहिला. 'भिकाऱ्यांचीं मुलें' हेंहि असेंच एक पुस्तक तिनें लिहिलें. विषय अगदीं नवा असल्यामुळें आणि मेरीचें लिखाण जिवंत सहानुभूतीनें झालेलें असल्यामुळें सर्व देशभर या पुस्तकांचा जयजयकार झाला; आणि शेवटीं १८५४ त गुन्हेगार मुलांच्या सुधारणेसाठीं कायदा केला पाहिजे, असें विधेयक ब्रिटनच्या लोकसभेपुढें येऊन पासहि झालें. अनेक ठिकाणीं सरकारनें अशीं सुधारगृहें ( Remand–Homes ) सुरू केलीं.

मेरी कार्पेंटर हिला या कामीं अनेक मैत्रिणी मिळाल्या. त्यांत लेडी नोल बायरन् ही प्रमुख होती. या श्रीमंत स्त्रीचा आणि मेरीचा परिचय चमत्कारिक तऱ्हेनें झाला. मेरीचा भाऊ विल्यम कार्पेंटर हा लॉर्ड लव्हलेस् याच्या घरीं शिकवावयास जात असे; आणि या लव्हलेसनें लॉर्ड बायरनची एकुलती एक मुलगी आडा हिच्याशीं लग्न केलें होतें. स्वाभाविकच विल्यम कार्पेंटरच्या द्वारां आडाची आई म्हणजे लॉर्ड बायरनची बायको हिची आणि मेरीची ओळख झाली. या श्रीमंत स्त्रीला मेरीचें काम पाहून इतका आनंद झाला, कीं आपल्या जवळची सर्व साधनसंपत्ति या कामीं लावावी, असें तिला वाटूं लागलें.

लेडी बायरन् हिनें 'रेड लॉज' या नांवाची ब्रिस्टल येथें असलेली एक मोठी इमारत खरेदी केली; आणि या इमारतींत दुराचारी बनलेल्या आणि आपत्तींत सांपडलेल्या तरुण मुलींना ताळ्यावर आणण्यासाठीं एक शाळा तिनें सुरू केली. 'रेड लॉज' ही एक फार पुराणी इमारत होती. अनेक राज-

घराण्यांनीं या इमारतींत वस्ती केली होती. इतकेंच काय पण येथें एक ' सिंहासन मंदिर ' म्हणून सुद्धां होतें. अशी ही झोंकबाज इमारत लॉर्ड बायरनच्या बायकोनें या कामासाठीं मेरीला घेऊन दिली. मेरीचा इतमाम केवढा वाढला पहा.

मेरी कार्पेंटर हिनें स्वतः अशा मुलींच्या शिक्षणाचा हेतु काय, हें स्पष्ट करून सांगितलें. ' या मुलींच्या शारीरिक व मानसिक शक्तीची योग्य जोपासना करावी, म्हणजे त्यांना घरगुती नोकरी करून पोट भरतां येईल; आणि जर त्यांना लग्न करतां आलें, तर आपले स्वतःचे संसार नीट थाटतां येतील ' असें मेरीला वाटत असे. म्हणून, धुणें, स्वयंपाक करणें, विणकाम करणें इत्यादि कामें त्यांना शिकविण्याचा उपक्रम तिनें केला. त्यांची रुचि चांगली सुसंकृत बनावी, म्हणून त्यांना गाणें शिकविण्याची व्यवस्था करण्यांत आली. कांहीं कांहीं मुलींना चटोर-पणाचीं गाणीं आधींच म्हणतां येत असत. मेरीनें हीं गाणीं एकदम बंद केलीं; आणि त्यांना संभावित पदें शिकविलीं. लिहिणें-वाचणें हें अर्थातच रोजच्या कार्यक्रमांत होत असे. परंतु एवढ्यानेंच भागण्यासारखें नव्हतें.

' शिकण्यापेक्षां विसरणें जास्त अवघड असतें ' असें म्हणतात, तें कांहीं खोटें नाहीं. या मुलींच्या जुन्या संवयी घालवणें, हें मोठें कष्टाचें आणि नाजूक काम असे. मुलींना आपला वचक तर वाटला पाहिजे, पण आपल्या संबंधानें त्यांच्या मनांत भीति उत्पन्न होतां उपयोगाची नाहीं; त्यांना शिस्त लागावी, पण आपण कैदी आहों असें त्यांना वाटूं नये; अशी वागणुकीची ढब मेरीला ठेवावी लागे. या शिक्षणाचा परिणाम योग्य तोच झाला. कांहींशा बेताल बनत चाललेल्या या मुली निःसंशय चांगल्या मार्गावर आल्या; आणि मग कांहीं मोठ्या लोकांच्या घरीं कामधंद्याला राहूं लागल्या. ' सुस्वभावी आणि नीतिमान ' असें त्याच मुलींचें वर्णन होऊं लागलें; व कांहींना तर चांगले नवरेहि मिळाले आणि त्यांच्या संगतींत मोठ्या सुखानें त्यांनीं आपले संसार केले. अर्थात् कांहीं थोड्याशा मुली तुपांत तळल्या आणि साखरेंत घोळल्या, तरी कडू कार्ल्याप्रमाणें कडू राहिल्या! १८६२ ते ६५ या चार वर्षांत या रेड् लॉजमधून सत्तर मुली बाहेर पडल्या. यांपैकीं साठ मुली आपला जीवनक्रम सचोटीनें चालवूं लागल्या; आणि यांतल्या कांहींनीं तर समाजांत मोठें मानाचें स्थान मिळवलें.

१८६१ सालीं डब्लीन शहरांतील कारागृहें तपासण्याचें काम मेरीनें हातीं घेतलें. तीन वर्षांत तिचा हा अभ्यास पुरा झाला; आणि १८६४ त "आपले कैदी" या नांवाचा द्विखंड ग्रंथ तिनें प्रसिद्ध केला. या ग्रंथांत कैद्यांची एकंदर स्थिति आणि त्यांना मिळत असलेली वागणूक यांची माहिती दिलेली असून, कोणच्या तत्त्वांना अनुसरून कैद्यांना वागवावें, याची सूक्ष्म छाननी तिनें केली आहे. १८७२ सालीं "तुरुंगाची शिस्त" या नांवाचा आणखी एक ग्रंथ तिनें प्रसिद्ध केला. अशा प्रकारें, उनाड मुलांपासून तों तहत बिलंदर गुन्हेगारापर्यंत सर्व तऱ्हेच्या लोकांच्या मनाचा बारीक अभ्यास केल्यावर, आणि त्यांचीं जीवितें सुखीं करण्यासाठीं शक्य ते ते इलाज ग्रंथरूपानें सरकारला सुचवल्यानंतर, या विषयांत जें जें काय आपल्याला करतां येण्यासारखें होतें तें झालें आहे, असें तिला वाटूं लागलें; आणि मग तिचें मन हिंदुस्थान देशाकडे वळलें.

राजा राममोहन रॉय या उदारमनस्क सुधारकाच्या संगतींत असतांना भारतांतील स्त्रियांच्या संबंधानें अनेक गोष्टी तिनें ऐकल्या होत्या. राममोहन यांच्या मनांत आपल्या देशांत स्त्रीशिक्षणाचा फैलाव व्हावा असें फार असे. दुर्दैवानें ते तिकडेच वारले. परंतु, मेरीच्या मनांत तें शल्य रुतून बसलेलें होतें. म्हणून तिनें हिंदुस्थानांत यावयाचें ठरवलें. हिंदुस्थानच्या लोकांशीं मैत्री जोडावी, स्त्रीशिक्षणाचा फैलाव करावा, आणि आजवर चालू असलेल्या कष्टांतून बाहेर पडून थोडी विश्रांति घ्यावी, असा मेरीचा हेतु होता.

बाई इकडे येणार हें कळतांच, मुंबई सरकारनें निरनिराळ्या प्रमुखांना आज्ञापत्रें लिहिलीं कीं, "शाळा, तुरुंग, वेडेखाने इत्यादि ज्या ज्या संस्था बाईंना पहावयाच्या असतील त्या त्या त्यांना मोकळेपणानें दाखवाव्या; दप्तरांत असलेली सर्व आखबंद माहिती त्यांना पुरवावी आणि त्यांच्याशीं फार भलेपणानें वागावें. गव्हर्नरनीं स्वतः आज्ञापत्रांत म्हटलें होतें कीं, "इंग्लंडांतील कोणीहि मुत्सद्दी किंवा कारभारी असो, कोणच्याहि पक्षाचा असो, बाईच्या अनुभवाला आणि मताला हे सारे लोक सारखाच मान देत आले आहेत. बाई हिंदुस्थानांत आल्यानंतर आपल्याला पडलेले जे अनेक प्रश्न आहेत, ते सोडविण्यास बाईशीं विचारविनिमय करावा लागेल व त्याचा फार उपयोग होईल."

१८६६ च्या सप्टेंबर महिन्यांत बाई मुंबईला येऊन पोहोंचल्या. तेथेंच गव्हर्नरच्या आज्ञापत्राची एक प्रत त्यांच्या हातांत पडली. ती वाचून बाई मनांत

दचकल्याच. त्या म्हणाल्या, ' मी विश्रान्तीसाठीं आलें, पण येथें पहात्यें तों हे मला सगळीकडे हिंडवणार आणि माझ्याकडून पुष्कळ काम करवून घेणार असें दिसतें ! ' पण अवलोकन आणि सूक्ष्म अभ्यास हाच बाईचा हव्यास असल्यामुळें हें पुढें वाढून ठेवलेलें कामहि सुहास्य करून त्यांनीं हातीं घेतलें.

त्या प्रथम अहमदाबादला गेल्या. तेथील संस्थांची पाहणी करून तेथील प्राणीसंग्रहालय त्यांनीं पाहिलें. तेथील माकडें, खारोट्या आणि वाघ यांच्या वाकुल्या पाहून त्यांना फारच मौज वाटली. परंतु हिरव्या रंगाचे, लाल चोचींचे आणि काळा गळपट्टा घातलेला पोपट पाहून तर त्या हर्षभरितच होऊन गेल्या. तेथल्या वडांसारखीं विस्तीर्ण झाडें त्यांनीं कधीं पाहिलींच नव्हतीं. सुरतेच्या मुक्कामांत बाईचा फारच गौरव झाला. त्यांना दिलेल्या मानपत्रांत ' मातुःश्री ' असें संबोधन केलें होतें. स्वतःचें लग्नहि झालेलें नसतांना ज्या स्त्रीनें सहस्त्रावधि मुलांमुलींचा प्रतिपाळ केला, ज्यांना कोणी त्राता नाहीं, आणि जीं मुलें माणसाच्या जातींतून कायमचीं उठलीं असतीं, त्यांना वात्सल्यबुद्धीनें जिनें जवळ केलें, तिला सुरतेच्या स्त्रियांनीं ' मातोश्री ' म्हणून संबोधावें हें सर्वथा युक्तच होतें.

यानंतर मुंबईच्या कांहीं संस्थांची पाहणी करून त्या पुण्यास आल्या; आणि पुढें मद्रासकडून कलकत्याकडे गेल्या. गव्हर्नरजनरल सर जॉन् लॉरेन्स यांनीं आपल्या राजवाड्यांतच त्यांना राहवून घेतलें; आणि कलकत्ता शहरांतील सर्व संस्था त्यांना दाखवल्या. बाईच्या संबंधानें तेव्हां वर्तमानपत्रांत आलेल्या एका लेखांतील लहानसा उतारा येथें उद्धृत करतों. लेखक म्हणतोः--

" कुमारी कार्पेंटर यांच्या संबंधानें पुरेसें लिहिणें माझ्या शक्तीच्या बाहेरचें आहे. बाईची आस्था आणि त्यांच्या चालिरीतींतील सौजन्य ही पाहून हिंदुस्थानांतील लोक अगदीं खुष होऊन गेलेले आहेत. त्यांच्या बुद्धिमत्तेबद्दल त्यांना अतिशय आदर वाटूं लागला आहे. शांति आणि प्रगति हें बाईचें ध्येय; आणि या बाबतींत त्यांच्या हातून जें होईल असें वाटत होतें तें प्रत्यक्ष होऊन चुकलें आहे. त्यांची चालरीत आणि त्यांची संभाषणाची पद्धत यांचें अनुकरण सर्वच राज्यकर्त्या अधिकारी मंडळींनीं करावयास हवें. वास्तविक पाहतां, बाई परकीय देशांत आलेल्या आहेत; पण त्या जेथें जातील तेथें लोक त्यांच्या भोंवतीं गोळा होतात. बाईचें

बोलणें प्रेमळपणानें ऐकून घेतात. आणि त्यांची योग्यता आपल्याला कळतें हें दाखवून देतात. पण हें सारें त्यांच्या भलेपणामुळें घडून येतें."

खुद्द बाईनाहि इकडे आल्यामुळें फार आनंद झाला. त्या म्हणाल्या, "हें साल म्हणजे माझ्या दृष्टीनें मोठेंच घडामोडीचें गेलें. माझ्या जीवितांतील कार्यानंदाचा या सालीं अगदीं कळस झाला." हिंदुस्थानांतील निरनिराळ्या संस्था पाहून आपल्याला काय वाटलें हें त्यांनीं पुढील वर्षाच्या आरंभीं सर लॉरेन्स यांना सांगितलें व त्या इंग्लंडला परत जावयास निघाल्या. टाऊन हॉलमध्यें मुंबईच्या लोकांनीं त्यांचा शेवटचा सत्कार केला, सर लॉरेन्स यांना आपल्या कामाचा जो अहवाल त्यांनीं सादर केला तो पुस्तकरूपानें इंग्लंडांत परत गेल्यावर त्यांनीं छापून काढला. तेथील हिंदु स्त्रीपुरुषांनीं मोठा समारंभ करून बाईंना चहादाणीचें एक सुंदरसें तबक नजर केलें.

बाईंची लेखणीहि अव्याहत चाललेली होती. '**हिंदुस्थानांतले सहा महिने**' या नांवाचें एक मोठें पुस्तक त्यांनीं लवकरच प्रसिद्ध केलें. तें त्यांनीं राजा राममोहन रॉय यांना अर्पण केलें होतें. दोन्हीं खंडांत झालेला बाईंचा लौकिक व्हिक्टोरिया राणीच्या कानीं गेलाच होता. म्हणून त्यांनीं कार्पेंटरबाईंना राजवाड्यावर आपल्या भेटीला बोलावलें.

इकडे मुंबईंत 'नॉर्मन स्कूल' नांवाची संस्था स्थापन करून हिंदुस्थान सरकारनें दरसाल बारा हजार रुपये पांच वर्षेंपर्यंत देण्याचें पत्करलें.आपल्याला हवी आहे तशी संस्था मुंबईला निघत आहे हें पाहून बाई पुन्हां हिंदुस्थानांत यावयास निघाल्या. त्यांच्या प्रवासाचा खर्च सरकारनेंच सोसला.

येथें येतांच 'नॉर्मन स्कूलच्या व्यवस्थापिकेचें काम आपण पत्करावयास तयार आहों,' असें त्यांनीं सरकारला सांगितलें. सरकारनें ही जागा त्यांना खुषीनें दिली. दुर्दैवाची गोष्ट अशी कीं, कार्पेंटरबाईंची प्रकृति बिघडूं लागली. त्यांना हिंदुस्थानांतील हवा मानवेना. म्हणून त्या लवकरच इंग्लंडला परत गेल्या. हिंदुस्थानांतील स्त्रीशिक्षणाचें काम पुढें ढकलावें म्हणून त्या पुन्हां हिंदुस्थानांत आल्या. परंतु सर्वच गोष्टींना नेहमीं अन्त असतो,या न्यायानें दुसऱ्यासाठीं सतत श्रम करण्याच्या त्यांच्या प्रयत्नांचाहि अंत झाला; आणि इंग्लंडांतील पोरक्या मुलांपासून तों हिंदुस्थानांतील अज्ञानी स्त्रियांपर्यंत सर्व निराश्रितांना आपल्या कर्तबगारीचा लाभ करून देणारी ही साध्वी कुमारी स्त्री लवकरच मरण पावली.

• • •

## हिला देवाचें राज्य स्थापावयाचें होतें !

## फ्रॅन्सिस विलर्ड : ८ :

फ्रॅन्सिस् इ. विलर्ड या स्त्रीचें चरित्र कांहींसें अद्‌भुतच म्हटलें पाहिजे. वस्ती कोणीकडे, शिक्षण कशा प्रकारचें आणि पराक्रम कोणचा हें पाहिलें म्हणजे चरित्रांतला अद्‌भुतपणा लक्षांत येतो.

आपल्याला हें माहीत आहे कीं, युरोपांतील गोऱ्या लोकांची वस्ती अमेरिकेच्या पूर्वेकडील प्रदेशांत पहिल्यानें झाली. तेथून हे लोक पश्चिमेच्या रोखानें पसरत चालले. सामाजिक जीवनाचा जो बनाव बनलेला होता, तो ज्यांना मानवला ते त्यांत आपली सोय कशीना कशी करून घेत. परंतु, ज्यांना तो मानवत नसे, ते पश्चिम दिशेकडे तोंड करून चालूं लागत. त्या दिशेला अफाट मुलुख रिकामा पडलेला होता. हिंमत असेल तर तिकडे जावें; चांगलीशीं जमीन पाहून ती 'आपली' म्हणून ठेवावी; या जमिनीवर राबावें, आणि मग पोटभर भाकरी खावी, असा शिरस्ताच पडून गेलेला होता.

पण हें सारें सांगायला जरी सोपें असलें तरी करायला अतिशय अवघड असे. बायकापोरांना घेऊन, ज्या ठिकाणीं शासनसंस्थेचें कसलेंहि संरक्षण नाहीं, कदाचित् जेथें वन्य पशू अजूनहि बेदरकारपणें हिंडत असतील आणि ज्या जमिनीवरील जंगलाचा उन्माद केवळ भयप्रदच वाटावा तेथें जाऊन वस्ती करावी; आणि पोटाला मिळवावें, ही गोष्ट मोठी बिकट होती. शिक्षणाची सोय नाहीं; हवी ती वस्तु वेळेला मिळत नाहीं; कांहीं होऊं लागलें तर जेथें औषधपाण्याची कसलीहि सोय नाहीं; टपालाची ने-आण जेथें कोणाच्या गांवींहि नाहीं; आणि कदाचित् जेथें जिवावर बेतण्याचे प्रसंग अनेकदां येण्याचा संभव, तेथें नवा प्रपंच थाटण्यासाठीं जाऊन रहाणें केवळ निर्भय मर्दांनाच साधण्यासारखें होतें.

फ्रॅन्सिसच्या बापावर असाच स्थलांतराचा प्रसंग आलेला होता. कारणें कोणतींहि घडलेलीं असोत—न्यूयॉर्क परगाण्यांतील आपला वाणसौद्याचा धंदा त्याला किफायतीनें करतां येईना; किंवा त्याच्या हातांत तो राहीना—शेवटीं आतां येथें

राहून आपलें जमत नाहीं, असें ढळढळीत दिसूं लागल्यावर त्यानें एके दिवशीं आपलें सामानसुमान आवरलें आणि गाडी भरून, त्यावर आपलीं मुलें-माणसें बसवून हा साहसी माणूस पश्चिम दिशेनें निघाला.

मुलांना कांहींच कळत नव्हतें. सामानाच्या ढिगावर बसून आपण गाडींतून चाललों आहों, याचीच फ्रॅन्सिस् आणि तिचीं भावंडें यांना मौज वाटत होती. गाडी म्हणायचें इतकेंच; पण तो गाडाच असला पाहिजे! जिकडे जिकडे हे साहसी लोक जाऊं म्हणतील, तिकडे तिकडे कोणी वाटा तयार करून ठेविल्या होत्या, असें थोडेंच आहे? सपाटी पाहून पाहून आपल्याला हवें आहे त्या ठिकाणीं जाऊन पोहोंचणें, एवढेंच काय तें त्यांना करतां येण्यासारखें होतें.

रानचा वारा म्हटला तरी तो दरवेळीं मोठा हितकारकच असतो, किंवा वसाहतीची उघड्यावरील जागा नेहमीं निरोगीच असते, असें कसें म्हणतां येईल? शिवाय, रोगाचीं बीजें माणसें स्वतःच्या शरीराबरोबरहि घेऊन जातात. वस्तीचा थारेपालट करीत पश्चिमेकडे जातांना आपल्या घरांत क्षयाची बाधा शिरली आहे, असें विलर्डला दिसून आलें. फ्रॅन्सिसची एक बहीण क्षयानें प्रत्यक्षच आजारी पडली. हवा मानवत नाहीं, हें पाहून आणखी पश्चिमेकडे जाण्याचें विलर्डनें ठरवलें; आणि हाडें खिळखिळीं करणारी भ्रमन्ती पुन्हां पंधरा-तीन-वार केल्यानंतर ही मंडळी विस्कॉन्सिस् परगाण्यांतील रॉक् नदीच्या कांठीं एका टेकाडावर येऊन पोहोंचलीं.

सध्यां हा सारा प्रदेश माणसांनीं गजबजून गेलेला आहे, आणि आधुनिक संस्कृतीच्या खुणा तेथें पावलों पावलीं दिसून येतात; पण सुमारें शंभर वर्षांपूर्वी हा मुलूख केवळ उजाड होता. ज्याचें मन निर्भय असेल, ज्याच्या दंड-मांड्यांत बळ असेल, ज्याची बायको हरतऱ्हेचे कष्ट उपसायला सिद्ध असेल, आणि ज्याचीं पोरें बलदंड आणि खेळकर असतील, त्यालाच इकडली वस्ती मानवण्यासारखी होती.

जोशुआ विलर्ड ही आसामी अशाच प्रकारची होती. चार फाटीं आणि दगडधोंडे गोळा करून त्यानें येथें एक घर बांधलें, आणि भोंवतालचा टापू हळूं हळूं नांगराखालीं आणला. जमिनीनें उत्तम जाब दिला; आणि जोशुआचें अंबार कसदार धान्यानें भरून जाऊं लागलें. पांचापैकीं तीन पोरें शिल्लक राहिलीं; दोन देवाघरीं निघून गेलीं. दम न सोडतां, प्रयत्नाच्या बळावर जोशुआनें ही रानटी भूमि वठणीवर आणली; आणि आपला सुखाचा संसार येथें उभा केला.

एकदां भोंवतालच्या भूमीचा परिचय चांगला झाल्यानंतर सभोंवतालच्या वनस्पतींतून आणि झाडझडोऱ्यांतून फिरत राहण्यांत कसलाहि धोका नाहीं; उलट फळफळावळ आणि भाजीपाला गोळा करतां येतो, असें दिसूं लागल्यावर या भूमीसंबंधानें विलर्ड मंडळींच्या मनांत ममत्व उत्पन्न झालें. यांच्यासारखेंच आणखी कांहीं भटक्या मारीत पश्चिमेकडे निघालेले असत. विलर्ड नांवाचा गृहस्थ इकडे कोठेंतरी येऊन राहिलेला आहे, ही वर्दी त्यांना लागलेली असली, तर ते मुक्कामाला विलर्डकडेच येत. त्याला सल्ला–मसलत विचारीत; जमीन कसा काय जाब देते हें प्रत्यक्ष पहात; आणि रानावनांत येऊन राहिलेल्या या मंडळींचा स्नेह संपादन करून पुढें जात.

असल्या या घरांत आणि त्याच्या परिसरांत फ्रॅन्सिस् हळूं हळूं वाढत होती. रानचें वारें प्यालेलें एकादें खट्याळ शिंगरूं जसें असावें, तशी ही पोर होती. आईनें म्हणावें कीं, ‘ घरांतलें कांहीं काम कर ’; पण हिनें मात्र आईचा डोळा चुकवून बोकडाच्या पाठीवर जेवणाचा डबा बांधून कोठेंतरी रानांत झुकांडी द्यावी! भोंवतालचें सारें रान या पोरीनें तुडवून काढलें. विलकॉन्सिस परगाण्याच्या उत्तरेकडेच त्यांचें मकाण असल्यामुळें पुढें जातां जातां, या पोरीला समुद्राचा उंच घोष ऐकूं येऊं लागला. निळ्या पाण्यानें भरलेला तो अफाट दरिया, त्याच्या राक्षसी लाटा. आणि त्याच्या कांठचें तें विस्तीर्ण वाळवंट, हीं पाहून फ्रॅन्सिस् केवळ मुग्ध होऊन जाई. विस्तार, मोकळेपणा, दश दिशांचा निरभ्रपणा, सृष्टीच्या प्रकृतींतील उन्माद, यांचा विलक्षण परिणाम फ्रॅन्सिसच्या मनावर झाला. तथापि येवढ्यानें भागण्यासारखें नव्हतें.

घरांत माणसें थोडीं आणि कामें फार; हीं कामें केलीं, तरच सर्वांना सुख लागणार होतें. कालवडी, शेरड्या, कोंबड्या भराभर वाढत चालल्या होत्या. त्यांची निगा राखणें, दाणागोटा गोळा करणें, निसणें, सडणें, अंबारें साफ करणें–हीं कामें एकटी आई किती करणार? रागें भर-भरून जोशुआ फ्रॅन्सिसला आणि तिच्या बहिणींना कामाला लावी.

तिची आई मोठी शहाणी बाई होती. जोशुआशीं लग्न होण्यापूर्वी ती मास्तरीण होती· अर्थात् आपल्या मुलींना शिकवलें पाहिजे, हा विचार तिच्या मनांत सदैव जागृत असे. वेळांत वेळ काढूत तिनें ह्या सर्वांना लिहिणें–वाचणें शिकवलें; आणि मग फ्रॅन्सिसच्या मनाचा ओढा पुस्तकांकडे लागला.

मिळतील तीं तीं पुस्तकें जोशुआनें येणाऱ्या, जाणारांच्या हस्तें जमा केलेलीं होतीं. त्यांत बायबल हें अर्थातच मुख्य होतें. या धर्मपुस्तकाचें शिक्षण तो आपल्या मुलींना मोठ्या आग्रहानें आणि गंभीर बुद्धीनें देई. तहान लागली तर शेजारच्या झऱ्यावर जाऊं, आणि त्याच्या मधुर आणि शीतल जलानें आम्हीं आपली तृषा शांत करूं, पण कोणच्याहि मादक पेयाला दुरूनसुद्धां शिवणार नाहीं, अशी शपथ जोशुआनें आपल्या मुलींकडून घेवविली.

तथापि त्यानें ही करडी धर्मबुद्धि त्यांच्या ठिकाणीं किती जरी बिंबवलेली असली, तरी हरतऱ्हेच्या वाचनाकडे मुलींचें लक्ष साहजिकच जाई. फ्रॅन्सिस् आतां अठरा वर्षांची झाली होती. तिला कादंबरीवाचनाचा छंद फारच लागला. एके दिवशीं बाप रानांतून परत येऊन पाहतों, तों फ्रॅन्सिस् एका कादंबरींत तोंड खुपसून बसलेली ! बाप रागानें लाल झाला. मुलगी पहिल्यापासूनच थोडीशी फटकळ होती. ती त्याला म्हणालीः--'बाबा, मी आतां अठरा वर्षांची झालें आहे. काय वाचावें अन् काय न वाचावें हें मला आतां चांगलें कळतें.' असें म्हणत असतांना बापाकडे बघत ती मिष्किलपणें हंसत होती. बापाचा राग क्षणांत मावळला; आणि तो विनोदानें म्हणाला. "पोरी, तूं आतां प्रौढ झाली आहेस खरी; आईच्याच जातीची दिसतेस !"

आपण प्रौढ स्त्री झालों, या विचारांत फ्रॅंसिस् अगदीं दंग होऊन गेली. प्रौढ स्त्री बनणें म्हणजे एक मोठी मानाची पदवी पावणें होय, असें तिला वाटत असे. आईचा घरांतला अधिकार, व क्वचित् बापावरहि चालणारें तिचें वर्चस्व हीं पाहिल्यावर तिचें मत असें व्हावें हें बरोबर होतें. परंतु तिनें जरी घी पाहिलेलें असलें, तरी अजून बडगा देखला नव्हता. एके दिवशीं तो तिच्या सहज नजरेस पडला.

कसली तरी एक निवडणूक चालू झाली होती; विलर्ड मंडळी जरी रानावनांत येऊन राहिलेली होती, तरी मतांचा अधिकार त्यांना मिळालेला होता. निवडणुकीचा दिवस उजाडला; आणि फ्रॅन्सिसचा बाप व भाऊ मत देण्यासाठीं गाडींतून निघाले. हे दोघे मत देण्यासाठीं जात आहेत, आणि आपण मात्र घरीं बसलों आहोंत याचें फ्रॅन्सिसला मोठेंच वैषम्य वाटलें. अमेरिकेंत मताचा अधिकार तेव्हां फक्त पुरुषांना होता; आणि बायका किती जरी शहाण्या असल्या, तरी त्यांना 'मत' नसे !

अर्थातच फ्रॅन्सिस्‌सारख्या मानी मुलीला हा पंक्तिप्रपंच अतिशय अपमानकारक वाटूं लागला. तिची बहीण तिला म्हणाली, 'ताई, तूं म्हणतेस तें खरें; पण असं कांहीं बोलूं लागलें, कीं 'पोरी माजल्यात आहेत' असें लोक म्हणूं लागतात.' फ्रॅन्सिस् गुरगुरून उत्तरली, 'हो! हो! मी माजल्यें आहे, असंच त्यांना दाखवून देत्यें.'

लवकरच बापानें तिला नॉर्थ वेस्टर्न वुइमेन्स् कॉलेजमध्यें घातलें. तेथें तिला सारें नवें जग दिसूं लागलें. ही खेड्यांतून आलेली; हिचा आवाज भसाडा असलेला, हिला नागर चालिरीतीची नरमाई माहीत नसलेली; बाकीच्या पोरी तिच्याकडे थोड्या उपाहासानें पाहूं लागल्या. कोणी कोणी तर तिची टवाळीच करूं लागल्या. त्याबरोबर फ्रॅन्सिसनें एकदोघींना असे रट्टे लगावले, कीं बाकीच्या मुली चूप होऊन राहिल्या. आपल्या केसांचा रंग हा एक मोठा टीकेचा विषय बनत आहे असें पाहतांच तिनें एके दिवशीं केस कापून टाकले. कॉलेजांत तिच्यापुढें कोणाची मात्रा चालेनाशी झाली. शिक्षक मंडळी सुद्धां फारशी तिच्या वाटेस जात नसत.ही कोणाला काय बोलेल,याचा नेम नसल्यामुळें जो तो आपली अब्रू संभाळून असे. ती पुढें मोठी झाली. त्यामुळें तिच्या लहानपणच्या वांडपणाचें कौतुक करण्याची चाल पुढें पडली. जर कां ती चार-चौघींसारखीच निवटली असती तर, तिचे हे विद्यार्थिदशेंतले चाळे मूर्खपणाचेच ठरले असते. एकदां तर ती दारें लावून वर्गांत विड्याच ओढत बसलेली सापडली; पण लौकरच तिच्या ध्यानीं आलें कीं हा आडदांडपणा आणि हे चाळे सोडले पाहिजेत.

चार-सहा महिन्यांत ती इतकी निवळली, कीं वर्गांतली सगळ्यांत शहाणी मुलगी म्हणजे ही असें शिक्षक म्हणूं लागले. तिला त्यांनीं कॉलेजच्या वृत्तपत्राची संपादिका नेमलें, वाक्‌सभेचे अध्यक्ष केले; आणि स्त्री–पुरुष विद्यार्थ्यांची जीं सामाजिक संमेलनें भरत, तीं चालवण्याचें जबाबदारीचें काम त्यांनीं तिच्याकडे दिलें.

होतां होतां या साऱ्या चळवळींचा परिणाम इतका झाला, कीं ती नवज्वरानें आजारी पडली; आणि तिचा परीक्षेचा अभ्यास करणें तसेंच रेंगाळत पडलें. त्यांतच मध्यंतरी तिची बहिण क्षयानें वारली; आणि फ्रॅन्सिसचें शिक्षण शेवटीं संपुष्टांत आलें. तथापि पीटर्सबर्ग फिमेल कॉलेजमध्यें तिला शिक्षिकेची जागा मिळाली.

हळूं हळूं तिची स्त्रीजीवनाकडे पाहण्याची दृष्टीच बदलली. तिचें ज्ञान, तिची गंभीर वृत्ति, यांचा परिणाम विद्यार्थिनींवर इतका होत असे, कीं बाकीच्या शिक्षकांच्या पोटांत मत्सराग्नि भडकूं लागे. ते म्हणत, ‘ ही कांहीं आमच्यापेक्षां विद्वान नाहीं खास; पण ही साऱ्या पोरींना वेड लावतें; याचें कारण हिच्यापाशीं संमोहनास्त्र असावें.’

शिक्षिकेचें काम कांहीं वर्षें केल्यावर फ्रॅन्सिसला वाटूं लागलें कीं, ‘ आपण कुचंब्रत आहों, आपल्या मनाची वाढ व्हायला हवी असली, तर एकदां युरोपांतून जाऊन आलें पाहिजे.’ इतक्यांत तिचा बाप वारला. हें दुःखहि विसरावें, आणि युरोपांतील स्त्री–जीवनाची हालहवाल पहावी, अशा दुहेरी हेतूनें ती १८६८ त युरोपांत गेली.

युरोपियन शहरांतील सुंदर हवेल्या, उंच उंच प्रासाद, रमणीय उद्यानें, भव्य स्मारकें, श्रीमंत आणि समृद्ध बाजारपेठा, हा सारा देखावा पाहून ती अगदीं दिपून गेली; आणि आपला देश या मानानें कांहींच नाहीं, असें तिला वाटूं लागलें. तथापि, तेथील लोकांतील उच्च–नीच भाव, गरिबी आणि श्रीमंती यांचा शेजारधर्म, आणि गरिबांच्या जीविताची होत असलेली उपेक्षा, हीं पाहून तर तिचा जीव अगदीं गुदमरून गेला. तेव्हां या दृष्टीनें पाहतां आपला देश अधिक चांगला आहे, अधिक न्यायी आहे, असें तिला वाटूं लागलें; कारण सर्वांना सारखी संधि मिळावी, आणि नशिब काढण्याचा परवाना कोणालाच नाकारूं नयें, हें तत्त्व अमेरिकेनें आधींच पत्करलेलें होतें. मात्र, आपल्या देशांतहि बायकांना मत नाहीं, गरीब मजुरांची दाद कोणी घेत नाहीं, आणि दारूखालीं सारा समाज झिजून जात आहे, हें चित्र तिच्या डोळ्यापुढें सारखें उभे राहूं लागलें. येथेंच तिनें हा त्रिविध संकल्प सोडला:—

दारूचें उच्चाटन केलें पाहिजे; स्त्रियांना मतदानाचा अधिकार मिळवून दिला पाहिजे; आणि मजुरांचीं संघटना केली पाहिजे. हाच तो संकल्प होय.

अमेरिकेंत परत येतांच दारुबंदीची मोहीमच तिनें चालू केली. टेम्परन्स म्हणजे मितपान—कोणी म्हणतात कीं अमेरिकेची चळवळ मितपानाची—म्हणजे ‘ दारु फार पिऊं नये ’ अशा स्वरूपाची होती. पण तिला दारूचें उच्चाटणच करायचें होतें. फ्रॅन्सिस् ही प्रत्येक गुत्त्यापुढें अन् क्लबापुढें जाऊन गुडघे टेकून दारुड्यांची

प्रार्थना करूं लागली. तिनें परमेश्वराचें आवाहन करावें, डोळ्यांत आसवें आणावीं, आणि 'आपल्या आया-बहिणींना पशूसारखें वागवूं नका' असें म्हणावें. तिच्या मैत्रिणीहि याच पंथांत शिरल्या; आणि त्यांनीं पुरुषांना अगदीं लाज आणलीं. पुरुष खजिल होऊं लागले; आणि दारूचीं दुकानें भराभर बंद पडूं लागली. फ्रॅन्सिसची आई म्हणे, 'आपण गरीब आहों; पण तू पैसा मिळवण्याच्या नादीं लागूं नकोस. आम्हीं आमचे घरांत कसेंतरी भागवूं; तू या पुरुषाच्या जातीला गुत्त्यांतून उठीव.' आईच्या प्रोत्साहनाने निभ्रान्त बनलेली फ्रॅन्सिस् म्हणजे पुरुषांच्या मद्यमोचनाची निशाणीच बनली.

मागें सांगितलेंच आहे कीं, गरिबांच्या दारिद्र्याचाहि तिला उद्वेग वाटूं लागला होता. पण हें दारिद्र्य बहुतांशीं दारूमुळें उत्पन्न होत आहे, हें तिनें ओळखलेलें असल्यामुळें तिनें पहिला सोटा बाटलीवरच मारला. पण आणखी विचार करतां करतां तिला दिसूं लागलें कीं, दारूमुळें लोक गरीब होत आहेत हें जितकें खरें, त्यापेक्षां गरिबीमुळ लोक दारू पीत आहेत, हें जास्त खरें आहे. गरिबीची जाणीव विसरावी म्हणून लोक दारू पितात, हें मत एकदां पत्करल्यावर मजुरांची गरिबी कारखानदारांच्या लोभामुळें उत्पन्न होतें, हेंहि तिच्या ध्यानांत आलें; आणि म्हणून मजुरांच्या संघटनेचें काम तिनें सुरूं केलें. या संघटनेच्या कामांत तिनें विलक्षण यश मिळवलें. दहा लक्ष मजूर तिच्या संस्थेचे सभासद झाले. हे सर्व मजूर नाना पंथाचे आणि नाना जातींचे होते.

याच वेळीं बायकांना मतदानाचा हक्क मिळावा, या प्रचाराचाहि धुमधडाका तिनें उडवून दिला. बायकांना मतदान मिळालें, म्हणजे पुरुष वठणीवर येतील, आणि सध्यांचींच घरें अधिक सुखी होतील, असा तिचा ठाम सिद्धांत होता.

अमेरिकेंत आपली चळवळ चांगलीच फोंफावली आहे हें पाहतांच, दारुबंदी, मजूर-संघटण, आाण स्त्रियांना मतदानाचा अधिकार या तीन मुद्यांवर तिनें एक मोठा जाहिरनामा काढला; आणि पन्नास भाषांत त्याचीं भाषांतरें करून पृथ्वीवरील सर्व सरकाराकडे तिनें तो पाठवून दिला. परमेश्वराचें न्यायाचें, सत्याचें आणि सद्गुणाचें राज्य सर्वत्र सुरू व्हावें, अशी आपली इच्छा असल्याचें तिनें त्यांत जाहीर केलें.

तुर्की सरकारनें आर्मेनियन लोकांची कत्तल चालविलेली आहे, हें वर्तमान प्रसिद्ध होतांच निराश्रित आर्मेनियन्ससाठीं तिनें एक मोठा निधि उभा केला,

कपडे गोळा केले, धान्य जमवलें; आणि औषध–पाण्याच्या बंग्या बरोबर देऊन तिनें आपले दूत आर्मेनियाकडे धाडले. आपल्या सरकारच्या मागें लागून तुर्की सरकारला जरब देण्याच्या कामांतहि तिनें यश संपादन केलें.

पण आतां फ्रॅन्सिस् थकूं लागली. चळवळीचा धडाका चालू होता, तेव्हांसुद्धां ती कधीं पगार घेत नसे; आणि घेतला तर केवळ आमटी-भाकरीपुरता घेत असे. यामुळें तिच्या शरीरावर अतिश्रमाचा परिणाम त्वरेनें होऊं लागला; आणि तिनें अंथरूण धरलें. या आजारांतच तिनें तीन महिन्यांत बाराशें पानांचें आत्मचरित्र लिहून काढलें. थोडासा हवापालटहि तिनें केला; पण चांगल्या हवेलासुद्धां तिचें शरीर जाब देईना. होतां होतां ती अगदीं क्षीण झाली; आणि शेवटीं म्हणाली कीं, ‘आतां दुसरें कांहीं तरी काम केलें पाहिजे; पण...पण तें दुसऱ्या जगांतच होईल!’ इतकें बोलून एकाद्या झंझावाताप्रमाणें आपल्या देशांत लोकांच्या बऱ्यासाठीं घोंघावत फिरणारी ही पराक्रमी स्त्री परलोकच्या द्वारांत गतप्राण होऊन पडली!

• • •

हिनें स्त्रीजातीचें मुख रेडियमइतकेंच उजळ केलें !

## मादाम क्यूरी : १ :

मादाम क्यूरी ही पोलंडमध्यें १८६७ सालीं जन्मली. तिनें एका फ्रेंच शास्त्रज्ञाशीं लग्न केलें, म्हणून तिला फरेंच समजतात, इतकेंच. क्यूरीचें माहेरचें नांव मार्जा असें होतें. तिचा बाप कॉलेजांत भौतिक शास्त्रें शिकवीत असे. परंतु त्याची घरची गरिबीच होती. शास्त्रज्ञाला कांहीं किंमत असते, आणि म्हणून त्याला सांपत्तिक स्वास्थ्य उत्पन्न करून द्यावें, हें पहिल्या पहिल्यानें युरोपांतसुद्धां फार थोड्या सरकारांना कळत असे. त्यांतून पोलंडवर तेव्हां रशियाचें राज्य होतें. झारच्या करड्या अंमलाखालीं पोलिश जनता अगदीं बेजार झाली होती. पोलिश जनतेला दारिद्र्यानें गांजलें होतेंच; पण तिची पोलिश भाषासुद्धां मारून टाकण्याचें झारचे यत्न चालले होते. पोलिश लोकांच्या कत्तली सुद्धां होत असत; आणि या कत्तली करावयास झारला थोडेंसुद्धां कारण पुरत असे. म्हणजे स्वदेशांतच पोलिश लोक चोर झाले होते. मार्जाला लहानपणापासून वाटे कीं, आपणही शास्त्राभ्यासच करावा; पण हें पोलंडमध्यें रहाणें नको. घरची गरिबी; म्हणून तिनें एका श्रीमंताच्या घरीं मुलें सांभाळण्याचें काम पत्करलें. ज्या मुलीला तिनें सांभाळण्याचें काम चालू केलें, तिचा एक मोठा भाऊ होता. त्याचें मन मार्जावर बसलें. मार्जाही त्याला नाहीं म्हणेना. हळूं हळू यांच्या प्रेमसंबंधाची वार्ता मालकाला कळली. आणि मग तीं श्रीमंत नवरा–बायको रागानें अगदीं बेफाम बनलीं. एका दरिद्री मुलीशीं आपला मुलगा लग्न करतो म्हणजे काय, असें म्हणून त्यांनीं मार्जाला नोकरीवरून काढून टाकलें. मार्जानें नोकरीचे थोडेसे पैसे गांठीला बांधले होते, ते घेऊन ही अवमानित मुलगी शास्त्राभ्यासासाठीं पॅरिसला आली.

पॅरिस शहरांत अनेक मोठाले शास्त्रज्ञ होते व संशोधकहि होते. मार्जानें त्यांच्या हाताखालीं बी. ए. ची पदवी मिळविली; आणि तिची हुशारी तेथील शास्त्रज्ञांच्या मनांत चांगलीच भरली. ती एम्. ए. चा अभ्यास करूं लागली. परंतु प्रयोग करून पाहण्याला तिला पुरेशी जागा सांपडेना; कारण तिची राह-

ण्याची जागा, म्हणजे चांदईकडे खिडकी असलेली, माळ्यावरची एक लहानशी खोली होती. मेरीच्या देशांतील एक बडा गृहस्थ या सुमाराला पॅरिसमध्यें आला. त्याला ऐकून माहीत होतें कीं, आपल्या देशांतील एक फार हुशार मुलगी पॅरिसमध्यें अभ्यास करीत असते. तिचा पत्ता काढून त्यानें तिला आपल्या बंगल्यावर बोलवून घेतलें; आणि बरीच विचारपूस केली. तिनें अशी एक अडचण सांगितली कीं, प्रयोग करून पाहण्याला पुरेशी जागा नाहीं. तेव्हां तो बडा गृहस्थ म्हणाला, "पेरी क्यूरी नांवाचा एक संशोधक मला माहीत आहे. तो तुला जागा देतो कां पाहू. तूं उद्या पुन्हा ये. मी त्यालाहि बोलावून ठेवतो." दुसऱ्या दिवशीं सगळ्यांची बैठक झाली. पेरी क्यूरीनें मार्जाला जागा देण्याचें पत्करलें. क्यूरीची आणि मार्जाची ओळख झाली.

ही कांहीं कादंबरी नव्हे; तरी पण मार्जा ही फार सुस्वरूप होती, हें सांगितलेंच पाहिजे. पेरी क्यूरी हा तिच्याइतका देखणा नसला, तरी दिसायला साधारण बरा होता. मात्र संशोधनाच्या कामांत त्याची मोठीच प्रगति झालेली होती. शास्त्राभ्यासासाठीं दोघांनाहि पुन्हा पुन्हा एकत्र यावें लागे; आणि मग तो कांहींसा गबाळा दिसणारा माणूस मार्जाच्या तोंडाकडे टक लावून पाहूं लागला. आपण बुद्धिमान् आहों, हें मार्जाला कळून चुकलें होतें; पण पेरीची बुद्धि आपल्याहि पेक्षां जास्त तल्लख आहे, हें तिच्या प्रत्ययाला आलें. विशेष परिचय झाल्यावर, तो एकदा तिच्या घरीं आला. घरांत अठरा विश्वें दारिद्य होतें. तेथें चांगली वस्तु म्हणजे फक्त मार्जा हीच काय ती. बाकीं सारें दैन्यच पसरलेलें होतें. मार्जाला फार लाज वाटली; आणि पेरीला तिची दया आली.

एम्. ए. ची परीक्षा जवळ आली; आणि पेरीला दिसूं लागलें कीं, पदवी घेतल्यावर मार्जा पोलंडमध्यें आपल्या घरीं जाईल. 'तूं जाणार कां?' असें त्यानें तिला मुद्दामच विचारलें, तेव्हां तिनें सांगितलें, "कोणाहि पोलिश माणसानें परदेशांत जाऊन सुखी होऊन राहणें म्हणजे पोलिश मातृभूमीचा द्रोह होय!" यावर पेरीनें असा मुद्दा काढला कीं, "हें खरें असेल; पण एम्. ए. नंतरचा तुझा शास्त्राभ्यास मात्र पोलंडमध्यें एकदम बंद पडेल." हा मुद्दा मार्जालाहि पटला. देशाभिमानापेक्षां शास्त्राभ्यासाची आवड तिच्या मनांत बळावत चालली होती; आणि म्हणून तिनें ठरविलें कीं, एकदा पोलंडमध्यें घरीं जावें, आणि

अभ्यासासाठीं परत पॅरिसला यावें. तिचा हा निर्णय पेरी क्यूरीला अर्थातच फार शहाणपणाचा वाटला.

मार्जा परत आली; आणि तिचा पी.एच. डीचा अभ्यास सुरू झाला. या अभ्यासांत पेरी क्यूरीचें तिला मोठेंच साहाय्य होत असे. क्यूरीच्या मनांत आपल्या संबंधानें कोणची भावना उद्भवली आहे, याची सूक्ष्म वर्दी मार्जाला अर्थातच लागली होती. त्याची ती भावना दिवसेंदिवस बळावत चालली; आणि त्यानें तिला मग प्रत्यक्षच मागणी घातली. मार्जाला निकाल करतां येईना. तिनें हें प्रेम-प्रकरण वर्ष-सहा महिने तसेंच घोळत ठेवलें; कारण फ्रेंच माणसाशीं लग्न करणें म्हणजे मातृभूमीला अंतरणें होय, हें तिला पक्के माहीत होतें. तथापि तिचाहि निश्चय हळू हळू ढासळूं लागला; आणि लौकरच पोलंड देशांतील ही मार्जा आतां मेरी क्यूरी बनली.

दोघेही साधारणपणें गरीबच होतीं; आणि म्हणून त्यांनीं आपला मधुचंद्रमास सायकलवरच्या रपेटीनेंच साजरा केला. मेरीला लवकरच एक मुलगी झाली. पण प्रापंचिकपणाची ही आघाडी जरी दिवसेंदिवस वाढत चालली होती, तरी तिची शास्त्राभ्यासाची आवड यत्किंचितहि कमी झाली नाहीं. सैंपाकपाणी करणें, गृह व्यवस्था ठेवणें, इ० कामांत तिचे रोज तीन तास जात. तेवढे गेल्यानंतर रोज आठ आठ तास ती शास्त्राभ्यासांत आणि संशोधनांत घालवूं लागली. सरावानें आणि वयाबरोबर तिच्या बुद्धीची झेप वाढू लागली. आणि पेरी क्यूरी हा कितीहि बुद्धिमान् असला, तरी त्याला हळू हळू असें दिसूं लागलें कीं, बायकोची बुद्धि आपल्यापेक्षां रतिभर जास्तच चलाख आहे. मेरीला ठराविक वाटेनें जाणें अगदी पसंत नसे; आणि कांहीं तरी एखादा बारीकसारीक शोध लावावा, आणि पीएच. डी. ची पदवी पदरांत पाडून घ्यावी, हेंहि तिला अवमानाचें वाटे. कांहीं तरी निराळें संशोधन करावें, एखादा मोठा शोध लावावा, ज्या भूमीवर कोणाचा पायहि पडला नाहीं, त्या भूमींत शास्त्रशोधाचा हमरस्ता तयार करावा, अशी कांहीं एक चढाईची वासना तिच्या मनांत वाढत चालली होती. हळू हळू अभ्यासाच्या कामीं नवऱ्याच्या तंत्रानें चालणें, तिनें सोडून दिलें. नवऱ्यानेंही पडतें घेतलें; आणि तिच्या तंत्रानें चालून जें काय साह्य तिला करतां येईल, तें तो करूं लागला.

हेन्री बेक्रेल या नांवाच्या एका फ्रेंच शास्त्रज्ञानें प्रसिद्ध केलेलें आपल्या शोधाचें इतिवृत्त एकदां मेरीला वाचावयास सांपडलें. त्यांत असें दिसलें कीं,

हेन्री बेकेल यानें युरेनियम या धातूचे क्षार हा संशोधनाचा विषय बनविलेला आहे. त्याचें संशोधनाचें ध्येय कांहीं निराळेंच होतें; पण त्याला सहजगत्या आढळून आलें कीं, उजेडाचा स्रोत नसतांनासुद्धां युरेनियमच्या क्षारांतून किरण आपोआप बाहेर पडतात. पण हे किरण कसले आहेत, हें मात्र त्याला समजेना. कदाचित् सूर्याचे किरण या क्षारांत जिरलेले असल्यामुळें युरेनियममधून हे किरण बाहेर पडत असावे, म्हणून त्यानें या धातूचे क्षार कित्येक महिने अंधारांत ठेवून पाहिले. तरी किरण पहिल्यासारखेच बाहेर पडतात, असें दिसून आलें. हेन्रीनें ही सारी हकीगत आपल्या इतिवृत्तांत दिली होती. मदाम क्यूरी आणि पेरी या दोघांचेंहि लक्ष या चमत्काराकडे लागून राहिलें; आणि यांतूनच पुढें रेडियमचा शोध जन्मास आला.

युरेनियमच्या क्षारांतून प्रकाश बाहेर पडतो म्हणजे, तरी काय, असा प्रश्न या दोघा पेरींना पडला; आणि पीएच. डी. च्या पदवीसाठीं हाच विषय घ्यावा, असें मेरीनें ठरविलें. शोधतां शोधतां तिला असें दिसलें कीं, युरेनियम जास्त जास्त घ्यावें, तों तों हा प्रकाश अधिक भडक होत जातो, हा प्रकाश मोजतांसुद्धां येतो. आणि युरेनियम दुसऱ्या कोणच्या द्रव्याशीं निगडित झालें असलें, अथवा उजेड व हवामान यांत फरक पडला, तरी त्या प्रकाशांत कसला फरकहि होत नाहीं. जास्त अभ्यासानें कळून आलें कीं, या किरणांसारखे किरण दुसरीकडे कोठेंहि आढळत नाहींत. पुढील टप्पा तिनें गांठला, तो हा कीं, हा प्रकाश म्हणजे एक अणुधर्म असावा. अधिक अभ्यासानें कांहीं दिवसांनीं दिसून आलें कीं, असाच प्रकाश थोरियम या मूलद्रव्यांतूनसुद्धां बाहेर पडत असतो. ज्या पदार्थांत युरेनियम किंवा थोरियम या धातू असतात, ते पदार्थ किरणोत्सर्गी (Radio-active)असतात. इतर पदार्थ Radio-inactive असतात. पुढला बारीकसा शोध म्हणजे युरेनियम किंवा थोरियम या धातूंचें परिमाण जर कमी असलें, तर ही किरणोत्सर्गी क्रिया ( Radio-action ) जास्त भरते ! वीस वेळां तिनें तपासून पाहिलें; आणि मग निश्चय झाला कीं, तपासावयास घेतलेल्या खनिजांत ज्या मानानें युरेनियम किंवा थोरियम आहे, त्या मानानें पाहतां, त्या खनिजांतील रॅडिएशन म्हणजे प्रकाशोद्भव जास्त लकलकीत असतो. हा लकलकीतपणा कोठून येतो, असा प्रश्न पुढें उभा राहिला. तेव्हां तिनें मनाशीं ठरविलें कीं, अजून माहीत नाहीं, असें एखादें मूलद्रव्य या खनिजांत असले पाहिजे. प्रयोग कर-करून परीक्षेसाठीं घेतलेल्या

खनिजांतून बाकीचीं सारीं द्रव्यें बाजूला काढलीं पाहिजेत; आणि काय उरतें तें पाहिलें पाहिजे, असें तिनें ठरविलें. अधिक शोधान्तीं दिसून आलें कीं, जें नवें मूलद्रव्य आहेसें आपल्याला वाटतें, तें फारच थोडें असलें पाहिजे; आणि खनिजाच्या कांहीं टक्क्यांतच हें अपेक्षित द्रव्य असलें पाहिजे. पिच-ब्लेंड तपासतांना दिसलें कीं, हें द्रव्य सर्वभर पसरलेलें नाहीं; व रेडिओ ॲक्टिव्हिटी या खनिजाच्या दोन अवयवांत सांठून राहिलेली आहे. म्हणजे मूलद्रव्यें एक नसून दोन असलीं पाहिजेत. असें तिनें ठरविलें. १८९८ च्या जुलै महिन्यांत यांतलें एक मूलद्रव्य तिच्या हातीं लागलें; आणि त्याचें नांव, आपल्या देशाचें स्मरण म्हणून, तिनें 'पोलोनियम' असें ठेवलें. पण तिला हवें होतें तें द्रव्य मात्र हें नव्हतें. या सर्व कामांत तिच्या नवऱ्याचें काम तिच्या बरोबरीनें चाले. हें द्रव्य फार थोडें सांपडतें, म्हणजे किती थोडें, हें तिच्या लवकरच लक्षांत आलें. पण पिच-ब्लेंडमध्यें हें एक दशलक्षांशाइतकें कमी असतें. कदाचित् कित्येक खंडी पिच-ब्लेंड आतां संशोधनासाठीं हवें होतें. बोहिमियांतील कांचकारखान्याच्या बाहेर याचा ढिगारा पडला होता; तो नांवापुरती किंमत देऊन मेरीनें मागविला; आणि शोधाचें काम सुरू झालें. १८९८ ते १९०२ पर्यंत म्हणजे चार वर्षें त्या दोघांनीं ही कढई ढवळण्याचें काम सारखें चालविलें होतें. शेवटीं नवरा थकून गेला. तथापि बायकोच्या श्रमाकडे बघून तो थोडी थोडी मदत करत असे. होतां होतां पिचब्लेंडमधील बाकींचीं द्रव्यें नष्ट होऊन शुद्ध स्वरूपाचे मणी तयार होऊं लागले; आणि त्यांची तकाकी जास्तच दिसूं लागली. पण बाकीचें सारें रसायन टाकून देऊन या मण्यांचेंच नवें रसायन तिनें चालू केलें. शेवटीं, रेडियमची कल्पना आल्यानंतर पंचेचाळीस महिन्यांनीं, मेरीला प्रत्यक्ष रेडियमचा शोध लागला. अत्यंत शुद्ध स्वरूपाची, एका गुंजेइतकी रेडियम या सगळ्या परिश्रमानंतर तिच्या हातीं लागली. तिनें ते रेडियमचे मणी कांचेच्या पेटींत ठेवले; प्रयोगशाळेंत अंधार केला, तों ती पेटी चकाकूं लागली! नवऱ्याला तिनें आंत बोलावून आणलें; आणि मग ते चमकणारे रेडियमचे मणी पाहून नवराबायको हर्षोत्फुल्ल होऊन गेलीं. १९०४ सालीं या शोधाबद्दल दोघांना नोबेल प्राइज मिळालें. एक नवें मूलद्रव्य पेरींनीं शोधून काढलें होतें.

पुढें तीनच वर्षांनीं पेरी क्यूरी गाडीच्या अपघातानें एकाएकीं मरण पावला. मेरीच्या दुःखाची कल्पना सहज करतां येते. पण तिनें आपलें लक्ष संशो-

धनाकडे जास्त लावले; आणि १९११ सालीं रसायन विषयांतलें नोबेल प्राइज तिनें पुन्हा एकदां मिळविलें. पहिल्या महायुद्धांत रेडियमचा उपयोग इस्पितळांत होत आहे, हें पाहून तिला फार आनंद झाला; आणि मग मादाम पेरीवर मानसन्मान आणि पदव्या यांचा वर्षाव होऊं लागला! दरवेळीं तिला नवऱ्याची आठवण मात्र सारखी होत असे.

या युद्धानंतर पोलंड स्वतंत्र झालें. तेव्हां पेरीला वाटूं लागलें कीं, आपल्या मातृभूमींत एक संशोधन–मंदिर बांधावें; व रेडियमच्या साह्यानें कॅन्सर बरा करण्याची व्यवस्था तेथें करावी. १९२५ सालीं मेरी ही पोलंडला गेली; व या संस्थेची कोनशिला तिनें बसविली. आपल्या देशाची कन्या एवढी सुविख्यात बनून पुन्हा स्वदेशाला परत येत आहे, हें पाहून वार्सा राजधानींतील लोक आनंदानें वेडे झाले. १९२३ सालीं या शोधाचा पंचविसावा वाढदिवस साजरा झाला. तेव्हां फ्रान्स देशांतील झाडून सारे विद्वान्, अधिकारी, प्रतिष्ठित लोक, पत्रकर्ते इत्यादिकांची मोठीच गर्दी जमली; आणि त्यांनीं मेरीचा केवळ जयजयकार केला. परंतु हळूं हळूं तिची प्रकृति खालावत चालली; तिची दृष्टि मंद होत चालली; आणि आपण कशाला तरी विनाकारणच भीत आहों, असें तिला वाटूं लागलें. १९३४ सालीं मेरीला दुखण्यानें गांजले. तिच्या पित्ताशयांत एक गांठ आली आहे, असें दिसून आलें. तिचा बाप याच दुखण्यानें वारला होता. थोडयाच दिवसांत तिचीं फुफ्फुसें सुजलीं; आणि आपलें आतां संपत आलें आहे, असें तिचें तिला स्वच्छ दिसूं लागलें. तिने स्वतः थर्मामीटर लावून पाहिला; पण ताप किती आहे, हें तिच्या ध्यानांतच येईना! ती म्हणाली, 'माझी आठवण नाहींशी होत आहे.' आणि खरोखरच कोणाहि माणसाचें नांव तिला आठवेनासें झालें. स्वतःच्या मुलींचें नांवसुद्धां तिला आठवेना. नेहमींप्रमाणें डॉक्टर आले, तेव्हां ती म्हणाली, 'डॉक्टर, आतां काय पाहतां? पुरें झालें. मला आतां स्वस्थ पडूं द्या!' १९३४ च्या जुलै महिन्याच्या चौथ्या दिनांकीं पहाटेच्या सुमारास मेरी क्यूरीनें आपला देह ठेवला!

रेडियम जशी झळकते, तसें मेरी क्यूरीचें नांव प्रथम संशोधकांत आणि मग साऱ्या जगांत झळकत राहिलें आहे. स्त्रीजात काय करूं शकतें, असें म्हणणारांना मेरी हें एक चूप बसविणारें प्रमाणच जगाच्या हातीं लागलें. स्त्रीजातीची उंची सपाट्यासरशीं वाढली; आणि एकंदर मानव्य तत्त्वशोधनांत कसें पुढें चाललें आहे, हें जगाच्याहि प्रत्ययास आलें.

• • •

हिनेंच अमेरिकेंत पाहिल्यानें स्त्रियांचा कैवार घेतला !

## सुसान बी. अंथनी : १० :

सुसान बी. अंथनी या क्रांतिकारक स्त्रीचा जन्म अमेरिकेंतील मॅसॅच्युसेटस् परगण्यांत १८२० सालीं अदाम्स् येथें झाला. हिचा बाप क्वेकर पंथाचा होता. परंतु स्वतंत्र-मतवाद हें त्याच्या बुद्धीचें मुख्य लक्षण होतें. आपण क्वेकर असलों, तरी खिस्ती धर्माच्या इतर पंथांतील कोणाशीं लग्न करूं नये, हें मत त्याला मान्य नव्हतें. लुसी रीड या नांवाच्या एका बॅप्टिस्ट पंथांतील मुलीशीं यानें लग्न केलें. तेव्हांच्या समजुतीप्रमाणें हीं दोन्हीं माणसें अगदीं पाखंडीं निघालीं. स्वतःला "क्वेकर म्हणवितों आणि बॅप्टिस्ट मुलीशीं लग्न करतों, याचा अर्थ काय ?" असें क्वेकर पंथाचे लोक म्हणूं लागले; आणि चांगली बॅप्टिस्ट पंथांत जन्माला येऊन शेवटीं या पोरीनें एका क्वेकर पंथीयाशीं लग्न करावें, हें पाहून बॅप्टिस्ट लोकांना मोठाच उद्वेग वाटला. लुसी रीड ही मुलगी पहिल्यापासूनच थोडी स्वतंत्र बुद्धीची होती. चांगला नट्टापट्टा करावा, 'तू फार चांगली दिसतेस' असें लोकांनीं आपल्याला म्हणावें, असें या पोरीला लहानपणींच वाटे. सूत काढायला बसली, म्हणजे ती लोकांना ऐकूं जाईलसें गाणें गाऊं लागे; आणि थोडीशीं वयांत आल्यावर तर उभी रात्र ती नाचांत घालवू लागली. गाणें, नाचणें हे तिचे चाळे बरे नव्हेत, असें बालबोध चालीचीं सर्वच खिस्तीं माणसें म्हणूं लागलीं. उपवर मुलीनें अशा तऱ्हेनें वागणें तेव्हाच्या नीतिकल्पनांप्रमाणें अगदीं गैर होतें. त्यांतच जेव्हां या मुलीनें एका क्वेकरपंथीयाशीं लग्न केलें, तेव्हां तर ही मुलगी अगदींच बेताल झाली, आहे असा सर्वांचा अभिप्राय पडला. तथापि लगीन होऊन सासरीं गेल्यानंतर या मुलीनें आपला प्रपंच मोठ्या शहाणपणानें आणि ठाकठिकीनें केला. आठ मुलांचा भोंवतालचा गजबजाट मध्यम स्थितींतहि मोठ्या धैर्यानें संभाळून बाईनें संसाराचा भार हलका करून घेतला. अशा स्वतंत्र विचाराच्या आई बापांच्या घरांतच वाढलेली या चरित्राची 'नायिका' व मग तिनें आईच्यापुढें चार ढांगा जावें हें ओघानेंच आलें.

शाळेंतल्या ' बाईंना ' ही सुसान अगदीं आवरेनाशी झाली. इतर मुली फार मर्यादेनें हळूं बोलत, आणि झाकून-पाकून हिंडत; पण सुसानला मर्यादा कशाशीं खावी हें मुळींच कळत नसे. मुलांच्यासारखी ती फडाफड बोले, आणि स्त्रीजातीचा बिभिस्तपणा टाकून देऊन चारचौघांसमोर बेलाशक हिंडूं लागली. मास्तरीणबाई तिला सारख्या रागें भरीत, बायबलांतले दाखले देत, आणि ' बायकांच्या जातीनें सौम्यपणानें आणि आदबीनेंच वागलें पाहिजे ' असें तिला दरडावून सांगत; पण ही पोरगी अगदीं बेदरकार निघाली ! वर्गात ती मोठमोठ्यानें हंसत असे. बाईंना हें बिलकुल खपेना. त्या म्हणत, ' मुलींची जात; हंसायचें झालें तर थोडें मंजूळ, गालांतल्या गालांत आणि कोणाला ऐकूं न जाईल अशा बेतानेंच मुलींनीं हंसलें पाहिजे. ' पण सुसानचें पहावें तों घसा मोकळा करून ती ' खोखो ' हंसत असे. शाळेंत मुलींना पत्रें आलीं, तर तीं प्रथम बाईंनीं पाहायची अशी चाल असे;किंवा त्यांनीं कोणाला पाठविलीं,तरी तीं बाईंच्या नजरेतून गेली पाहिजेत अशी सक्ति असे. सुसान म्हणे कीं, 'मी इतर कोणाला पत्र लिहिलें, तर तुम्हीं तें पहावें हें बरोबर आहे. पण मी माझ्या बाबांना लिहिलेलें पत्र तुम्ही काय म्हणून पहावें ? मी जर आमच्या घरांतील कांहीं खाजगी बाब लिहिली असली, तर ती तुम्ही काय म्हणून पहावी ? ' अशावरून मास्तरणींशीं तिचीं भांडणें होत, आणि तिला कडक शासनहि होई. एकदां शाळेच्या वसति–गृहांची वार्षिक धोतीपोती सुरू झाली. सगळया मुली झाडावयास लागल्या; आणि त्या आपलें काम बेताबेतानें करीत होत्या. पण या पोरीच्या अंगांत नेहमीं पुंडाईचें वारें भरलेलें असें. शाळेच्या आढ्याला जळमटें लागलीं आहेत असें दिसलें. तीं कशीं काढावीं असा प्रश्न पडला, असें दिसतांच सुसान ही टाणकन् उडी मारून बाईंच्या टेबलावर उभी राहिली. आणि केरसुणीनें वरचें झाडूं लागली. जळमटें निघालीं कीं नाहीं कोणास ठाऊक, पण उडीच्या हबक्यानें बाईंचें टेबल मात्र मोडलें. त्याबरोबर काकूंचा संताप अगदीं अनावर झाला. त्यांनीं शाळेंतल्या साऱ्या मुली एकत्र जमविल्या; आणि या नाठाळ आणि आडदांड मुलीची त्यांच्यापुढें खूप खरड काढली. शेवटीं बायबलांतील एक प्रकरण त्यांनीं वाचून दाखविलें, आणि त्या धार्मिक आवेशानें म्हणाल्या, " पोरी, तूं नरकांत खितपत पडशील. " सुसान आपल्या मनांत म्हणाली, " बरं ! पडलें तर पडलें. माझ्याबरोबर तुम्हींहि साऱ्या जणी तिथेंच असाल. " मास्तरीणबाईंचा आग्रह असा कीं, नीति, सद्गुण आणि विनम्रपणा हे सनातन गुण मुलींनीं

केव्हांहि सोडतां कामा नये; आणि या गुणांच्या व्याख्या अर्थातच बाई स्वतः करीत. खास नीति, सद्‌गुण आणि विनम्रपणा कशाला म्हणावें, आणि चालचलणुकींत थोडासा मोकळेपणा ठेवला तर या साऱ्या गोष्टींना धक्का पोंचतो कीं काय, याचा विचार बाईंनीं कधीं केलेला नव्हता. पूर्वजांनीं घालून दिलेली ओळ आपण तशीच पुढें चालवावी, एवढाच त्यांचा हिशोब असे. अशा या बाईंना सुसान ही मुलगी बेमर्याद वाटावी, हें अगदीं स्वाभाविक होतें.

बापाची घरची गरिबीच होती. तथापि नवराबायको आणि सारीं मुलें मिळून प्रपंचाचा गाडा बऱ्या प्रकारें हाकीत असत. आठ भावंडांतील सुसान ही दुसऱ्या नंबरचें भावंड. अर्थात् तिला धाकट्या भावंडाचेंहि बरेंच करावें लागें. बापाचा धंदा सूत कांतण्याचा होता. आणि घरांत बऱ्याच चात्या फिरत रहात. त्या चालवावयास काहीं बाहेरचीं माणसें रोजंदारीनें येत. पण भाकरीतुकडा यांच्याच घरीं खात. अर्थात् सुसानला आणि तिच्या आईला पुष्कळच काम पडे. प्रसंगाला दहा-दहा, बारा-बारा माणसें जेवावयाची असत. तान्हें पारठें संभाळावयाचें असें. मग करमणूक कुठली ? आणि मोठ्या झालेल्या भावंडांना खेळावयाला तरी सवड कुठली ? शिवणें-टिपणें, भाकऱ्या थापणें, चिरगुटें धुणें, यांत त्यांचा सारा वेळ जाई. एकट्या सुसानला सुद्धा वीस-वीस भाकऱ्या प्रसंगीं भाजाव्या लागत. दमल्या भागल्यानंतर कोठें करमणुकीला जावें, तर बायकांनीं घरांतच कोंडून राहिलें पाहिजे, असा तेव्हांचा शिरस्ता होता. चूल आणि मूल यापलिकडे त्यांनीं फिरकतां कामा नये, हा दंडक जारीनें चालू होता. देवाला दंडवत घालावें आणि तोंडाला खीळ घालावी ही घरगुती नीति होती. अर्थात् सुसानला यातलें काहींहि संमत नव्हतें.

बापाचा सुताचा कारखाना चालावा तसा चालत नसे. म्हणून सुसानला वाटूं लागलें कीं, आपण स्वतः कांहीं कष्ट केले पाहिजेत. तिनें कोठेशीं एक शिकवणी धरली, ती थोडे दिवस चालली. कदाचित् हिचें आणि धन्याचें बनलें नसावें. तिचें बोलणें आणि तिची एकंदर चालचलणूक एरवींच्या बायकांपेक्षां इतकी निराळीं असें, कीं हिच्या हाताखालीं आपलीं पोरें द्यावीं, असें कोणाहि आईबापाला वाटूंच नये. समाजांतले जे कोणीं उडाणटप्पू लोक असतील,आणि म्हणून ज्यांना बाकीचे लोक दूरचे लेखीत असत, त्यांच्याशीं सुद्धां सुसानची मैत्री असे. पुष्कळांनीं तिला सांगून पाहिलें कीं, “ असलें चाळे चालू ठेवलेस, तर चारचौघांत तुला कसलीहि किंमत उरणार नाहीं. ” परंतु सर्व तऱ्हेचा फटिंगपणा हें सुसानच्या मनाचें मुख्य

लक्षण होतें. चालिरीतीला ती वाईट होती असें नव्हें. पण, जिथें जिथें दुसऱ्यांनीं आडवावें हें तिला बिलकुल खपत नसे. तिनें ताडकन् उत्तर दिलें कीं, “ तुम्हीं ज्यांना दूरचे लेखता, त्यांच्याशींच काय पण जे प्रत्यक्ष निग्रो आहेत, आणि म्हणून फारच दूरचे आहेत, त्यांच्याशीसुद्धां माझी मैत्री आहे; आणि त्यांच्याबरोबर मी केव्हां केव्हां चहासुद्धां घेतें ” अजूनसुद्धां निग्रोला कशा तऱ्हेची वागवणूक अमेरिकेंत मिळते, हें आपल्याला माहीत आहे. शें-सवाशें वर्षांपूर्वी तर त्यांच्याशीं यत्किंचितहि सामाजिक संबंध आणणें मोठें पातक समजत असत. अशा वेळीं या तरण्याताठ्या पोरीनें असलीं भ्रांतिष्ट उत्तरें द्यावींत, याचा समाजाला फारच विस्मय वाटूं लागला. खरें म्हटलें म्हणजे तिला या निग्रोंची अतिशय कींव येत असें; आणि कांतडी पांढरी असल्यामुळेंच जे बदमाश समाजांत खुशाल मान वर करून वागत असत, त्यांच्यासंबंधानें तिला पराकाष्ठेचा तिरस्कार वाटे.

तिनें एका शाळेंत नोकरी धरली. तेथें अशा कांहीं पुंड प्रजा जमा होत, कीं पुरुष मास्तरालासुद्धां जीव नकोसा होऊन जाई; मग मास्तरीणकाकूंची दशा काय विचारावी ! तेथें जमा होणाऱ्या पोरी खूप धांगडधिंगा करीत, मस्तवाली करीत, आणि शिक्षकाला कसें पळवून लावतां येईल, याकडेच त्यांचें लक्ष असे. असल्या या शाळेंत सुसाननें नोकरी धरली. या मंडळींनीं थोडीशीं गडबड करतांच पलिकडच्या तरवडाचा एक फोंक तिनें काढून आणला; आणि एकेकीचें पाठाण असें सडकून काढलें, कीं तिला जन्माची आठवण रहावी. एवढें होतांच शाळेंत जिकडे तिकडे चिडीचिप झालें.लोक म्हणूं लागलें कीं,“ मास्तरीण कसली ! हा पैलवानच आहे ! ” पुढें लवकरच सुसान हिला काना जोहारी येथल्या एका मुलींच्या शाळेची प्रिन्सिपल म्हणून नेमण्यांत आलें. बाईचा एकंदर वचक बघून शाळेचा एक विश्वस्त म्हणाला, “ आजपर्यंत असला वचक ठेवणारा मास्तरसुद्धां आम्हांला मिळाला नव्हता, मग मास्तरीण तर लांबच राहो.” लवकरच या गांवांत एक निराळीं लहर उत्पन्न झाली.

गांवांत पुष्कळ गौळवाडे होते. कुणाच्य गोठ्यांत पन्नास गाई, कुणाच्या गोठ्यांत शंभर गाई, असे अनेक गोपाळ तेथें होते. त्यांना वाटूं लागलें कीं, ही आडदांड बाई पोरीसोरींना वचकांत ठेवण्याच्या कामीं खर्ची पडते, हें बरें नव्हे. ती जर कां आपल्या गोठ्यांत आली, तर आपल्याला बायकोहि होईल; आणि हिचे बाहू चांगले भक्कम असल्यामुळें एका सकाळांत ती साऱ्या गाईच्या धाराहि काढील. अशा

हिशेबानें त्या गावंढ्या गांवांतील धूर्तांनीं तिला लग्नाची मागणी घातली ! पण या फटिंग बाईनें उत्तर केलें, " तुमच्याशीं कशाला लग्न करावयाचें ? तुम्हांला हक्काची एक बटिक पाहिजे, एवढेंच ना ? " तिनें त्यांची मागणी फेटाळून लावली. ती म्हणें, " मी चांगली धष्ट–पुष्ट आहे. कुठेंहि चार कष्ट करीन आणि पोटाला मिळवीन. उगाच एकाद्याची बायको बनून त्याचे सारे कष्ट उपशीत बसणें मला नको. मी·आपली एकटी राहीन. "

हळूं हळूं सुसानला वाटूं लागलें कीं, आपण आपल्या हिंमतीनें जरी स्वातंत्र्य मिळविलें, तरी देशांत ज्या लक्षावधि स्त्रिया आहेत, त्यांच्या दास्याचें काय करावयाचें ? त्यांचा वाली कोण ? अमेरिका स्वतंत्र झाली असेल; पण अमेरिकन बायका मात्र अजून दास्यांतच खितपत होत्या. सगळ्या जगांत जें होतें व आहे, तेंच तेव्हां अमेरिकेंत होतें. ' बायका म्हणजे कुठल्या झाडाचा पाला !' अशी अवस्था असे. ' पुरुषांच्या हातांतलें पोतेरें म्हणजे बायका ' अशी तेथली समजूत होती. बायकांना कसलेहि हक्क किंवा अधिकार नव्हते. त्यांचें सारेंच्या सारें जिणें पुरुषांच्या पायाला बांधलेलें असें. पुरुष जी फरपट काढतील, ती मुकाट्यानें सहन करणें, हाच स्त्रीचा धर्म बनला होता. आणि हें सारें कायद्याप्रमाणें होत असे. कायद्याप्रमाणें स्त्री कधीं ' सज्ञान 'च होत नसे. लग्न झालें म्हणजे ती नवऱ्याची मत्ता होऊन बसे; आणि जर ती कुमारीच राहिली, तर तिचा जो पुरुष पालक असेल, त्याच्या हवालीं तिचें जिणें होई. लग्न झालेल्या बाईनें श्रम करून कांहीं मिळविलें, तर ती मिळकत तिनें नवऱ्याच्या हवाली केली पाहिजे, अशी सक्ति असे. तिला कामावर ठेवलेल्या माणसानें जर बुडविलें, आणि तिच्या नवऱ्यानें जर त्या माणसाशीं कांहीं रदबदली करून प्रकरण संपविलें, तर या बाईला कांहीं बोलतां येत नसे. इतकेंच काय तिला कोणी मारलें किंवा भलतें नांव ठेवलें, तर तिला मिळणारी नुकसान–भरपाई नवऱ्याच्या हातीं जावी, असा कायदा होता. अशा प्रकारें तिच्या जीविताचें सारें गांठोडें नवऱ्याच्या काखेला लावलेलें असे. इतकेंच नव्हें तर स्वतःच्या पोरांवर सुद्धां तिची सत्ता नसे. या पोरांची वाटावाट नवऱ्याला हवी तशी लावतां येत असे. ' माझी पोरें तुम्ही लोकांना कां देऊन टाकतां ? ' एवढें सुद्धां बायकोला म्हणतां येत नसे. नवऱ्यानें खुशाल झिंगून पडावें किंवा बदफैलीपणानें वागावें; जर कां काडीमोडीचा प्रसंग आला, तर पोरें मात्र नवऱ्याच्या ताब्यांत जात. घरांतल्या कुत्र्यांना जसें झोडपावयाचें, तसें बायकांना झोडपावें

ही गोष्ट पुरुषांच्या पाठांतली होती. 'नवरा रोज जीव घेतो आहे. मला याच्या जांचांतून सोडवा' अशी आरोळी जरी तिनें सरकारच्या दाराशीं ठोकली, तरी कायदा म्हणे कीं, 'तूं नवऱ्याची बायको आहेस, तुला त्याच्याशींच जमवून घेतलें पाहिजे.' आपल्या भगिनींच्या या दारुण परिस्थितीकडे पाहून सुसान या शूर पोरीचें मन अक्षरशः विदीर्ण होऊन जाई.

सुदैवानें सुसानचा बाप डॅनिअल यालाहि ही स्त्रियांची करुणास्पद स्थिति पाहून अतिशय उद्वेग प्राप्त होत असे. त्याच्या हाताखालीं चात्या फिरविणारे जे कामगार होते, ते आपल्या बायकांना मारहाण करीत आणि बायकांनीं मिळविलेला पैसा गुत्त्यांत किंवा कुंटणखान्यांत खर्च करीत. हें सारें तो प्रत्यक्ष पहात होता. स्वाभाविकच सुसान जेव्हां भडकून बोलूं लागे, तेव्हां तो तिला स्वच्छ सागे कीं, "तूं म्हणतेस तें सारें खरें आहे. तुम्हां स्त्रियांच्या जीविताची पुरुषांनीं आजवर कसलीहि कदर बाळगलेली नाहीं." डॅनिअलला कळून चुकलें होतें कीं, पुरुषांच्या दारुडेपणानें बायकांची केवळ दैना उडून जाते; आणि म्हणून तेव्हां सुरूं झालेली दारुबंदीची चळवळ डॅनिअलनें उचलून धरली 'आज असें झालें, उद्यां तसें झालें,' अशा अनेक कहाण्या जेवावयाच्या वेळीं डॅनिअल सांगत असे. त्या ऐकून सुसानचें माथेंच भडकून गेलें. ती या दारुबंदीच्या चळवळींत आवेशानें पडली. दारूचा प्रसार इतका झाला होता, कीं झिंगून पडणें किंवा प्रसिद्धपणें बाटल्यावर बाटल्या फोडीत राहणें याची कोणालाच शरम वाटेनाशी झाली होती. एका मोठ्या सन्मान्य गृहस्थाला सार्वजनिक मेजवानी झाली, तेव्हां १२०० लोकांना जेवावयास बोलावलें होतें. प्रसंग खरोखर गंभीर होता. पण अशा वेळीं सुद्धां या लोकांनीं दारू प्यावी कां? आणि ती किती प्यावी? बारा दुणें चोवीसशें बाटल्या या लोकांनीं फस्त केल्या! आणि वर ते सांगूं लागले कीं, "ही तर नुसती 'भवानी' आहे!" असल्या लोकांच्या घरांत स्त्रियांच्या जीविताचा कोण कोंडमारा होत असेल, याची कल्पना आपल्याला सहज येते. कोणी असें सांगतात कीं, प्युरिटन् लोकांची चळवळ पार एका टोंकाला गेल्यामुळें, म्हणजे ज्यानें उठावें त्यानें सात्विक आचाराची कड घेऊन बोलावें, असें झाल्यामुळें केवळ प्रतिक्रिया म्हणून समाजांत दारूचा प्रचार अतोनात झाला; आणि शेवटीं कारखान्यांतल्या हमालापासून तो न्यायमंदिरांतील न्यायमूर्तीपर्यंत सर्व माणसें कामाला लागलीं, म्हणजे अर्धवट झिंगलेलीं असत. कारण कोणतेंहि असो, पुरुषांचा समाज बेताल झाला होता, हें कांहीं खोटें नव्हें.

हा प्रकार दुःसह होऊन सुसान अंथनी या दारूच्या चळवळींत पडली. स्त्रियांना मतांचा अधिकार असावा, या चळवळीची तिला अजून कल्पनाहि आली नव्हती. ज्या क्वेकर पंथांत ती जन्माला आलेली होती, तो पंथ मताधिकार आणि मतदान यांची केवळ थट्टाच करीत असे. याचा अर्थ असा कीं, स्त्रियांचें गाऱ्हाणें सरकारच्या दारीं नेऊन पोंचविण्याचें खरें साधन जें मताधिकार, त्याचा साक्षात्कार सुसानला अजून झालेलाच नव्हता. पण हा प्रसंग लवकरच घडून आला. दारूची मोहिम सुरू झाल्यावर ती एके दिवशी सभेंत बोलावयास उभी राहिली. सभेचा अध्यक्ष तिला एकदम म्हणाला, "बाई, तुम्ही गप्प बसा; बायकांनीं केवळ ऐकावें आणि शिकावें; त्यांनीं सभेंत बिलकुल बोलतां उपयोगाचें नाहीं." अध्यक्षमहाशयांची हीं हरकत पहातांच सुसान अगदीं बेभान होऊन गेली, आणि सभेंतून बाहेर पडली. ती म्हणाली, "बायकांना सभेंत बोलण्याचा सुद्धां हक्क नाहीं काय? मग मला आतां हक्कासाठींच झगडलें पाहिजे." १८२० सालीं दारूच्या चळवळींतून बाहेर पडून सुसान ही स्त्रियांच्या हक्कासाठीं झगडूं लागली.

या कामांत एलिझाबेथ कॅडी स्टॅण्डन आणि अर्नेस्टाईन रोझ या दोन बाया आधींच पडलेल्या होत्या. सुसानहि त्यांना जाऊन मिळाली. वास्तविक पाहतां, सामाजिकरीत्या या तिघींच्यांत कसलेंच साधर्म्य नव्हतें. एलिझाबेथ स्टॅण्डनचा नवरा एक बडा श्रीमान् वकील होता. रोझहि युरोपांतून अमेरिकेंत आलेल्या एका ज्यूची मुलगी होती; आणि सुसान ही एका गरीब क्वेकरची मुलगी होती. पण स्त्रियांच्या हक्कासाठीं चळवळ करणें या कामांत तिघी एक झाल्या. पहिल्या दोघींना सभा गाजविण्याचें चांगले साधलेलें होतें. त्या लिहिण्यांतहि चांगल्या पटाईत होत्या. सुसानला चांगलें लिहितांहि येत नसे व चांगलें बोलतांहि येत नसे; पण संघटनेच्या कामांत मात्र तिनें चांगलेंच कौशल्य प्रकट केलें. या त्रयीनें देशांत मोठीच धूम सुरू केली. ठिकठिकाणीं जाऊन सभा करणें, गांवोगांवच्या बायकांची उठावणी करून देणें आणि जमेल तेथें तेथें पुरुषांच्या अन्यायाचा परिस्फोट करणें हा उद्योग त्यांनीं चालू केला.

वृत्तपत्रांनीं त्यांची पहिल्यानें उपेक्षाच केली. 'यांची टवाळी आम्ही पत्रांत छापावी तर ती वाचणार कोण?' असें संपादक म्हणत! लवकरच या चळवळीला एवढा जोर चढला, कीं संपादकांना आपलें मत बोलून दाखवावें लागलें. स्त्रियांच्या हक्काची ते टवाळीं करूं लागले. 'न्यूयॉर्क हेरल्ड' या पत्राच्या संपादकानें लिहिलें,

" या बायकांना हवें आहे तरी काय ? पुरुषांच्या साऱ्या जागा त्यांना हव्या आहेत काय ? वकील, डॉक्टर, जहाजांचे तांडेल आणि फौजांचें सेनापति आपण व्हावें असें त्यांना वाटतें काय ? एकाद्या वकिलीणबाई पक्षकाराची बाजू कोर्टांत मांडीत असतांना, दिवस भरलेलें असल्यामुळें त्यांच्या जर पोटांत दुखूं लागलें, तर मग काय करावयाचें ? किंवा यांची एकादी धर्मोपदेशक बनलेली बाई पीठावरून उपदेश करतां करतां जर कां तिला प्रसूतीच्या कळा येऊं लागल्या, तर काय करावयाचें ! किंवा एकाद्या डॉक्टरीणबाई एकाद्या पुरुषाचें भगंदर बुजवीत असतांना त्यांनाच जर सुईणीला बोलावणें पाठवावें लागलें, आणि तेथेंच त्याना जुळें झालें, तर काय करावयाचें ! " असली चटोर टीका वृत्तपत्रें करूं लागलीं. परंतु या तिघींनीं त्यांना दाद दिली नाहीं. पुरुषांचा जाचच स्त्रियांना इतका तापदायक होता, कीं या बोलतात तें खरें आहे असें अमेरिकेंतील स्त्रीवर्गाला वाटूं लागलें; आणि कांहीं पुरुषहि त्या बाजूला वळले.

सुसान इत्यादि बाया बेलाशक सांगूं लागल्या कीं, " महिनोन्महिनें झिंगून पडणाऱ्या नवऱ्यांच्या बायकांना घटस्पोट मिळालाच पाहिजे; पोरबंदीची सवलत तरी त्यांना मिळाली पाहिजे." हे त्यांचें बोलणें ऐकतांच स्टार नांवाच्या पत्रानें लिहिलें, " या बायांचे हे उद्गार ऐकून नरकपुरींतल्या सैतानाच्या दूतांच्या अंगावरसुद्धां शहारे येतील." ज्यांना मनांतून थोडी सहानुभूति होती, ते सुद्धां या बायांचें हे फाडफाड बोलणे ऐकून अगदीं स्तंभित होऊन गेले. एक पत्रकर्ता म्हणाला, " बाईचें आजचें भाषण मोठें नामांकित झालें. पण माझ्या बायकोनें किंवा मुलीनें जर कां असलें भाषण केलें, तर मी त्यांना सांगेन कीं, तुम्ही मेलेल्या बऱ्या; पण तुमच्या तोंडून असले शब्द ऐकायचास नकोत."

होतां होतां ही चळवळ कायदेमंडळाच्या दाराशीं येऊन ठेपली. स्त्रियांना हक्क मिळाले पाहिजेत, असा अर्ज न्यूयॉर्क येथील कायदेमंडळांत सुसान हिनें आणून गुदरला. तो वाचून राजकारणी लोक अगदीं भडकून गेले. बर्ने हा पुढारी म्हणाला, " या अर्जांत लिहिलेले हक्क म्हणजे काय आहे ? हा सारा मूर्खपणा आहे !! बेशरमपणा आहे !! हा गुन्हाच आहे !!! याला आम्ही थोडीतरी संमति द्यावी असें वाटतें काय ? अर्जदार म्हणतात कीं, स्त्री-पुरुषांचे हक्क समसमान असावेत. यांच्या जिव्हेला कांहीं हाड आहे काय ? परमेश्वरानें पहिल्यानें पुरुष उत्पन्न केला आणि मग त्याच्या बरगडींतील एक फांसळी काढून त्यानें तिची स्त्री बनविली. म्हणजे मस्तक हे

पुरुषांचेंच राहणार. बायका या पुरुषाच्या हाडामांसांतून निघालेल्या म्हणून; त्या त्यांच्या दुय्यमच राहिल्या पाहिजेत. बायबलांतील ही योजना जर बायकांना पटत नसेल, तर आमची अब्रू संभाळण्यासाठीं त्यांना कड्याकुलुपांत कोंडून ठेवणें हेंच आम्हांला प्राप्त आहे." परंतु सुसान आणि तिच्या मैत्रिणी यांनीं हेंहि जुमानलें नाहीं. मोहीम अखंड चालू ठेवून त्यांनीं या पुरुषांचें डोकेंच उठविलें.

हळू हळू समाजांतील प्रतिष्ठित आणि बुद्धिमान स्त्रिया या चळवळीच्या पाठी- राख्या बनल्या. आघाडीला असलेल्या सुसान सारख्या स्त्रिया म्हणूं लागल्या कीं, "या सुस्तावलेल्या आणि ऐदी पुरुषांना जोराचे धक्के दिल्याशिवाय हे कधीं जागे होणार नाहीत. चळवळीचा डंका जोरानें गाजावयास हवा. असले रट्टेच यांना दिले पाहिजेत." हें व्हावें म्हणून या बायांनीं आपलें केंस कापून घेतले; आणि त्या गांवांतून बेधडक हिंडूं लागल्या. अंगांत पैरणी घालून त्या सभांना जाऊं लागल्या. पुरुष म्हणाले, "आतां मात्र शर्थ झाली! या बायांना काय वेड लागलें आहे काय? यांनीं चोळ्या टाकल्या, लुगडीं टाकलीं, या विजारी आणि कुडती घालून सैरावैरा धांवत सुटल्या आहेत, याला म्हणावें तरी काय?" सुसानला वगैरे यांतला अतिरेक कळत नव्हता असें नाहीं. पण पुरुषांना धक्के द्यावयास असलेंच कांहीं तरी मुलखानिराळें केलें पाहिजे, असें त्यांना वाटत होतें. पुरुषांना गांगर- वून सोडल्यावर त्यांनीं आपलें बायकांचे वेष पुन्हां अंगावर घातले. परंतु वेष ताळ्यावर आले, तरी त्यांनीं आपली चळवळ मात्र बिलकुल थांबविली नाहीं.

स्त्रियांच्या हक्काच्या घोषणा या तिन्ही बायांनीं साऱ्या देशभर उमटविल्या. होतां होतां शेवटीं स्टॅण्डन आणि रोझ या दमून गेल्या; त्यांच्यानें प्रचाराचें काम होईनासें झालें, आणि सर्व भार एकट्या सुसानवरच पडला. परंतु प्रकृतीनें ही अतिशय खंबीर असल्यानें तिनें हा भार कित्येक वर्षेंपर्यंत लीलेनें उचलला. प्रचाराच्या कामीं गांवन् गांव टिपावें असें तिला वाटे. जसें एखादें झपाटलेलें माणूस धांवत पळत सुटतें, तशी ही सुसान एका ध्येयानें वेडी होऊन साऱ्या देश- भर भ्रमन्ती करीत राहिली. संवयीनें तिला आतां उत्तम बोलतां येऊं लागलें. तिच्या विरोधकांना आतां तिचा जीवितहेतु बरोबर कळून आला. तिच्या बोल- ण्यांत कांहीं खरें मर्म आहे, हें सर्वांनाच पटून आलें. सुसाननें संग्रह असा कांहीं केलाच नाहीं. ही कुमारी संन्यासिनी ध्येयासाठीं वेडी होऊन आमरण दरिद्रीच राहिली. या तिच्या तपश्चर्येचा योग्य तो परिणाम अमेरिकेंत होऊं लागला. तिनें

आपल्या कामाला १८५२ सालीं सुरुवात केली; आाण पुढें १३ वर्षांत अमेरिकेंत एवढें मतान्तर झालें, कीं स्त्रियांना उच्च शिक्षण मिळावें, म्हणून वसार येथें एक मोठें कॉलेज सुरू झालें. पुढील दहा वर्षांत दहा सरकारी युनिव्हर्सिट्यांनीं स्त्रियांच्या शिक्षणाची आणि सहशिक्षणाची व्यवस्था करून टाकली. १८८० पर्यंत मुलांना आणि मुलींना एकत्र शिक्षण देणाऱ्या कॉलेजांची संख्या १५४ पर्यंत गेली. हें सारें सुसानच्या प्रचाराचें फळ होय. जेव्हां ती कामाला लागली, तेव्हां कांहीं थोड्याशाच बायांना शाळांत मास्तरणीचीं कामें मिळालीं होतीं. पण पुढील पन्नास वर्षांत म्हणजे १९०० पर्यंत काय चमत्कार घडून आला, तो पहा. एकंदर शाळांतील सर्व शिक्षकांपैकीं ६६ टक्के शिक्षक म्हणजे मास्तरणी झाल्या! शिकलेल्या बायका निरनिराळ्या उच्च प्रकारच्या धद्यांत भरपूर शिरूं लागल्या; आणि यांतूनच अमेरिकन स्त्रीचें दास्यविमोचन झालें असें म्हटलें पाहिजे. गेल्या शतकाच्या शेवटीं शेवटीं विवाहित स्त्रियांवर असलेलीं गुलामगिरीचीं बंधनें कायद्यानें पटापट तोडून टाकलीं. त्यांनीं धन मिळवावें, स्वतःचें म्हणून ठेवावें, कोणतेहि सांपत्तिक व्यवहार स्वतःचे म्हणून करावे, अशी मुभा त्यांना मिळाली. लग्न म्हणजे बटिकपणा ही व्याख्या गेली; आणि बरोबरीच्या नात्याचा करार, असें रूप त्याला प्राप्त झालें. स्त्रीजातीची ही प्रगति पाहून वृद्ध होत चाललेल्या सुसानला पराकाष्ठेचा आनंद होत चालला.

तिचें आतां वयहि झालें; आणि श्रमाश्रमानें तिच्या अंगाची बळकट कांठीसुद्धां काहींशी वाकू लागली. या वृद्धावस्थेंत तिनें एकदां युरोपचीं फेरी केली. जेथें जावें तेथें स्त्रियांच्या उद्धाराचा संदेश तिनें सर्व लोकांना दिला. जर्मनींत असतांना विशेष कडक मजकुराचीं पत्रें तिनें आपल्या घरीं लिहिलीं. परंतु तेव्हांचें जर्मन सरकार असलीं पत्रें पोस्टांतून पुढें जाऊ देईना. युरोपचा दौरा आवरून सुसानबाई अमेरिकेला परत आल्या. आतां त्यांचें वय शहाऐंशी वर्षांचें झालें होतें. तथापि त्यांचा कामाचा ठोका चालूच होता. सुमारें पन्नास वर्षेपर्यंत सुसानबाई स्त्री-चळवळीच्या आघाडीवर होत्या, चळवळीसाठीं त्यांनीं लक्षावधि डॉलर्सचे फंड उभे केले. परंतु स्वतःला अन्नवस्त्रापलिकडे कांहीं घेतलें नाहीं. तिच्या या तपस्येमुळें अमेरिकेच्या महान् कर्त्या माणसांत तिची गणना होऊं लागली. पण मतदानाचा हक्क मात्र ती जिवंत असतांना बायकांना मिळाला नाहीं ती वारल्यानंतर चौदा वर्षांनीं म्हणजे १९२० सालीं हा हक्क अमेरिकेंतील स्त्रियांना मिळाला.

या वृद्ध स्त्रीचा वाढदिवस साजरा करावयाचा, असें लोकांनीं ठरविलें. तिला आधींच अर्धांगाचा झटका आलेला होता. डॉक्टरनें सांगावें, "बाई, तुम्ही आतां पडून रहा." पण सुसानबाई हंसून म्हणें, "हें पहा, घण डोक्यांत पडावयाचाच असला, तर मी पायावर उभी असतांनाच पडूं दे." आणि शेवटीं तसेंच झालें. ठरल्याप्रमाणें वाढदिवसाच्या मेजवानीला सुसानबाई गेल्या. जेवण झाल्यावर नेहमीं-प्रमाणें त्यांनीं एक अतिशय जोरदार भाषण केलें. शेवटीं त्या म्हणाल्या, "मला तुमच्यांकडून स्तुतीचा शब्द नको, मला तुमच्याकडून न्याय पाहिजे. माझ्या कामांत मी अपयश कधीं घेणारच नाहीं." व्याख्यान आटोपून त्या घरीं आल्या. त्यांना पुन्हां एक झटका आला; आणि स्त्रीजातीचा कैवार घेउन उठलेल्या या विजे-सारख्या तळपणाऱ्या बाईचा अंत झाला.

• • •

## ही भुकेली तरुणी भुकेल्यांची पोशिंदी बनली !

# इव्हा पेरॉन : ११ :

या प्रकरणांत इव्हा पेरॉन या अर्जेंटाईनमधील महाकर्तबगार स्त्रीची हकीगत द्याव-याची आहे, दक्षिण अमेरिकेंत अर्जेंटिना नांवाचा, दक्षिणेकडे निमुळता होत गेलेला एक विस्तीर्ण देश आहे. सारीच दक्षिण अमेरिका पूर्वी स्पेनच्या ताब्यांत होती. तीनशे वर्षेंपर्यंत या प्रदेशावर स्पेनचा अंमल अबाधित राहिला होता. हळूं हळूं तो खालावत चालला; आणि त्या त्या ठिकाणच्या लोकांनीं आपलीं स्वतंत्र राष्ट्रें बनविलीं. या राष्ट्रांपैकींच अर्जेंटिना हें एक राष्ट्र आहे.

जॉन पेरॉन हा या प्रजासत्ताक राज्याचा अधिपति होता; व ज्या स्त्रीचें चरित्र पुढें दिलेलें आहे, ती इव्हा त्याची पत्नी होती. या पराक्रमी इव्हाचें चरित्र नीट समजून घ्याययाचें, तर जॉन पेरॉन याचाहि थोडासा इतिहास कळावयासच हवा.

जॉनचा बाप कोर्टातला साधा बेलिफ होता. अर्जेंटिनाच्या दक्षिण प्रदेशाला पंपास हें नांव आहे. हा प्रदेश उजाड असला तरी चांगला सुपीक आहे. यांतीलच एका खेड्यांत जॉनचें बालपण गेलें. १६ वर्षांच्या वयाला त्याचा लष्करी शाळेंत प्रवेश झाला. तलवारीचे हात करण्यांत आणि बंदुकीचा नेम मारण्यांत जॉन पहिला येऊं लागला. दुसरें महायुद्ध सुरू झालें, तेव्हां एका मुत्सद्याच्या दिमतींत त्याला रोम येथें जावें लागलें. तेथें तो मुसोलिनीचा मोठा चहाता बनला. त्याचें सामाजिक आणि आर्थिक तत्त्वज्ञान त्याला पटूं लागलें. आल्प्स पर्वतांत कवाईत करणाऱ्या इटालियन फौजांबरोबर तो हिंडूं लागला; आणि आपल्या राजवाड्याच्या सज्जांतून जेव्हां मुसोलिनी गर्जना करी, तेव्हां ती कान भरून ऐकण्यांत तो दंग होऊन जाऊं लागला.

इटलींतून परत आल्यावर आपल्या लोकांचें आत्मिक बळ वाढवलें पाहिजे, असें ठरवून त्यानें एक संस्था स्थापन केली. लष्करांत थोडीशी वरची जागा मिळतांच त्यानें आपल्या वर्गीचे लोक शेलक्या ठिकाणीं नेमून टाकले. वरील

अधिकाऱ्याच्या हें ध्यानांत येऊन चुकलें; म्हणून 'तूं राजिनामा दे' असा हुकूम त्यानें त्याला धाडला. आज्ञापत्र आणणाऱ्या शिपायाला त्यानें सांगितलें कीं, "हा हुकूम धाडणाऱ्या त्या गाढव अधिकाऱ्याला सांग कीं, जीव गेला तरी बेहत्तर पण माझ्या पदावरून मी हलणार नाहीं." पण येवढा जबाब देऊनच तो थांबला नाहीं. त्याच्या संस्थेंतील सदस्यांची संख्या आतांपर्यंत कित्येक शतकांवर गेली होती. आणि हे सारे सदस्य त्याच्या अर्ध्या वचनांत असत. यांतल्या सहा जणांना पेरॉन यानें आपल्या वरिष्ठाकडे पाठवलें. हातांत बंदूक घेऊन या सहा जणांनीं त्या वरिष्ठाला त्याच्याच कचेरींत घेरा दिला; आणि 'तूंच राजिनामा दे; नाहींतर मेलास म्हणून समज,' असें त्याला दरडावून सांगितलें. त्या सेनापतीनें गांगरून जाऊन राजिनामा दिला; आणि जॉन पेरॉन म्हणजे लष्करांतील एक बडी आसामी होऊन बसली.

पण जॉन याचें खरें लक्ष लष्कराकडे नव्हतें. देशांतील कामगार लोक अर्धपोटी रहातात, हें त्याला मुळींच सहन होईना. त्यानें ताबडतोब कामगार--संघ स्थापन केले, अधिकाराचा बडेजाव बाजूला ठेऊन त्यांच्याशीं तो समत्वाच्या नात्यानें वागूं लागला. सरकारदरबारीं ज्यांना कांहीं विशेष महत्त्व होतें, त्यांनाच वश करून घेऊन त्यानें या लोकांना कामगार संघाचे पुढारी नेमले.

जॉन यानें मुसोलिनीचें जवळ जवळ अनुकरणच केलें; मात्र या अनुकरणांत तो फार सावधगिरीनें वागला. तो एकदां म्हणाला, "मुसोलिनी हा या शतकांतला सर्वांत मोठा पुरुष होय. पण त्याच्या हातून फार मोठाले प्रमाद घडले. हे प्रमाद माझ्या हातून घडूं नयेत, अशी दक्षता मी ठेवतों." मुसोलिनीची राज्यरचनेचीं सर्व तत्त्वें जॉन यानें अंमलांत आणलीं, आणि सत्ता हस्तगत केली; मात्र प्रतिपक्षाचे खून पाडणें आणि आपल्या कर्तृत्वाची भलतीच घमेंड बाळगणें हे प्रकार त्यानें केले नाहीत.

१९४५ मध्यें पेरॉन यानें ठरविलें कीं, अध्यक्षाच्या जागेसाठीं आतां उभें रहावयाचें; याच वेळीं दुसरें महायुद्ध संपलें; आणि लोकशाहीचा डंका जगभर झडूं लागला. अर्जेंटिनामध्येंहि लोक घसा फोडून 'लोकशाही, लोकशाही' म्हणून ओरडूं लागले. पेरॉन यानें हें बंड मोडण्यासाठीं हजार लोकांना कैद केलें. प्रेसिडेंट फॅरेल याला त्याचें हें कृत्य बिलकुल पसंत नव्हतें. म्हणून त्यानें पेरॉनला

कैद केले, आणि एका बेटावर नेऊन ठेवलें. लोकांना वाटलें कीं, पेरॉनचा अवतार संपला.

एक गोष्ट ध्यानांत हवी कीं, पेरॉन हा कामगारांचा पुढारी झालेला होता, आणि सत्तासंपादनासाठीं त्यानें कांहीं जरी केलें, तरी हे लक्षावधि कामगार लोक त्याला सोडावयास बिलकुल कबूल नव्हते. याच वेळीं दुसरा एक चमत्कार घडून आला, आणि त्या चमत्कारानें इव्हा या कुमारिकेचें नांव अर्जेंटिनाभर दुमदुमूं लागलें. आणि जॉन पेरॉन याचें चरित्रच बदलून गेलें.

इव्हा द्वारटी हिचे आईबाप अगदीं गरीब होते. उपासमारीला कंटाळून पोर घरांतून पळाली; आणि ब्यूनो आयरिस या राजधानीच्या गांवीं येऊन नटीचा धंदा करूं लागली. अर्थातच हॉटेलांत जमा होणारी खाबू मंडळी तिच्याभोंवतीं घोटाळूं लागली; आणि कांहींनीं तिची मैत्रीहि संपादन केली. इव्हा ही सुमारें साडे पांच फूट उंच असून थोडी ठाकठिकीनें वागणारी आणि कांहींशीं रंगेल दिसत असे. एके दिवशीं एका खान्याच्या वेळेला आपल्या कर्नल पेरॉनची आणि तिची गांठ पडली. या वेळेपर्यंत तो युद्धमंत्रिमंडळांत दाखल झालेला होता. या दोघांचें तारा मैत्रकच झालें; पेरॉन तिच्यापेक्षां पुष्कळच मोठा होता, पण त्याची पहिली बायको मेली होती. या विधुराचें आणि इव्हाचें प्रेम जमलें; आणि पेरॉन याला सर्व तऱ्हेची मदत आपण केली पाहिजे, असें या पोरीनें ठरविलें.

कामगार लोकांविषयीं पेरॉन याचा जीव जसा तिळतिळ तुटे, तसाच इव्हाचाही तुटत असे. ‘ दुसरे कोणी श्रीमंत असले तर असले, पण गरीब लोकांचे हाल होतात, हें मात्र मला पहावत नाहीं,’ असें ती म्हणे. अर्थात् गरिबांची कड घेणारा पेरॉन हा कैदेंत पडलेला पाहून इव्हानें त्याला सोडवून आणण्याची युक्ति योजली. पेरॉन हा तुरुंगांत असतांना त्याच्या छातींत दुखूं लागलें. परीक्षा करण्यासाठीं राजधानीच्या लष्करी इस्पितळांत त्याला आणण्यांत आलें. इव्हाला वाटलें कीं, पेरॉनला सोडवण्याची ही फार नामी संधि आहे. कामगार मंडळांपुढें ती जोरजोरानें म्हणूं लागली कीं, “ तुमचा पुढारी कारागृहांत पिचत आहे, आणि तुम्हीं स्वतःला त्याचे अनुयायी म्हणवितां ! त्याच्यासाठीं तुम्ही काय करणार आहां ? ” आपली गर्दन फुगवून प्रत्येक कामगार ओरडला. “ बाई, तूं म्हणशील तें आम्ही करूं. ” मग दुसऱ्या दिवशीं पन्नास हजार कामगारांचा मोर्चा बरोबर घेऊन इव्हा इस्पितळावर चाल करून गेली. इस्पितळापासून राजवाड्यापर्यंत ‘ पे-रॉ-न, पे-रॉ-न ’

अशा गर्जना चलू होत्या. पोलिस गप्प उभे राहिले, आणि लष्करचे शिपाई टकमकां बघतच राहिले. काय होत आहे, हेंच त्यांना कळेना. या पन्नास हजार कामगारांनीं संध्याकाळपर्यंत सारें शहर ताब्यांत घेतलें. आणि इस्पितळांतून बाहेर काढून पेरॉन याला त्यांनीं मोटारींत बसवून जंगी मिरवणूक काढली. मिरवणूक राजवाड्याकडे गेली. अध्यक्ष फॅरेल यांनी चांगलेंच प्रसंगावधान दाखवलें. आपण कैदेंत टाकलेला माणूस लोकांचा एवढा आवडता आहे हें पाहून, त्यांनीं त्याला राजवाडयाच्या सज्जांत बोलवून घेतलें. त्याची लोकप्रियता न पाहवणाऱ्या एका पत्रानें आपल्या जादा अंकात म्हटलें कीं, "फाटकीं कुडतीं घातलेले देशभक्त साऱ्या सडकांवरून हिंडत आहेत." पेरॉन यानें त्या पत्राचे तेच शब्द उचलले आणि सज्जावर बसवलेल्या ध्वनिक्षेपकांत तो गरजला, "हो! हो! हे कुडतीं नसलेले लोक देशभक्तच आहेत; आणि याच गरीब लोकांना मी उराशीं कवटाळून घेणार आहे." हे त्याचे शब्द ऐकतांच पटांगणावर पसरलेला तो लोकसमुदाय त्याच्या नांवाचा जयजयकार करूं लागला; आणि 'अर्जेंटिनाचा खरा लोकनायक पेरॉन होय,' हें ठरून गेलें. पण ही डांबर-बत्ती कोणी शिलगावली होती? ती इव्हा द्वारटीनें शिलगावलेली होती. अर्थात् तिच्या सौंदर्याच्या जोडीला हें तिचें अचाट कर्तृत्व पाहून पेरॉन तिच्यावर केवळ लुब्ध होऊन गेला. चारच दिवसांनीं पुढें इव्हा आणि जॉन यांचें लग्न झालें.

इव्हा द्वारटी हिच्याकडे पाहून वरिष्ठ अधिकारी नाकें मुरडत; कारण तिची जन्मकथा अशीतशीच होती. तिला स्वतःला याची जाणीव असल्यामुळें या आपत्तींतून बाहेर पडण्याचे मोठे चमत्कारिक इलाज तिनें केले. ही आपत्ति नसती तरी पुढें केलेलीं कृत्यें तिनें केलीं नसतीं, असें मात्र म्हणतां येत नाहीं. लग्न न झालेल्या एका गरीब जोडप्याची ती पोर होती. गरिबीचा दंश तिच्या मनाला इतका कडकडून झालेला होता, कीं त्या स्थितींतून बाहेर पडण्याची तिनें शिकस्त केली. ती नाटक-सिनेमांत शिरली. तेव्हां तिचा महिन्याचा पगार सुमारें दोनशे रुपये होता; परंतु तिच्या गुणांच्या बळावर हा पगार थोड्याच अवधींत बत्तीस हजार रुपयां पर्यंत वाढला. मिळूं लागलेल्या या संपत्तीचा उपयोग या बांईनें कसा केला, हें पाहण्यासारखें आहे. आपलें लग्न एका मोठ्या माणसाशीं झालेलें आहे, या विचारांतच ती दंग होऊन राहिली नाहीं. शहरांतल्या सगळ्या गरीब लोकांना सुखी कसें करतां येईल, याचें चिंतन ती करूं लागली. आणि पदरचे पंचवीस हजार रुपये घालून कामकऱ्यांना,

मजुरांना आणि कोणाहि गरिबांना साहाय्य करणारी संस्था तिनें सुरू केली. गरीब लोकांच्या सहानुभूतीचा लोंढा तिच्याकडे जोरानें वाहूं लागला; आणि पेरॉन हा अध्यक्षपदासाठीं उभा राहिला असतां या लोंढ्याच्या जोरावर तो निवडून आला. बायकोच्या या कर्तबगारीची जाणीव पेरॉनला कायमची राहिली.

मजूर खातें पेरॉननें इव्हाच्या हवाली केलें; आणि मग या बाईच्या कामाचा झपाटा काय आहे, हें लोकांच्या ध्यानीं आलें. त्यांना वाटलें कीं, नवऱ्याचा पदर धरून ही राज्यकारभारांत शिरली आहे; पण तिचा निग्रह, तिचें राजकारणाचें उपजत ज्ञान आणि कसल्याहि प्रसंगाला निर्भयपणें तोंड देण्याची तिची तयारी हीं पाहून ते थक्क झाले. रोज शेकडों लोकांच्या मुलाखती होऊं लागल्या. येवढ्या विस्तीर्ण देशांत जेथें कोठें मजुरांच्या सभा भरत, तेथें ती भाषणासाठीं जाऊं लागली. नवऱ्यानें काढलेल्या संस्थेचें पुढारीपणहि तिनें आपल्याकडेच घेतलें; आणि या सर्व लोकांच्या तक्रारी तिनें भराभर मिटवून टाकल्या. रेल्वेंतील कामगारांनीं पगारांत चाळीस टक्के वाढ मागितली. तेव्हां ती त्यांना म्हणाली, "तुम्ही वेडे आहांत; तुम्हांला पन्नास टक्के वाढ मिळाली पाहिजे!" इतके बोलून तिनें पन्नास टक्के वाढ दिलीहि! चाळीस टक्के वाढ पदरांत पडावयास हवी असली, तर निदान सत्तर टक्के मागावी, अशा हिशेबानें टेलिफोन–कामगारांनीं आपला मागणीचा अर्ज तिच्यापुढें टाकला. तिनें सत्तर टक्के वाढ देऊन टाकली! 'आपणां गरिबांचा पक्ष घेणारी ही देवताच राजवाड्यांत अवतरलेली आहे' असें कामगारांना वाटूं लागावें, यांत काय आश्चर्य आहे! पण ती एवढ्यावरच थांबली नाहीं.

खुद्द मजूरांचे पुढारी, उद्योगधंद्याचे पुढारी आणि प्रत्यक्ष सरकार यांना ठोसठोसून पैसा जमा करण्याचें काम तिनें सुरू केलें; आणि हा निधि तिनें वर्षाला दहा कोटी डॉलर येईल, येवढा मोठा केला! इतका पैसा हातीं येऊं लागल्यावर इव्हानें वृद्ध लोकांच्यासाठीं एक भला मोठा आश्रम बांधला; कामकरी मुलींच्यासाठी एक मोठें झोंकबाज विश्राम–मंदिर बांधलें; आणि मुलांच्यासाठीं तर एक मोठें गंमतीदार खेडेंच तिनें वसविलें. यांत प्रत्येक ठिकाणीं अद्ययावत् पद्धतीच्या सर्व सुखसोयी तिनें केल्या. मदत मिळाली नाहीं, असा कोणीहि याचक तिच्या अंगणांतून परत जाईना.

पैसा कसा खर्च करावा आणि कोणाला किती द्यावा, हे सारें तिच्या मर्जीप्रमाणें होई. गरजू माणसांना उद्योग गांठून देण्यासाठीं अनेक मकाणें तिनें ठिक-

ठिकाणीं घातलीं. बेवारशीं पोरांना संभाळण्यासाठीं गृहें सुरूं केलीं; शाळा, कॉलेजें, दवाखाने यांना तर चलनी नोटा ती पुडक्यावारी देऊं लागली. सहानुभूति, दुःख-परिहार, प्रपंच-विवंचनेचा निरास, वार्धक्याची सोय, दुखणाइतांना औषधोपचार अशा सर्व कामांसाठीं इव्हा सढळ हातानें खर्च करूं लागली. अर्थात् जे लोक आतांपर्यंत केवळ 'पेरॉन, पेरॉन' म्हणून ओरडत होते, ते 'पेरॉन-इव्हा' असे ओरडूं लागले.

घरंदाज आणि श्रीमंत स्त्रियांची ऐट घालविण्यासाठीं इव्हानें आपलाहि इतमाम वाढविला. नेहमींची राहणी तिनें अगदीं बेताची ठेवलेली होती. परंतु सार्वजनिक ठिकाणीं किंवा दरबारांत जावयाचें म्हटलें, म्हणजे एकाद्या सम्राज्ञीला सुद्धां हेवा वाटावा, असा पोषाख ती करूं लागली. युरोपांतील मोठमोठ्या राजधानींतील झगेवाल्यांना तिच्याकडून पत्रें येऊं लागलीं, "आजपर्यंत तुम्ही केले नसतील असे उंची झगे करून पाठवा; त्यांना रत्नांच्या आणि मोत्यांच्या झालरी लावा, त्यांवर मधून मधून हिऱ्याचे चांद बसवा." मग असला पोशाख करून प्रेसिडेंट पेरॉनची बायको मोठ्या तोऱ्यानें सार्वजनिक प्रसंगांना आणि दरबाराला जाऊं लागली. तिच्याकडे पाहून तिला नाकें मुरडणाऱ्या त्या श्रीमंतांच्या आणि खानदानीच्या स्त्रिया अगदीं दिपून जाऊं लागल्या. पण हे प्रसंग सोडले, कीं अंगांत एक साधें पोलकें घालून ही बाई झाडूवाल्यांच्या सभेंत जाऊन बसत असे! साऱ्या देशांतील स्त्रिया तिच्याकडे आपली कर्तबगार बहीण म्हणून पाहूं लागल्या. चाळीस लाख मतदार स्त्रियांचें मोठें संघटन तिनें बनविलें; आणि नवऱ्याची पुन्हां निवडणूक आली तेव्हां तिनें त्याच्यावर मतांचा नुसता पाऊस पाडला.

जॉन पेरॉन हाही स्वतः मोडा उमदा, देखणा आणि पराक्रमी माणूस होता. सत्ता कशी हस्तगत करावी, आणि हुकूमशहांच्या चुका होऊं न देतां, ती हातीं कशी ठेवावी, याचें शास्त्र त्याला चांगलें अवगत होतें. त्यांतच बायकोच्या या साहाय्याची भर पडल्यामुळें पेरॉन अर्जेंटिना देशाचा अनभिषिक्त राजाच बनला. इव्हा तर त्याच्यावर इतकी लुब्ध होती, कीं तारीफ करतांना त्याची तुलना कोणाशीं करावी याचेंहि भान तिला राहीना. ती म्हणें, "आमचे 'हे' शिकंदरापेक्षां मोठे आहेत; नेपोलियनपेक्षां मोठे आहेत; प्रत्यक्ष येशू ख्रिस्ताइतके मोठे आहेत." तें कसेंहि असो, पति-पत्नींनीं मिळून सारा अर्जेंटिना देश सात आठ वर्षांच्या

1 JAN 1994

आंत अगदीं मुठींत आणला. पण वैभव, सौंदर्य, सामर्थ्य यांचा तमाशा पहात दुर्दैव मिष्किलपणानें जवळच कोठेंतरी बसलेलें असतें; आणि कोणाला नकळत भलत्याच वाटेनें येऊन लोकांच्या अन्नांत तें माती कालवतें. त्यांच्या खिरींत खराटा घालतें; आणि त्यांच्या वैभवाला सुरुंग लावतें.

सारें नेक चाललें असतां एक कोटी सत्तर लक्ष प्रजांची प्रीति संपादिलेल्या या जोडप्याचें बरें दैवाला बघवलें नाहीं. इव्हाला हळू हळू ताप येऊं लागला. “ताप सधासुधा नाहीं,” असें वैद्यराज म्हणूं लागले. “बाईसाहेबांना रक्तक्षय होण्याची चिन्हें आहेत” अशी कुरकूर ते करूं लागले. कॅन्सरचा वहिम येऊं लागल्यामुळे न्यूयॉर्कहून तज्ञ डॉक्टर विमानानें येऊन दाखल झाले. आतां आपले कांहीं नीट नाहीं, असें इव्हाचें इव्हाला कळून चुकलें. ती म्हणूं लागली, “पेरॉन म्हणजे माझा प्राण आहे, पेरॉन माझा सूर्य आहे. मी श्वासानें हवा आंत घेतें, त्या हवेरखा माझा पेरॉन आहे.” याच व्याधींत तिनें आपलें आत्मचरित्र लिहून टाकलें. तिच्या दुखण्याची वार्ता सर्व देशभर पसरली; आणि यांतून ही आतां उठत नाहीं, असें सर्वांना वाटूं लागलें. मग आपल्यापाशीं जे काय आहे तें तिच्या चरणीं अर्पण करावें, ही वासना सर्व संस्थांना उत्पन्न झाली; आणि आजाराच्या शेवटच्या महिन्यांत राजदरबार, शिक्षण-संस्था, उद्योग-मंदिरें, आरोग्य-शाळा, कामगार-मंडळें एक ना दोन, शेकडों हजारों संस्थांनीं तिला पदव्या अर्पण केल्या; मानपत्रें दिलीं, नजराणे पाठविले. पण सगळ्यांच्या वर म्हणजे हजारोंच्या हजारों स्त्रिया तिच्या राजवाड्याच्या कुंसवाला पाठ देऊन मुसमुसत बसूं लागल्या. आपली आई नाहींशी होणार, हें पाहून अर्जेंटिनाच्या साऱ्या प्रजा हवालदिल होऊन गेल्या; आणि स्त्रिया व गरीब लोक यांना तर आपलाच प्राण कुडींतून चालला आहे, असें दुःख होऊं लागलें. होतां होतां तिचें वजन ऐंशी पौंडांवर आलें; शेवटीं एके दिवशीं रात्रीं आठ वाजून पंचवीस मिनिटांनीं प्रेसिडेंट जॉन पेरॉन शोकाकुल होऊन तिच्या खोलींतून बाहेर पडला; आणि बाहेर बसलेल्या मंत्र्यांना तो म्हणाला, “इव्हा संपली आहे!” वार्ता शहरभर पोहोंचतांच राजधानी दुःखानें केवळ वेडी होऊन गेली.

दुसरे दिवशीं तिच्या नेहमींच्या सुवर्ण मंदिरांत तिची शवपेटिका आणून ठेवण्यांत आली. पांच लक्ष लोक अश्रू ढाळीत पटांगणांत उभे होते. फाटक उघडतांच

तिचें दर्शन घेणाऱ्या लोकांची अशी खेचाखेच झाली, कीं चार माणसें प्रत्यक्ष मेलीं, आणि अडीच हजार घायाळ झालीं.

अवघ्या नऊ वर्षांत इव्हानें ही लोकप्रियता संपादिलेली होती. तिच्यासाठीं एक मोठी समाधि बांधू घातली. आतांपर्यंत ती तयार होऊन इव्हाचें शव आंत गेलेंहि असेल. पेरॉन हा आतां पोरका झाला; आणि अर्जेंटिनाच्या लक्षावधि प्रजा इव्हा द्वारटीसाठीं अजूनहि दुःखाचे उसासे टाकीत आहेत.